# ज्ञान प्रबोधिनी

## निगडी केंद्र

## ❋ कार्यवृत्त ❋

## शके १९४५-४६

-: संपर्क :-
**ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय**
निगडी, पुणे - ४११ ०४४.
दूरभाष : ०२०-२७१६८०००

Email: info@jpnvnigdi.org / nigdi@jnanaprabodhini.org
Website: https://jpnvnigdi.org

# शाळा समिती

| | |
|---|---|
| संचालक | वाच. गिरीशराव बापट |
| कार्यवाह | श्री. सुभाषराव देशपांडे |
| केंद्रप्रमुख, प्राचार्य, क्रीडाकुल विभाग प्रमुख | श्री. मनोजराव देवळेकर |
| केंद्रव्यवस्थापक, गुरुकुल विभाग प्रमुख | श्री. आदित्य शिंदे |
| केंद्र प्रशासक, पूर्व माध्यमिक विभाग प्रमुख | श्री. शिवराज पिंपुडे |
| शिक्षण समिती अध्यक्ष | डॉ. राजीव रानडे |
| संपर्क प्रमुख | श्री. ज्ञानेश्वर सावंत |
| अर्थ कार्यालय प्रमुख | सौ. मधुरा देव |
| पर्यवेक्षक | श्री. सुधीर कुलकर्णी |
| पर्यवेक्षिका : माध्यमिक इंग्रजी | सौ. कल्याणी पटवर्धन |
| मुख्याध्यापिका : प्राथमिक गट १ (१ली, २री) | सौ. मीनाताई दीक्षित |
| मुख्याध्यापिका : प्राथमिक गट २ (३री, ४थी) | सौ. सुवर्णा विसे |
| प्राथमिक शिक्षण समन्वयक | सौ. आरती बिजुटकर |
| विभागप्रमुख : पूर्वप्राथमिक | सौ. वैशाली तळेगांवकर |
| अनुभव शिक्षण मार्गदर्शक, संगणक वि. प्रमुख | सौ. अनुजा भंडारी |
| मुक्तिसोपन | सौ. शीतल कापशीकर |
| अटल धडपडालय | श्री. कल्पेश कोठाळे |
| जैवतंत्रज्ञान विभाग | सौ. संगीता कुलकर्णी |
| संवेद विभाग | सौ. अस्मिता बारसावडे |

## मंत्रणा समिती

मा. वाच. गिरीश बापट
मा. श्री. यशवंत लिमये
मा. श्री. ज्ञानेश्वर सावंत
मा. श्री. मनोज देवळेकर

# अनुक्रमणिका

प्रस्तावना

पूर्व प्राथमिक प्राथमिक शिक्षण कार्यदिशा
- पूर्व प्राथमिक विभाग
- प्राथमिक गट क्र. १
- प्राथमिक गट क्र. २

औपचारिक माध्यमिक शिक्षण कार्यदिशा
- पूर्व माध्यमिक विभाग
- माध्यमिक विभाग (मराठी)
- माध्यमिक विभाग (इंग्रजी)
- गुरुकुल विभाग
- क्रीडाकुल विभाग

अनुभव शिक्षण विभाग
- संगणक
- मुक्तिसोपान – संगीत विभाग
- जैवतंत्रज्ञान (विद्यार्थी प्रशिक्षण)
- ग्रंथालय

संशोधन व विस्तार कार्यदिशा
- संवेद
- जैवतंत्रज्ञान विभाग
- मातृमंदिर विश्वस्त संस्था
- चिपळूण विस्तार केंद्र

समूहगुण विकसन
- युवक विभाग
- युवती विभाग
- विभाग प्रमुख प्रशिक्षणे
- पालक महासंघ
- कौटुंबिक मेळावा

राष्ट्रीय एकात्मता

अंतर्गत गुणवत्ता

समावेशकता

नवोन्मेशता

प्रभाव

डोनेशन यादी

प्रकाशक : प्रशासक, ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र

संपादन मंडळ : सौ. वृंदा गाडगीळ, श्री. नागेश जोशी, सौ. आदिती नेब, सौ. राजश्री मराठे

मुद्रक : प्रतिमा मुद्रण, कोथरूड, पुणे ४११०२९

प्रकाशन दिनांक: सौर अश्विन २४ शके १९४६, १६ ऑक्टोबर २०२४

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चे ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्राचे वार्षिक वृत्त आपल्या हातात देताना आनंद होत आहे. प्रबोधिनीची पदये ही विलक्षण ऊर्जा देणारी, विचार देणारी, मार्ग दाखविणारी असतात. अशाच एका पद्याच्या ओळी आठविल्या...

रचिले पायी संकल्पांचे अभंग उत्कट चिरे,
सहज मागुती उभी राहिली सिद्धीची गोपुरे ।।

निगडी केंद्राच्या सुरवातीच्या काळातील कार्यकर्त्यांनी ज्या संकल्पांनी हे केंद्र उभे केले त्याची फळं आजच्या कार्यकर्त्यांना, समाजाला अनुभवायला मिळताहेत; असे यंदाच्या वर्षाकडे मागे वळून पाहिले की लक्षात येते. नवनगर विद्यालय हे अनुदानित शालेय शिक्षणाचा आदर्श-अनुकरणीय नमुना घडविण्याचा संकल्प विद्यालयाच्या स्थापनेपासूनच होता. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' स्पर्धेतील राज्यस्तरीय प्रथम क्रमांक, दिल्ली राज्य शासनाच्या शिक्षण समित्यांच्या भेटी तसेच दिल्लीतील शारीरिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे वर्षभरात झालेले ३ वर्ग, गुरुकुलव्दारा आयोजित 'पंचकोश विकसानातून शिक्षण' या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेला मिळालेला उदंड प्रतिसाद यातून या विद्यालयातील चालू शैक्षणिक प्रक्रियेला समाजातील राज्य- राष्ट्रीय स्तरातून मान्यता मिळत असल्याचे जाणवते. आपल्या आधीच्या कार्यकर्त्यांनी रचलेला पाया किती मजबूत आहे, याची जाणीव होते.

पुस्तकापलीकडील अनुभव शिक्षण देणारी, संस्कार करणारी, सामाजिक जाणीवेचे विकसन करणारी शाळा अशी समाज मान्यता शाळेला लाभलेली आहे.

प्राथमिक विभागांच्या कार्यवृत्तात विनादप्तर शाळा, पंचेद्रियांच्या विकसनासाठीचे उपक्रम,अध्ययन अक्षम मुलांना प्रयत्नपूर्वक सक्षम कसे केले इ. विशेष झालेले काम वाचायला मिळेत. पूर्व माध्यमिक विभागातील अनुभव शिक्षणाच्या सहली - देवराई भेट, पक्षी निरीक्षण सहली याबरोबरच शिष्यवृत्ती परीक्षेची भट्टी जमवून मिळालेले उल्लेखनीय यश, यातून पुस्तकाबरोबरच पुस्तकापलीकडील शिक्षण येथे कसे चालते, हे पाहावयास मिळेल. माध्यमिक विभागात वाचनवेग, प्रकल्प पध्दती, वक्तृत्व कौशल्ये इ. वर्गोद्दिष्टानुसार चाललेले काम, अभिरुची योजना, विद्याव्रत पूर्व तयारी शिबिर इ. विशेष चालू असलेले उपक्रमांविषयी माहिती मिळेल.

१९९९ साली सुरू झालेल्या संगणक विभागाचे हे रौप्य महोत्सवी वर्ष होते. एकीकडे शालेय विद्यार्थ्यांसाठी संगणकाचे अत्याधुनिक प्रशिक्षण देणयासोबतच ग्रामीण शाळांसाठी साक्षरता अभियान, कार्यशाळा, राज्यस्तरीय संगणक बुद्धिमत्ता स्पर्धा, संगणक क्षेत्रातील अध्यापकांचे संघटन, आवश्यकतेनुसार महाविद्यालयीन व परिसरातील नागरिकांसाठी प्रशिक्षण वर्ग इ. अनेकविध उपक्रम राबवीत समाजापर्यंतही डिजिटल साक्षरता पोहचविण्याचा प्रयत्न संगणक विभाग करीत आहे.

विद्यालयातील पालक संघ मजबूत करणारे दासबोध अभ्यास गट ते हिमालयात चंद्रखणी पास या १२ हजार फुटांवर सहकुटुंब सामूहिक चढाई करणारे गट इ. विविध उपक्रम वाचून आपणही या शाळेचे पुन्हा पालक व्हावे असे आपल्याला नक्की वाटेल. शिक्षणातून मनुष्यघडण आणि त्याव्दारे समाज घडण करण्यासाठी येथील सर्व अध्यापक-कार्यकर्ते कष्टपूर्वक हे उपक्रम घडवितात याचा आनंद-अभिमान वाटतो. आपल्या शुभेच्छा आणि आशीर्वाद आहेतच. पण त्याच बरोबर येत्या वर्षामध्ये येथील कामात संशोधन आणि युवकांच्या औपचारिक शिक्षणासाठी नवी इमारत संकल्पित आहे त्यासाठीही आपण जरूर आर्थिक साहाय्य करावे, ही विनंती !

**– मनोज देवळेकर**

# पूर्व प्राथमिक विभाग

पूर्व प्राथमिक
प्राथमिक शिक्षण

## बालपण म्हणजे स्वच्छंद खेळाचे क्षण, बालपण म्हणजे सर्व सुखाचे धन!

पहिल्यांदाच आईबाबांचा हात सोडून मुले शाळेत येतात ती पूर्व प्राथमिक विभागात. मग त्यांची आई बनून प्रत्येक ताई अतिशय मायेने मुलांमध्ये शाळेची गोडी निर्माण होईल असे वातावरण निर्माण करतात. हळूहळू मुलांना शाळेची इतकी सवय होते की, सर्वत्र स्वच्छंदी खेळणारे छोट्या छोट्या हातांनी विविध चित्र काढणारे, तसेच जीवनव्यवहाराच्या विविध कृती करणारे मूल आपलेच का? असा आईबाबांना प्रश्न पडतो.

दरवर्षी प्रमाणे २०२३-२४ मध्ये सुद्धा विभागात विविध उपक्रम झाले. उदा. दिंडी, नागपंचमी, राखीपौर्णिमा, पाटी पूजन, भोंडला, दिवाळी इ. सण साजरे केले. तसेच स्नेहसंमेलन, सहल, खेळाचे शुक्रवार, बालसभा, आरोग्य तापासणी आणि गृहभेटी इ. उपक्रमांची रेलचेल होती. त्यामुळे एकूणच शिक्षक व विद्यार्थी यांना अनुभव संपन्न करणारे हे वर्ष होते.

## वार्षिक स्नेहसंमेलन

स्नेहसंमेलन हा या गटातील मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकसनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा उपक्रम आहे. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणे, अभ्यासक्रमातील प्रकल्पांचा सखोल परिचय होणे ही या उपक्रमांची उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून विभागाचे स्नेहसंमेलन उत्साहात झाले. गुरुवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२४ रोजी विभागातील लहान गटाचे शुक्रवार दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ रोजी मोठ्या गटातील चिमुकल्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन साजरे झाले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सण व उत्सव या विषयावर आधारित रामनवमी, हनुमान जयंती, नारळी पौर्णिमा, गणेश चतुर्थी, दिवाळी, मंगळागौर, दहिहंडी, महाशिवरात्र आणि होळी असे विविध सण यावर आधारित नृत्य आणि मातृदिन व शिवजयंती नाटक स्वरूपात सादर केले. छोट्या गटाने सादर केलेले शबरीचे नाटुकले हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. स्नेहसंमेलनात पालक प्रतिनिधींचे राष्ट्रीय सण यावर आधारित समाजाप्रबोधनपर नाटक झाले आणि विभागातील अध्यापकांनी महाराष्ट्र दिन विषय घेउन नृत्य सादर केले.

पहिल्या दिवशी प्रमुख अभ्यागत म्हणून सौ. स्वराताई केतकर उपस्थित होत्या. आपली मायबोली अतिशय सुंदर आणि छान आहे. आपली संस्कृती, आपली भाषा, सण आणि उत्सव सगळ्यांनीच समजून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे, असे त्यांनी पालकांना सुचवले.

तर दुसरे दिवशी कार्यक्रमाच्या अभ्यागता सौ. वर्षाताई आहेर यांनी सर्व मुलांना मार्गदर्शन केले. त्यांच्या लहानपणीच्या काही आठवणी त्यांनी सांगितल्या आणि शिक्षिकेच्या भूमिकेतून आपल्याला किती काम करावे लागते, किती वेळ द्यावा लागतो हे सर्वांना सांगून मुलांना शुभेच्छा दिल्या.

दोन्ही दिवसाच्या कार्यक्रमात प्राचार्या सर्व विभाग प्रमुख, समन्वयक, मार्गदर्शक व इतर शिक्षक वृंद उपस्थित होते. मुलांचे कौतुक करण्यासाठी मुलांचे आईबाबा, यांच्यासोबत आजीआजोबाही याप्रसंगी उपस्थित होते.

## गृहभेट

यावर्षीच्या केंद्राच्या 'अधिमित्र' या विषयाला अनुसरून विभागात गृहभेट उपक्रम जाणीवपूर्वक राबवला. ताई या विद्यार्थ्यांच्या सर्वेसर्वा असतात. त्या जे सांगतील ते विद्यार्थी ऐकताततच. पण तरीही विद्यार्थ्यांच्या मानसिक, भावनिक विकासात अडथळा आणणाऱ्या काही गोष्टी असतात. म्हणूनच विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात घेता विभागाचा हा उपक्रम पालक, अध्यापक आणि विद्यार्थी या तीनही स्तरावर व्हायला हवा असा विचार केला. यासाठी विद्यार्थ्यांशी वैयक्तिक संवाद, पालकांशी वेळोवेळी संवाद होत होताच. त्याचबरोबर पालकांना विद्यार्थ्यांच्या वर्गातील वर्तनाचा अंदाज यावा म्हणून काही काळ त्यांच्यासोबत वर्गात बसणे, विभागप्रमुखांशी बोलणे, घरातून काही उपक्रम राबवणे, त्यांचा वेळोवेळी पाठपुरावा करणे इ. गोष्टी नियमीत होत होत्या. याला अधिकची जोड देणे आवश्यक होते. तसेच या समस्या वेळीच समजून घेऊन पालकांना समजून सांगितल्या तर लहान वयातच काही उपाय करता येतील असे जाणवले. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या समस्या फक्त समजून घेण्यापर्यंत न थांबता त्यांच्या मुळाशी जाऊन काही उपाययोजना करता येते का? याचा विचार पुढे आला. यातूनच दरवर्षीच्या गृहभेट उपक्रमांचा आम्ही आधार घेतला. विद्यार्थ्यांच्या घरी सर्वप्रथम जाऊन येणे त्याच्या सविस्तर नोंदी ठेवणे आणि निरीक्षणातून नेमके काय निष्पन्न होते हे नोंदवणे अशा प्रकारे गृहभेटींचे आयोजन केले. गणेशोत्सवातील अथर्वशीर्ष पठण, इतर सांस्कृतिक कार्यक्रम किंवा अचानक असे या गृहभेटींचे स्वरूप होते. यात वर्गशिक्षक आणि त्यांच्यासोबत कलाशिक्षक, विभागप्रमुख किंवा सहकारी शिक्षक यांची सोबत असायची. सर्व बाजूंनी विचार करून निरीक्षणे मांडली गेली. सर्वांनी नेमके काय शोधायचे आहे, कशावरून नोंदी ठेवायच्या आहेत हे लिहिणे सहज व्हावे या हेतूने प्रश्नावली तयार केली होती. याचा उपयोग पुढील वर्षीच्या शिक्षकांना नक्कीच होईल असे वाटते.

## G-20-प्रदर्शन

पुणे विद्यापीठांत यावर्षी G-20-प्रदर्शनाचे आयोजन केले होते. NCERT च्या सहकार्यामुळे आपल्या शाळेसही तिथे मांडणी करायची संधी मिळाली. दिनांक १७ जून ते २३ जून २०२३ असे ७ दिवस सुरू असलेल्या या प्रदर्शनासाठी आपल्या देशातील बऱ्याच राज्यांनी भाग घेतला होता. यामध्ये सर्व राज्यांनी

आपापल्या राज्यात चाललेले शैक्षणिक उपक्रम, शैक्षणिक साहित्य, प्रयोग याद्वारे शिक्षण क्षेत्रातील बदल व नव्याने येऊ घातलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून विविध प्रयोगांच्या माहितीची मांडणी केली होती. NCERT च्या सहकार्यामुळे आपल्या शाळेस तिथे मांडणी करायची संधी मिळाली.

ज्ञान प्रबोधिनी निगडीच्या पूर्व प्राथमिक विभागाने बालवाटीकेचा संच उभा केला होता. बालवाटीकेत कृतीयुक्त शिक्षणावर भर देत शैक्षणिक साहित्याचे नियोजन व वापर कशा पद्धतीने केला जातो, तसेच नव्या धोरणानुसार आवश्यक गोष्टींचा समावेश उपक्रमाद्वारे कसा राबवला जातो याबद्दलची माहिती प्रदर्शनासाठी आलेल्या सर्व अध्यापकांना, राज्यातील पाहुण्यांना तसेच विदेशी मंत्र्यांनाही देण्यात आली. शैक्षणिक साहित्याचा अधिक योग्य वापर वयोगटानुसार करता येतो हे प्रभावीपणे मांडण्यासाठी विभागातील काही चिमुकले विद्यार्थीही या प्रदर्शनात सहभागी झाले होते. आलेल्या प्रत्येकाला ही चिमुकली मुले न घाबरता छान उत्तरे देऊन चकित करत होती. यामुळे शाळेत केलेले प्रयोग व विविध उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत किती चांगल्या प्रकारे पोहोचतात याचा अनुभव प्रदर्शनासाठी आलेल्या सर्वांनीच घेतला.

## प्राथमिक गट क्र. १ — अभिनंदन!

- चिन्मय मिशन आयोजित श्लोक पाठांतर स्पर्धेत **चि. निहार महाजन** याला प्रथम क्रमांक तर **चि. श्रीवेद केसकर** याला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे.
- नॅशनल स्कॉलर सर्च एक्झामिनेशनतर्फे सन २०२२-२३ मधे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत **चि. श्लोक गोरे** याला तिसरा क्रमांक प्राप्त झाला.

## पूर्व प्राथमिक विभाग — अभिनंदन!

- **कु. सावी पालकर** हिला दुसरी खुली राष्ट्रीय तायक्कांदो चॅम्पियनशिप २०२४ स्पर्धेत कांस्य पदक प्राप्त झाले.

  **चि. आयुष रुद्राक्ष** याला- राज्यस्तरीय किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२३-२४ स्पर्धेत कांस्य पदक आणि जिल्हा स्तरीय किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२३-२४ स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त झाले.
- समर्थ भारत अभियान आयोजित मनाचे श्लोक स्पर्धेत तसेच अलाईव्ह आयोजित 'चला चिऊ वाचवू' अभियानामार्फत झालेल्या चित्रकला स्पर्धेत **चि. अद्वैत बोडके** याला प्रथम क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले.
- आपटे प्रशाला आयोजीत बाल अभिनय गीत स्पर्धेत अध्यापिका **सौ. श्रद्धा कुलकर्णी** यांना स्वरचित गीतसाठी प्रथम क्रमांक व फिरती ढाल मिळाली.
- धनंजय धडफळे आयोजित फुलांची पुस्तिका बनवणे स्पर्धेत अध्यापिका **सौ. मंजिरी छापेकर** यांना उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त झाला.

# प्राथमिक विभाग
# गट १

**पूर्व प्राथमिक प्राथमिक शिक्षण**

## मुलांसोबत खेळूया, बालपण जपूया उपक्रम

**आनंदाने नाचूया, खेळूया, उड्या मारुया,**
**फुलांप्रमाणे फुलूया, धमाल मजा करूया...**

विद्यार्थी व पालक यांच्यातील सहसंबंध दृढ होणे, पालकांचे संघटन व गटबांधणी करणे तसेच धकाधकीच्या जीवनात पालकांनी पाल्याबरोबर वेळ घालवणे अशी उद्दिष्ट्ये साध्य व्हावी यासाठी पालक-शिक्षक संघटन खात्यांर्तगत पालक आणि विद्यार्थी यांचा आगळावेगळा खेळांचा उपक्रम घेण्यात आला. इयत्ता २री साठी प्रायोगिक तत्त्वावर शनिवार, दि. २३ मार्च २०२४ रोजी, सकाळी ८ ते ११.३० या वेळेत हा उपक्रम घेतला गेला. लोप पावत चाललेले पारंपरिक खेळ आणि नवीन खेळ असे एकूण १७ खेळ मांडले होते. उपक्रमाचे उद्‌घाटन विद्यालयाच्या प्राचार्या सौ. विद्या उदास यांच्या हस्ते जोशपूर्ण वातावरणात झाले. पालकांसोबत खेळ खेळताना मुलांच्या चेहऱ्यावर खूप आनंद दिसत होता; तर पालकांना आपले बालपण अनुभवण्याची संधी मिळत होती. या उपक्रमात सुमारे ३५० पालक व विद्यार्थी सहभागी झाले होते.

उपक्रमातून मुलांना व पालकांना पारंपरिक खेळांची ओळख झाली आणि मुलासोबत मूल होऊन खेळण्याचा आनंद पालकांना मिळाला.

## अधिमित्र योजना

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ हे निगडी केंद्रात अधिमित्र वर्ष म्हणून घोषित करण्यात आले होते. या विषयाला अनुसरून विभागात विद्यार्थ्यांसाठी विविध कृती आणि उपक्रमांची योजना करण्यात आली. प्रथमसत्रात वैयक्तिक संवाद मधल्या सुट्टीत आणि शाळा सुटताना १० मि. आधी या स्वरुपात झाला. तर द्वितीय सत्रात गटात संवाद उपासनेनंतर व वर्गश: या स्वरूपात झाला. त्यामध्ये परिपाठांतर्गत महिन्यातून एकदा सभोवतालचा परिसर आणि चांगल्या सवयी या विषयी संवाद करण्यात आला.

विद्यार्थ्यांशी संवाद करताना मुलांची कौटुंबिक माहिती, दिनचर्या, शिकवणी, विद्यार्थ्यांची आवड, नातेवाईक इ. विषयाला अनुसरून अध्यापक संवाद साधत होते. त्यामुळे मुलेही सहज व्यक्त होत होती. त्यातून विद्यार्थ्यांचा स्वभाव, आवड, अडचणी लक्षात आल्या. त्या अनुषंगाने पालकांशी संवाद साधण्यात आला.

यामुळे अध्यापक, विद्यार्थी आणि पालक यामधील सहसंबंध दृढ होण्यास मदत झाली. महिन्यातून एकदा म्हणजेच तिसरा शनिवार हा गृहभेटीसाठी राखून ठेवला गेला आणि त्यावेळी पालकांशी अनौपचारिक संवाद करण्यात आला. या गृहभेटीतून विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. पूर्ण विभागातून जवळपास १०० विद्यार्थ्यांच्या गृहभेटी झाल्या. अध्यापकांनी या गृहभेटीच्या सविस्तर नोंदी केल्या.

यावर्षी सर्व विद्यार्थ्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा पत्र देण्यात आली. ताईंकडून मिळालेली ही भेटवस्तू मुलांना अतिशय आवडली. त्याचप्रमाणे अध्यापकांचेही वाढदिवस औक्षण करून साजरे करण्यात आले. तसेच काही अध्यापकांच्या घरी सदिच्छा भेट देण्यात आली.

## आनंदी वार शनिवार - विनादप्तर शाळा

**नाही दप्तर, नाही शाळा, हवे तेवढे खुशाल खेळा...**

शिक्षण ही अनुभव घेत शिकण्याची प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता विकसित करणे आणि विविध कौशल्ये वाढीस लावणे, सर्जनशीलता वाढीस लावणे ही उद्दिष्ट्ये समोर ठेवून **आनंदी वार शनिवार विनादप्तराची शाळा** हा उपक्रम घेण्यात आला.

**या उपक्रमात राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० नुसार मुलांच्या पंचेंद्रिय विकासासाठी चव, वास, स्पर्शज्ञान, निरीक्षण कौशल्य, श्रवण कौशल्य यांच्या वाढीसाठी विविध खेळ घेण्यात आले.**

- **निरीक्षण कौशल्यासाठी–** पानांचे निरीक्षण करणे. लपवलेले चित्रकार्ड व शब्दकार्ड ओळखणे, चित्रातील गोष्टी /वस्तू सांगणे, दोन चित्रातील फरक ओळखणे, लपवलेले अंककार्ड ओळखणे इ. खेळ घेण्यात आले.
- **स्पर्श ज्ञानासाठी** – कपड्यांच्या सुतावरून योग्य जोडी लावणे, जादूच्या पोतडीतून स्पर्शाच्या साहाय्याने समान वस्तू ओळखणे इत्यादी खेळ घेतले गेले.
- **श्रवण कौशल्यासाठी** – वेगवेगळ्या वाद्यांचे आवाज, पाण्याचे आवाज, प्राणी, पक्षी, वाहनांचे आवाज, आवाजडब्या वापरून आवाज ओळखणे.
- **गंध ज्ञानासाठी** – अमृतांजन, विक्स, अत्तर, कापूर असे वेगवेगळे वास असणाऱ्या डब्यांच्या वासावरून मुलांनी वास ओळखणे. असे वर्षभर मुलांचे पंचेद्रिय विकसनाचे जवळपास सुमारे २५ खेळ घेण्यात आले.

प्रथम सत्रात निरीक्षण, श्रवण, वैचारिक, नवनिर्मिती तर द्वितीय सत्रात सुंदर हस्ताक्षर, निरीक्षण, वैचारिक, कारक कौशल्य यावर आधारित खेळ घेण्यात आले.

## वाचन लेखन मार्गदर्शन वर्ग

### शिक्षणाचा ध्यास, मूलभूत क्षमतांचा विकास

कोरोना काळानंतर असे लक्षात आले की मुलांना वाचन लेखनात अडचणी येत आहेत. त्यांना वैयक्तिक मार्गदर्शनाची गरज आहे. म्हणून प्रत्येक वर्गासाठी एका सहाय्यक शिक्षकांची नेमणूक करण्यात आली.

पूर्वचाचणी घेऊन मुलांचे स्वतंत्र गट तयार करून वैयक्तिक मार्गदर्शन करण्यास सुरुवात केली. मुलांशी संवाद साधून, त्यांच्या निरीक्षण नोंदी करून त्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करण्यात आले. मुलांच्या अडचणी समजावून घेऊन पालकांना वैयक्तिक मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थी-शिक्षक-पालक मिळून ही प्रक्रिया प्रभावी होण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. यासाठी पालक बैठका, गृहभेटी घेण्यात आल्या.

शिक्षण आनंददायी व्हावे या हेतूने खेळातून शिक्षण ही संकल्पना समोर ठेवून, स्वनिर्मित साहित्याचा वापर करून अध्यापन करण्यात आले. वाचनपट्ट्या, तक्ते, अक्षर आणि अंककार्ड असे विविध शैक्षणिक साहित्य तयार केले गेले. ते वापरून शब्द, वाक्य व संख्या तयार करणे असे खेळ घेण्यात आले. मुलांना शब्दकोडी आणि गोष्टी सांगण्यात आल्या. त्यामुळे मुलांचा शिक्षणातील आनंद वाढू लागला. या मुलांसाठी वाचनपत्रक तयार करून त्यानुसार सराव घेण्यात आला. मुलांचे दररोज वैयक्तिक वाचन घेण्यात येत होते. वाचनामध्ये जिथे जिथे मुलांना अडचण येत होती, तिथे वैयक्तिक मार्गदर्शन करण्यात आले.

मुलांना स्वरचिन्हांचे लेखन कसे करायचे हे शिकवले. मुलांचे लेखन सुधारावे यासाठी अनुलेखन, श्रुतलेखन घेण्यात आले. कार्यपत्रके व अभ्यासपत्रके यांचा नियमित सराव घेण्यात आला. नियमित अभ्यासाची सवय लागावी यासाठी मुलांना घरचा अभ्यास देणे, तो नियमित तपासणे व त्याच्या नोंदी ठेवणे हे देखील करण्यात आले. त्यामुळे मुले आनंदाने व नियमितपणे अभ्यास करू लागली आहेत.



वाचन लेखन मार्गदर्शन वर्ग

# प्राथमिक विभाग
# गट - २

पूर्व प्राथमिक
प्राथमिक शिक्षण

## गणित कृतियुक्त उपक्रम

**आमच्या मुलांनी मांडलय दुकान...**
**आली गिऱ्हाईके सान सान...**

हो खरंच! आमच्या मुलांनी स्वतःचं छोटंस दुकान थाटले होते. काही जणांनी तर त्याला नाव पण दिले होते. आपापल्या वस्तू विकण्याचा आग्रह ही मुले धरत होती. आपले संवाद कौशल्य आजमावत खुबीनं गिऱ्हाईके आपल्याकडे आकर्षित करत होती. हे सगळं घडत होतं आमच्या गणित कृतियुक्त उपक्रमात. म्हणजेच खरेदी विक्री उपक्रमात. मुलांना खरेदी विक्रीचा अनुभव देणे, गणित विषयाची आवड निर्माण होणे, तोंडी हिशोब करता येणे, नाणी – नोटांची ओळख व त्यांचा योग्य वापर करता येणे यासारख्या छोट्या छोट्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन केले गेले. मंगळवार दिनांक ५ मार्च २०२४ रोजी दुपारी १ ते ५:३० या वेळेत मनोहर सभागृहाखालील मैदानावर ही दुकाने सजली होती. त्यात इयत्ता तिसरी व चौथीचे गणित विषयाच्या वर्गाचे एकूण ९९ विद्यार्थी दोघात एक याप्रमाणे दुकानदाराच्या भूमिकेतून, तर ग्राहकांच्या भूमिकेत विभागातील इतर ३०० विद्यार्थी व विद्यालयातील अध्यापक होते.

शालेय साहित्य व खाऊ अशा स्वरूपाचे विक्री साहित्य शाळेच्या भंडारातूनच घेतले होते. अगदी २ रुपये किमती पासून ते ५० रुपयांपर्यंतच्या किमतीचे साहित्य यात होते. अनेक मुलांनी पुस्तकांची खरेदी आवडीने केली.

या आनंदासोबतच मुलांना हिशोब करता येऊ लागला, जोडीकार्य करता आले, पैसे प्रत्यक्ष हाताळता आले, गणिताची मज्जा घेता आली. पहिल्यांदाच एवढे पैसे मोजण्याचा अनुभव मुलांनी घेतला. त्या दिवशी घरी जाताना प्रत्येक मुलाची अनुभवाची पिशवी गच्च भरलेली होती.

## निवासी शिबिर

शाळेत राहायचं, मुक्काम करायचा. कसली भारी गोष्ट... आणि तेही अभ्यासाशिवाय बरं का!

मग तर काही बघायलाच नको!

प्रबोधिनीतील एक अनुभव संपन्न करणारा उपक्रम म्हणजे **निवासी शिबिर!**

मुलांना सहजीवनाचा आनंद घेता यावा, शाळेविषयी आपुलकी वाढावी, शिक्षक-विद्यार्थी नाते दृढ व्हावे, एक दिवस घरापासून लांब राहण्याचा अनुभव घेता यावा या हेतूने या उपक्रमाची रचना केली होती. दिनांक ९ मार्च २०२४ सकाळी १०:३०ते १० मार्च सकाळी १०:३० असा २४ तासांचा कालावधी या शिबिराचा होता. यामध्ये वेगवेगळ्या बौद्धिक खाऊची मेजवानी मुलांना देण्यात आली. वेगवेगळी आठ सत्रे यासाठी योजली होती. मनोहर सभागृहातील सामूहिक उपासनेने शिबिराची सुरुवात झाली. पहिले सत्र पोवाडा गायनाचे होते. विद्यालयाचा **माजी विद्यार्थी चि. अथर्व कुलकर्णी** याने हे सत्र घेतले. दुसरे सत्र हस्तकलेचे झाले. त्यात **विभागातील कला अध्यापिका सौ. मधुरा बारस्कर** मुलांना कागदापासून स्वतःच्या नावाची पाटी तयार करायला शिकवली.

त्यानंतरच्या सत्रात मुलांसाठी अनेक कथांची मेजवानी होती. ही मेजवानी दिली होती सर्वांचा **लाडका गट्टू दादा उर्फ श्रीधर कुलकर्णी** याने. त्याने मुलांना अनेक गोष्टी सांगितल्या. काही अपूर्ण गोष्टी पूर्ण करण्यास सांगितल्या. भन्नाट कल्पनांसह मुलांनी त्या गोष्टी पूर्ण केल्या. अनेक छोटे छोटे खेळही घेतले गेले.

नंतर खेळाचे सत्र झाले. त्यात एक ते दीड तास मुलांनी मैदानावर खेळण्याचा आनंद घेतला. संध्याकाळी सात ते आठ या वेळेत बालगीतांची मेजवानी मुलांच्या पुढ्यात होती. त्यामध्ये **विद्यालयाच्या माजी अध्यापकांनी** मुलांसमोर छान छान बालगीते सादर केली.

रात्रीच्या जेवणानंतर गाणी, गप्पा, गोष्टी करत सर्वांनी शेकोटीभोवती फेर धरला. शेकोटीचे गीत म्हटले. नंतर चौथी इंग्रजी माध्यमाच्या मुलांनी स्वरचित ‘स्वच्छते’ विषयी नाट्यछटा सादर करून दिवसाची सांगता केली.

पहाटे ४ वाजल्यापासून नवा दिवस प्रसन्न वातावरणात दुर्गा टेकडीच्या छोट्याश्या पायी सहलीचा आनंद घेत सुरु झाला. तिथे गेल्यानंतर सामूहिक उपासना करून मुलांनी बागेत असणाऱ्या सर्व खेळण्यांचा मनसोक्त आनंद घेतला. दोन तास पोटभर खेळून मुले विद्यालयात परत आली. अनुभव कथनात मुलांनी व अध्यापकांनी शिबिराविषयीचे आपले मनोगत मांडले आणि शिबिराची सांगता झाली.

**प्राथमिक गट क्र. १**

## अभिनंदन !

- शिक्षण विवेक आयोजित नाट्यछटा स्पर्धा २०२३ या स्पर्धेत १ली कमळ गटातील **कु. रिधिमा मोहिते** हिला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त.
- **चि. रिशांक पाटील** याला रंगोत्सव सेलीब्रेशनतर्फे आयोजित इंटरनॅशनल लेव्हल आर्ट कॉम्पिटिशनमध्ये रंगभरणमध्ये रौप्य पदक प्राप्त.
- ९वी ऑल इंडिया नॅशनल डान्स फेस्टिवल नृत्यगम्, पुणे याच्यातर्फे ६ व ७ जानेवारी घेण्यात आलेल्या नृत्य स्पर्धेमध्ये इ. १ ली गुलाब गटातील **कु. काव्या शितोळे** हिने प्रथम क्रमांक मिळवला.

# पूर्व माध्यमिक विभाग

**औपचारिक माध्यमिक शिक्षण विभाग**

**विद्यालयाच्या माध्यमिक विभागातील इयत्ता ५ वी ते सातवीचा गट पूर्व माध्यमिक विभाग म्हणून ओळखला जातो.**

**सौर शके १९३८ ( इ. स. २०१६) पासून हा विभाग स्वतंत्रपणे कार्यरत झाला. या विभागात २०२३–२४ या वर्षात इंग्रजी माध्यम ५ वी ते ७ वीच्या तीन इयत्ता समाविष्ट करण्यात आल्या आणि विभागातील विद्यार्थी संख्या ५२८ अशी झाली.**

**विभागात औपचारिक शिक्षणाबरोबरच अनुभव शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि सामाजिक विकसनाचे उपक्रम योजले जातात. अशा काही निवडक उपक्रमांचे वृत्त पुढीलप्रमाणे...**

## व्यक्तीपरिचय

विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकसनासाठी पूरक असा हा 'व्यक्ती–परिचय' उपक्रम भाऊंच्या विचारातून साकार झालेला आहे. विद्यार्थी प्रश्न कौशल्य माध्यमातून नवीन व्यक्तींची आणि त्यांच्या क्षेत्राची ओळख करून घेतात. सहज समजणारे, वैविध्यपूर्ण प्रश्न तयार कसे करायचे, एका प्रश्नाच्या उत्तरातून अनेक प्रश्न सुचणे, सहजपणे आणि मोकळेपणे बोलण्याची वृत्ती वाढीस लागणे, भीती कमी होऊन धाडस व समय सूचकता या गुणांची वाढ होते आणि वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला बोलण्याची संधी मिळणे हे उद्दिष्ट समोर ठेवून हा उपक्रम योजण्यात येतो.

सातवीच्या चारही वर्गांसाठी वर्षभरात एकूण १५ व्यक्ती–परिचय झाले.

१) माजी विद्यार्थी जे प्रबोधिनीमध्ये वेगवेगळ्या विभागामध्ये कार्यरत आहेत.

२) विविध क्षेत्रात दांडगा अभ्यास असणारे पालक.

३) स्वतःच्या क्षेत्रामध्ये पंधरा वर्षाहून अधिक काळ कार्यरत असणारे आणि स्थैर्य मिळवलेले व्यावसायिक, लेखक, विशेष तज्ज्ञ असे माजी विद्यार्थी–विद्यार्थिनी.

४) महिला दिनाच्या निमित्ताने समाजसेवा, पोलीस खाते आणि पत्रकारिता अशा सेवा क्षेत्रात रुजू असणाऱ्या धाडसी महिला असे चार फेऱ्यांमध्ये या व्यक्ती परिचयाचे स्वरूप ठरवले होते.

प्रत्येक विद्यार्थ्याचा प्रश्न विचारण्यात सहभाग हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणता येईल. या व्यक्तींच्या

अनुभवांची शिदोरी विद्यार्थ्यांना स्वत:चे भवितव्य घडविण्यास, प्रेरणा जागरण करण्यास उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

## अधिमित्र योजना

**एक एक अंकुरास पालवू, तेज साज आज त्यास लेववू!**

प्रबोधिनी पद्यातील या ओळींना स्मरून प्रत्येक विद्यार्थी हा एक-एक अंकुरासारखा रुजवून त्याला संपन्न करण्यासाठी, त्याचे भावनिक विश्व समजून घेण्यासाठी विभागात 'अधिमित्र' तासिका ही योजना राबविण्यात आली. पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षभरात एकूण ८ तासिकांचे आयोजन करण्यात आले.

वेळेचे नियोजन – प्रत्येक गुरुवारी परिपाठाच्या वेळात एक तास एक इयत्ता याप्रमाणे अधिमित्र तासिकांचे नियोजन झाले. प्रथम सत्रात प्रायोगिक स्वरूपात इयत्ता सातवीच्या वर्गांसाठी आणि द्वितीय सत्रात पाचवी व सहावी दोन्ही इयत्तांसाठी ही योजना गुरुवारच्या परिपाठाच्या तासिकेमध्ये संपन्न झाली.

इयत्ता पाचवीकरिता निवासी शिबीर अनुभव कथन आणि माझी दिनचर्या; इयत्ता सहावी करिता माझी दिनचर्या आणि मी केलेले अवांतर वाचन; इयत्ता सातवीकरिता माझी दिनचर्या, राखी विक्री करताना मला आलेले अनुभव, गणेशोत्सवातून मी काय शिकलो आणि प्रथम सत्र अभ्यासाचे नियोजन असे विषय निश्चित करून विद्यार्थ्यांशी मनमोकाळेपणाने संवाद करण्यात आला.

विद्यार्थ्यांना मुद्दे सांगून त्यानुसार मनोगत व्यक्त करण्यास सुचविण्यात आले. मुलांचे व मुलींचे स्वतंत्र गट तयार करण्यात आले. एका गटात १५-२० विद्यार्थी होते. असे एकूण १०-१२ गट होते.

'अध्यापकाने प्रामुख्याने श्रोता म्हणून सहभागी व्हावे' या नियमाचे पालन करण्यात आले. सर्व अध्यापकांनी दिलेल्या विषयावर विद्यार्थ्यांचे मनोगत ऐकून घेतले. अनेक विद्यार्थ्यांनी उपक्रमांविषयी आपल्या मनातील शंका अध्यापकांना विचारल्या.

अधिमित्र तासिकेनंतर अध्यापकांनी परस्परांमध्ये विद्यार्थ्यांना जाणून घेण्यासाठी चर्चा केली. विद्यार्थ्यांशी मैत्रीचे नाते निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अधिमित्र तास कधी असणार याविषयी विद्यार्थी स्वत:हून करत असलेली चौकशी ही विद्यार्थ्यांची या उपक्रमाविषयीची ओढ अधोरेखित करते.

## सहली

**अभ्यासाची दोस्ती करूनी, हिरव्या डोंगर वाटा फिरुनी**
**चुस्त तनाने मस्त मनाने, गीत नवे रचणार!**

'सहल' ही शालेय जीवनातील अतिशय आनंददायी आठवण. पण ही आठवण केवळ आनंदापुरती सीमित न राहता त्यातून निसर्गप्रेम जोपासण्याची सवय विद्यार्थ्यांमध्ये वृद्धिंगत व्हावी, परिसरातील पक्षी, वनस्पती यांच्यातील जैवविविधता शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यासता यावी तसेच निरीक्षण कौशल्य वाढीस

लागावे या उद्देशाने इयत्तानिहाय सहलींचे आयोजन करण्यात आले होते.

इयत्ता पाचवीसाठी देवराई अभ्यास सहलीचे आयोजन दोन गटात करण्यात आले होते. ताम्हिणी घाटातील कालिका माता देवराई व लोणावळा येथील मुळेश्वर देवराई येथे अनुक्रमे वनस्पती तज्ज्ञ डॉ. विनयाताई घाटे, रेवतीताई गिंडी, संगीताताई राठी आणि शिवांगीताई जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी देवराईतील जैवविविधता अभ्यासली. निरीक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांनी वृक्षांचा घेर मोजणे, तापमानाची नोंद करणे, परिसरातील मंदिराची माहिती घेणे इत्यादी कृतीदेखील केल्या. विद्यार्थ्यांनी निरीक्षण सूचीत निरीक्षणे नोंदवली.

इयत्ता सहावीसाठी निसर्गप्रेमी, पक्षी निरीक्षक श्री. उमेश वाघेला यांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रोक्त पद्धतीने पक्षी निरीक्षण सहलीचे आयोजन दोन गटात भिगवण येथे करण्यात आले होते. भिगवण येथे दरवर्षी येणाऱ्या काही स्थलांतरित व पाणथळीच्या नैसर्गिक अधिवासात आढळणाऱ्या विविध पक्षांच्या प्रजाती विद्यार्थ्यांनी शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यासल्या व निरीक्षण तक्त्यामध्ये नोंदी केल्या. पक्षी निरीक्षण अभ्यास सहल पूर्व व्याख्यानाची योजना केली असल्यामुळे विद्यार्थ्यांना पक्षी निरीक्षण करत असताना अचूक नोंदी करता आल्या. भिगवणपर्यंतच्या प्रवासातही विद्यार्थ्यांनी श्री. वाघेला सरांबरोबर पक्षी निरीक्षणासंदर्भात मार्गदर्शन मिळवलेच शिवाय काही संदर्भ पुस्तकांचे निरीक्षण करून चर्चाही केली. कुंभारगाव येथील तलावात दुर्बिणीद्वारे शास्त्रोक्त पद्धतीने घेतलेला पक्षी निरीक्षणाचा अनुभव विद्यार्थ्यांना समृद्ध करणारा होता. पाणथळीचे पक्षी अनुभवल्यानंतर विद्यार्थ्यांनी मयुरेश्वर अभयारण्यात गवताळ अभयारण्य अनुभवले.

निसर्गातील घटकांबरोबरच ऐतिहासिक वास्तू असणाऱ्या किल्ल्यांचे आणि वीरगळीचे ऐतिहासिक महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, इतिहासाची गोडी विद्यार्थ्यांना लागावी या उद्देशाने इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांची किल्ले सहल कोरीगड आणि तिकोना या दोन ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना किल्ल्याची शास्त्रोक्त माहिती सहलपूर्व व्याख्यानांमधून किल्ले अभ्यासक श्री. विनय दाते यांच्या मार्गदर्शनातून देण्यात आली. त्या आधारे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहलीत किल्ल्याचा इतिहास जाणून घेता घेता मेट, पाण्याचे टाके, बुरुज, प्रवेशद्वार इत्यादी बाबींचे निरीक्षण करीत निरीक्षण सूची भरली. किल्ले अभ्यासक श्री. निनाद थत्ते व श्री. निलेश गावडे यांनी विद्यार्थ्यांना सहलीमध्ये मार्गदर्शन केले.



इयत्ता सातवीच्या अभ्यासक्रमात असणारी वीरगळ ही संकल्पना विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाहता यावी

याकरिता विद्यार्थ्यांसाठी कोंढावळे या गावी वीरगळ तज्ज्ञ श्री. अनिल दुधानी यांच्या मार्गदर्शनाखाली सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीत विद्यार्थ्यांनी वीरगळीच्या विविध प्रकारांची माहिती घेतली.

अशाप्रकारे पूर्व माध्यमिक विभागातील इयत्तानिहाय आयोजित करण्यात आलेली प्रत्येक अभ्यास सहल ही विद्यार्थ्यांना आनंद देणारी आणि प्रत्यक्ष अनुभवासह विद्यार्थ्यांच्या ज्ञानकक्षा रुंदावणारी ठरली.

## पूर्व माध्यमिक विभाग

## अभिनंदन!

- अध्यापक संघ आयोजित नाट्यवाचन स्पर्धेत पुण्यातील ६८ शाळांतील संघांचा सहभाग या स्पर्धेत होता. या स्पर्धेत 'अभय' या अध्यापिका सौ. स्वाती मोरे यांनी लिहिलेल्या संहितेच्या नाट्य वाचनास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. यांनी वाचिक अभिनयामध्ये इयत्ता सहावीमधील **चि. ओम कळके** यास विशेष पारितोषिक प्राप्त झाले.
- 'कलापिनी' नाट्य संस्था व 'अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कै. बाळासाहेब गद्रे स्मृती आंतरशालेय नाट्य वाचन स्पर्धेत' इयत्ता सातवीतील **कु. आराध्य हंडे** हिला वाचीक अभिनयात तृतीय क्रमांक प्राप्त झाला. तर **चि. वेदांत इंगळे** याला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. तर **सौ. स्वाती मोरे** यांना लेखनासाठी प्रथम क्रमांक प्राप्त झाला. **सौ. मयुरी जेजुरीकर** यांना दिग्दर्शनासाठी प्रथम क्रमांक प्राप्त झाला. या स्पर्धेतही **चि. ओम कळके** याला उत्कृष्ट अभिनयाचे प्रथम पारितोषिक मिळाले.
- तसेच कलापिनी नाट्यसंस्था आयोजित 'कै. डॉ. शं. वा. परांजपे स्मृती ४६ व्या आंतरशालेय बालनाट्य स्पर्धेत' विद्यालयाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. सकाळ माध्यम समूह व मातृमंदिर विश्वस्त संस्था आयोजित NIE नाट्यस्पर्धेतही या नाटकास पथम क्रमांकाचे, दिग्दर्शनासाठी **सौ. मयुरी जेजुरीकर** यांना प्रथम क्रमांकाचे आणि **चि. ओम कळके** यास अभिनयासाठी प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले.
- शिक्षण विवेक आयोजित नाटयछटा लेखन स्पर्धा – इयत्ता सहावीतील **कु. आरोही देशपांडे** हिला 'आमची किचन क्वीन' या नाट्यछटेसाठी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.
- संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान मुंबई यांच्याद्वारे आयोजित लेखी परीक्षा –

  संतकथा यात इयत्ता पाचवीतील **कु. ईश्वरी ढेपे** हिला सुवर्ण पदक प्राप्त झाले आहे. इयत्ता सहावीतील **कु. निरंजना पोवार** हिला कथारूप रामायण यात सुवर्णपदक प्राप्त झाले. आणि इयत्ता सातवीतील **चि. कृष्णल पाटील** याला चरित्र रामायण यात सुवर्णपदक प्राप्त झाले.

# माध्यमिक इंग्रजी विभाग

औपचारिक माध्यमिक शिक्षण विभाग

## इंग्रजी सहाध्याय दिन

३१ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ९.०० ते दुपारी ३.०० यावेळेत इयत्ता आठवीसाठी 'इंग्रजी सहाध्याय दिन' आयोजित करण्यात आला होता. विविध उपक्रमांमधून संपूर्ण पाठाचा अभ्यास करणे, परस्पर संवाद आणि चर्चा या माध्यमातून आशय समजून घेणे, श्रवण-कौशल्य आणि लेखन-कौशल्य विकसित करणे. या उद्दिष्टांना धरून अभ्यासक्रमामध्ये असलेल्या 'रामानुजन' या पाठावर वेगवेगळी कृतिसत्रे घेण्यात आली. पहिल्या सत्राच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांना दिवसभरातील सर्व उपक्रमांची माहिती देण्यात आली. केवळ कृती करून पाठ शिकणार असल्याने विद्यार्थी खूप उत्साही होते. यामध्ये अध्यापनाचा भाग खूप कमी होता.

यात शब्दकोडे बनवणे, 'Wh' प्रकारचे प्रश्न तयार करणे, व्याकरणाचे भाग शोधणे, चित्रपट समीक्षण करणे, अशा विविध कृतीसत्रांचा यात समावेश होता.

## अग्रणी प्रशिक्षण

विद्यालयात दरवर्षी इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी नेतृत्वकौशल्य विकसित करण्याच्या हेतूने अग्रणी योजना राबवली जाते.

अग्रणी प्रशिक्षणाअंतर्गत यावर्षीच्या अग्रणींना नियोजन कौशल्याचा अनुभव देण्यासाठी मराठी भाषा दिनाचे नियोजन करण्यास सांगितले. मराठी भाषा दिन २७ फेब्रुवारी रोजी संपन्न झाला. यात गटकार्य, भाषिक खेळ, लेखकांची नावे सांगणे इ. उपक्रमांनी मराठी दिन आयोजित करण्यात आला. यातून आपल्याहून लहान वयोगटाशी संवाद कसा साधावा, हेही अग्रणींना समजले. शिक्षकांशी संवाद करण्याची संधी मिळाली व काम करण्याचा उत्साह वाढला.

याच बरोबरीने कै. आप्पांच्या स्मृतिदिनाच्या वेळी निवडक अग्रणींना सूत्रसंचालन व प्रास्ताविक परिचय कसा करावा याचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी आवाजातील चढउतार, बोलण्याचा वेग, शब्दफेक, वाक्यरचना इ. विषयी अध्यापकांनी मार्गदर्शन केले. उर्वरित अग्रणींना तांत्रिक बाबींच्या कामाचे प्रशिक्षण देण्यात आले. यावर्षी प्रशिक्षणाचा स्वतंत्र तास न घेता वेगवेगळ्या अनुभवातून कौशल्य प्रशिक्षण योजण्याचा प्रयत्न केला.

## वक्तृत्व कौशल्य प्रशिक्षण

कौशल्य प्रशिक्षणांतर्गत इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना वक्तृत्व कौशल्य प्रशिक्षण देण्यात येते. हे प्रशिक्षण देताना विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे, श्रवण, भाषण, अभिव्यक्ती इत्यादी कौशल्ये विकसित करणे. या उद्दिष्टांना धरून या प्रशिक्षणांतर्गत प्रकट वाचन, लेखन सादरीकरण व गोष्ट सांगणे या तीन सत्रांचा समावेश करण्यात आला होता.

या कौशल्य प्रशिक्षणांतर्गत विद्यार्थ्यांना भाषणाचे, लेखनाचे मुद्दे कसे काढावेत, ते सादर करताना चेहऱ्यावरील हावभाव, देहबोली, आवाजातील चढ-उतार कसे असावेत असे सादरीकरणातील अनेकविध पैलू समजावून सांगितले. कथाकथन करताना विषय वयाला साजेसा असावा, त्यातील महत्वाचा मुद्दा योग्य पद्धतीने विस्तारित कसा करावा हे सांगितले. सर्वच सत्रांना विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

हे प्रशिक्षण विद्यार्थ्यांचे इंग्रजी उच्चार सुधारण्यास व शब्दसंग्रह वाढवण्यास सहाय्यक ठरले; शिवाय विद्यार्थी आत्मविश्वासपूर्वक गटासमोरही सादरीकरण करू लागले.

## पूर्व माध्यमिक विभाग

### अभिनंदन !

- नाट्य संस्कार कला अकादमी यांच्या वतीने सुमन नाट्यछटा लेखन स्पर्धा - या स्पर्धेमध्ये इयत्ता सहावीतील **कु. आरोही देशपांडे** हिला प्रथम क्रमांक प्राप्त झाला.
- दिवाकर स्मृती आंतरशालेय नाट्यछटा स्पर्धेमध्ये इयत्ता सहावीतील **कु. आराध्य हंडे** हिला प्रथम क्रमांक तर **कु. रिया गोखले** आणि **चि. वेदांत सांगळे** यांना उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले.
- वारकरी शिक्षण संस्था आळंदी आयोजित, गीता भक्ती अमृत महोत्सव रंगभरण स्पर्धेत (प्रभू श्रीरामांचे चित्र) यात
  - ★ प्रथम क्रमांक- **कु. निरंजना पोवार** (सहावी ), **कु. आर्या माळी** (सातवी)
  - ★ द्वितीय क्रमांक- **कु. सई निंबाळकर** (सहावी इंग्रजी माध्यम), **कु. वेदिका दुधाळ** (सातवी)
  - ★ तृतीय क्रमांक- **चि. नीलमाधव गुरव** (सहावी), **कु. श्रीया कुदळे** (सातवी)

  या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.
- इयत्ता सातवीमधील **कु. रिया गोखले** हिने २५ व्या स्वरसागर सांस्कृतिक महोत्सवात शास्त्रीय नृत्य प्रकारात पंधरा वर्षाखालील गटात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.
- पिंपरी चिंचवड म.न.पा. शिक्षण मंडळ आयोजित समूहगायन स्पर्धेत पाचवी ते सातवी गटात मुलींच्या गटाने द्वितीय क्रमांक तर मुलांच्या गटाने द्वितीय क्रमांक पटकावला.

# माध्यमिक मराठी विभाग

औपचारिक माध्यमिक शिक्षण विभाग

## प्रतिज्ञाग्रहण

मातृमंदिर वर्धापन दिनाचे औचित्य साधून निगडी मध्ये १९८७ सालापासून हा प्रतिज्ञाग्रहण सोहळा होत आहे.

या कार्यक्रमात मराठी माध्यमाच्या इयत्ता नववीच्या १३५ विद्यार्थ्यांनी व इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता दहावीच्या ३५ विद्यार्थ्यांनी प्रतिज्ञा घेतली तसेच विद्यालयातील सदस्यांपैकी प्रथम प्रतिज्ञा ५ सदस्यांनी, व्दितीय प्रतिज्ञा एका सदस्याने तर तृतीय प्रतिज्ञा एका सदस्याने घेतली. प्रतिज्ञार्थिंना प्रतिज्ञा देण्यासाठी ज्ञान प्रबोधिनीचे संचालक मा. गिरीशराव बापट उपस्थित होते. प्रतिज्ञाग्रहणाच्या वेळी प्रत्येक प्रतिज्ञेला अनुसरून एकूण ५ उतारे वाचले. प्रतिनिधिक स्वरूपात २ विद्यार्थ्यांनी आपली प्रतिज्ञाग्रहण प्रक्रिया, त्यांना समजलेला अर्थ मनोगतातून मांडला. ''मातृभूमीचा परिचय करून घेण्यासाठी फक्त पुस्तकातील माहितीवर अवलंबून न राहता स्वतः अनुभव घ्या; विविध ठिकाणी प्रवास करा, सूक्ष्म निरीक्षण करा. अनुभवांची देवाण घेवाण करा; प्रबोधिनीचे विचार समजून घेऊन त्यांचा प्रसार करा.'' असे विचार आ. संचालकांनी विद्यार्थ्यांसमोर मांडले.

विभागामध्ये विद्यार्थी व पालकांसाठी प्रतिज्ञाग्रहण पूर्व तीन व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

१) प्रतिज्ञा का, केव्हा, कशासाठी – श्री. महेंद्रभाई सेठिया

२) प्रतिज्ञेचे शब्द – वाच्. सौगंधदादा देशमुख

३) प्रतिज्ञा माझा स्वभाव बनला पाहिजे – सौ. अनघाताई देशपांडे

## औपचारिक अभिरुची

पाच वर्षांपूर्वी लावलेले अभिरुचीचे बी हळूहळू पल्लवीत होऊन त्याचे एक चांगले रोपटे तयार झालेले आहे आणि नक्कीच त्याचा वटवृक्ष होईल याची खात्री देणारा कार्यक्रम ४ डिसेंबर २०२३, सोमवारी दुपारी तीन ते सहा या वेळात विद्यालयात संपन्न झाला. निमित्त होते इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या औपचारिक अभिरुचीच्या विषयात केलेल्या प्रकल्पांच्या मांडणीचे.

इयत्ता नववीपासून आत्तापर्यंत म्हणजेच एकूण तीन सत्रात विद्यार्थ्यांनी जो काही विषय अध्यापकांच्या मार्गदर्शनातून, अनुभवातून, वाचनातून, विविध क्षेत्रभेटीतून, विविध तज्ज्ञांच्या व्याख्यानातून, स्वयं

अध्ययनातून समजावून घेतला. त्या अभ्यासाला मूर्त रूप विद्यार्थ्यांनी प्रकल्पाच्या माध्यमातून दिले. या प्रकल्पांची मांडणी आणि सादरीकरण हा या कार्यक्रमाचा गाभा होता. हा अभ्यासाचा प्रवास कसा अनुभवला याविषयी प्रत्येक गटातील दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. राजीव रानडे उपस्थित होते. त्यांनी अभिरुचीचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील स्थान किती महत्त्वाचे आहे याविषयी मार्गदर्शन केले.

त्यानंतर मनोहर सभागृहात आणि त्याखालील जागेत ११ औपचारिक अभिरुची विषयांची साधारण ५० प्रकल्पांची मांडणी विद्यार्थ्यांकडून करण्यात आली. हे सर्व प्रकल्प आणि एकंदरच प्रत्येक गटाचे अभिरुचीचे काम बघण्यासाठी प्रत्येक विषयातील एक तज्ज्ञ मार्गदर्शक आमंत्रित केलेले होते. इयत्ता दहावीचे पालकही अतिशय उत्साहाने आपल्या पाल्याचे प्रकल्प पाहण्यासाठी आणि त्यांच्या अभ्यासाबद्दल कौतुकाची थाप देण्यासाठी उपस्थित होते. इयत्ता नववी, दहावीच्या सर्वच विद्यार्थ्यांनी आणि उपस्थित सर्वांनीच सर्व प्रकल्प पाहिले, समजावून घेतले.

इयत्ता नववीच्या औपचारिक अभिरुची गटातील विद्यार्थ्यांसाठी गणेशोत्सवाशी संबंधित अभ्यास विषय देण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपापल्या गटामध्ये या विषयांचा अभ्यास केला. हा अभ्यास करताना विद्यार्थ्यांनी विविध पुस्तके, ग्रंथ, पंचांग, व्यक्ती भेटी, युट्युब वरील नामांकित व्यक्तींची व्याख्याने ऐकली, मुलाखती घेतल्या. हस्तलिखिते तयार केली तसेच तक्तेही तयार केले. याचे प्रदर्शन गणेशोत्सवादरम्यान भरवण्यात आले होते.

१) जीवशास्त्र – गणेश व आयुर्वेद

२) भौतिकशास्त्र – पंचांगशास्त्र दृष्टीकोनातून गणेशोत्सव

३) रसायनशास्त्र – गणेशोत्सवातील रसायन शास्त्र/ ( कचरा व्यवस्थापन – पर्याय )

४) संस्कृत – मंत्र सिद्धी, मंत्र सामर्थ्य व मंत्रोच्चार

५) इंग्रजी – गणेशोत्सव व सामाजिक ऐक्य

६) भूगोल – पर्यावरण आणि गणेशोत्सव ( प्लास्टिक, ध्वनी, नदी प्रदूषण, पर्याय )

७) मराठी – १४ विद्या ६४ कलांची अधिदेवता श्रीगणेश (संकल्पना )

८) गणित – सामाजिक, सार्वजनिक गणेशोत्सव व अर्थकारण

९) जपानी – पूर्व आशियातील गणेश पूजन

१०) इतिहास – जुन्या गणेशोत्सव मंडळांचा अभ्यास–केशरीवाडा, जोगेश्वरी, कसबा, भाऊ रंगारी, दगडूशेठ मोरया–मुलाखती, भेटी

११) हिंदी – गणेशोत्सवाचे पौराणिक महात्म्य

एकूणच सर्व कार्यक्रम म्हणजे सर्व विषयांचे अभिरुची मार्गदर्शक अध्यापक आणि त्यानुसार कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कष्टाचे प्रतीक होते.

## विद्याव्रत संस्कार

दरवर्षी इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी विद्याव्रत हा शैक्षणिक संस्कार समारंभ आयोजित केला जातो. इयत्ता आठवीचे शैक्षणिक वर्ष सुरु झाल्याबरोबरच अगदी सुरुवातीला विद्यार्थी व पालकांना व्यक्ती विकासासाठी विद्याव्रत आणि आयुष्यातील वादळवाटा ही पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून दिली जातात. एक वर्ष आधीपासून विद्यालयात विद्याव्रत पूर्वतयारी शिबिराचे आयोजन केले जाते. यावर्षी हे शिबिर दिनांक १८ डिसेंबर ते ३० डिसेंबर या कालावधीत संपन्न झाले. त्यासाठी सलग १२ दिवस गटकार्य, चांगल्या सवयी व क्षमतांची ओळख, वाचन, पाठांतर, मौनसंवाद, उपासना, पद्य, व्याख्याने, स्वच्छता, निर्मिती, सेवाभाव, सहसंवेदना इत्यादी सत्रांचे आयोजन केले गेले. दैनंदिन उपासना, युक्ताहार विहार, इंद्रिय संयमन, स्वाध्याय प्रवचन, सद्गुरु सेवा आणि राष्ट्र अर्चना या सर्व व्रतांचा अर्थ व्याख्यानांद्वारे समजावून सांगितला गेला. विद्याव्रतपूर्व शिबिर ही विद्यार्थ्यांसाठी पंचकोश विकसनाची एक संधी होती. विद्यार्थी, पालक, अध्यापक यांच्यातील सुसंवाद, मैत्री, निरीक्षण, नोंदी यामुळे विद्यार्थ्यांच्या क्षमतांची ओळख झाली.

ज्ञान प्रबोधिनीने आदर्श मानलेल्या चार राष्ट्रपुरुषांपैकी स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त दिनांक १२ जानेवारी २०२४, या दिवशी मंगलमय व शिस्तबद्ध वातावरणात विद्याव्रत संस्कार सोहळा संपन्न झाला. या समारंभासाठी प्रमुख अभ्यागत म्हणून इस्कॉनचे श्री. जगदीश मजेठिया उपस्थित होते. सर्वप्रथम विद्याव्रत उपासना झाली. यज्ञामध्ये आहुती देऊन विद्यार्थ्यांना व्रतचिन्ह दिले गेले. उपस्थित असलेल्या सर्व पालकांचे, गुरुजनांचे आशीर्वाद घेऊन विद्यार्थ्यांनी संकल्पपूर्वक विद्याव्रत घेतले. त्यानंतर सभेचा कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांनी केलेल्या काही संकल्पनांचे वाचन करण्यात आले. दोन विद्यार्थ्यांनी आणि दोन पालकांनी विद्याव्रतपूर्व शिबिर तसेच विद्याव्रत संस्कार याबद्दल मनोगत व्यक्त केले. अभ्यागतांनी विद्यार्थ्यांना केलेल्या मार्गदर्शनात विद्याव्रत उपासना पोथीतीलच काही श्लोक आणि आपले जीवन यांचा असलेला संबंध गोष्टीरूपाने सांगितला. कार्यक्रमाचा समारोप निगडी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. मनोजराव देवळेकर यांनी केला. प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

### माध्यमिक विभाग (मराठी) अभिनंदन!

- गुजराथमध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय कुडो मार्शल आर्ट स्पर्धा २०२३-२४ यामध्ये **कु. श्रावणी सोमवंशी** (इयत्ता ८ वी ब) हिने रौप्य पदक तर **चि. हरीओम बेळुंके** (इयत्ता १० वी, क) याने कांस्य पदक प्राप्त केले आहे.
- मातृमंदिर विश्वस्त संस्थेच्या राज्य स्तरीय निबंध स्पर्धेत **चि. चैतन्य दीक्षित** याला प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

# गुरुकुल विभाग

औपचारिक माध्यमिक शिक्षण विभाग

शिकायचे, मोठे व्हायचे ते कशासाठी? तर

**‘न त्वहं कामये राऽज्यं न स्वर्गं नापुनर्भवम् ।**

**कामये दु:खतप्तानां प्राणिनाम् आर्तिनाशनम् ।।’**

सत्ता, संपत्ती, मोक्ष यांच्या प्राप्तीसाठी शिकण्यापेक्षा जे दु:खाने गांजलेले आहेत, अशांच्या वेदना दूर व्हाव्यात म्हणून शिकणे अधिक श्रेयस्कर आहे. म्हणूनच गुरुकुलातील शिकण्याच्या प्रक्रियेतून ‘राष्ट्रहितार्थ व्यक्तिविकसन’ हे मुख्य सूत्र मांडलेले आहे. शिक्षणाची उद्दिष्ट्ये, प्रक्रिया हे दोन्ही भारतीय विचारधारेवर आधारित असले पाहिजेत हा गुरुकुलाचा आग्रह आहे. संपूर्ण व्यक्तिविकासाची कल्पना भारतीय विचारधारेत विविध पद्धतींनी मांडली आहे. त्यातील एक पद्धत म्हणजे ‘पंचकोश विकसन’ ही आहे. माणसाचे व्यक्तिमत्त्व पाच कोशांमधून घडत जाते. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय असे ते पाच कोश आहेत. सोप्या भाषेत या कोशांना अनुक्रमे आरोग्य, कौशल्य, जिव्हाळा, विवेक, कृतज्ञता अशी नावे देता येतील. गुरुकुलामध्ये या पाचही अंगांनी विद्यार्थ्यांचे विकसन व्हावे असा प्रयत्न गेल्या अनेक वर्षांपासून यशस्वीपणे चालू आहे.

## प्रवास राखी विक्रीचा

विविधांगी शिक्षणाचा एक भाग म्हणजे विविध कौशल्ये प्रत्यक्ष अनुभवातून विकसित करणे. म्हणूनच विभागात राखी विक्री उपक्रम दरवर्षी केला जातो. या राखी विक्री उपक्रमाचे उद्घाटन दि. १९ जुलै रोजी पुणे प्रबोधिनीतील श्री. प्रशांत दिवेकर यांच्या उपस्थितीत झाले. त्याआधी नववीच्या विद्यार्थ्यांचे राखीविक्री उपक्रमाबाबतचे व्यवस्थापन प्रशिक्षण घेण्यात आले. ज्यामध्ये आर्थिक खाते, साहित्य खाते आणि प्रचार खाते अशा रचना केल्या गेल्या. खातेनिहाय विद्यार्थ्यांनी प्रस्ताव मांडले. या प्रस्ताव मांडणीनंतर विभाग प्रमुख आदित्य शिंदे यांनी विद्यार्थ्यांना cost management, विक्रीची उद्दिष्टे, मागील वर्षाचे उच्चांक, वर्गाचे swot analysis, आव्हानांचा विचार, SOP (standard operating procedures) अशा उद्योगांमधील अनेक संकल्पना समजावून सांगितल्या.

विद्यार्थ्यांना राखीचे विविध प्रकार विक्रीसाठी मिळाले. बीजराख्या, बांबूच्या राख्या, चंदन राख्या या विक्रीच्या दृष्टीने प्रमुख आकर्षण ठरल्या. विद्यार्थ्यांनी घरोघरी जाऊन, नातेवाईकांकडे, विविध कंपन्यांमध्ये

स्टॉल लावून, दुकानाबाहेर स्टॉल लावून, बाजारामध्ये, मोठमोठ्या सोसायटीत जाऊन भरघोस विक्री केली. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी 'एक राखी पोलिसांसाठी' अशी योजना वर्गात राबवली व पोलीस बांधवांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. जमा झालेल्या रक्कमेतून निगडी पोलीस स्थानकाला पिण्याच्या पाण्याचा फिल्टर भेट देण्यात आला. कामातील प्रेरणा टिकवून ठेवण्यासाठी उद्योजिका सौ. प्रज्ञा रावल व सौ. श्रध्दा गाडेकर या 'पुणेरी सुगरण' हॉटेलच्या संस्थापिकांचा व्यक्तिपरिचय मुलाखतीच्या रुपात विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळाला.

गुरुकुलाच्या पालकांच्या गटाने राखी विक्रीच्या प्रक्रियेचे दस्तऐवज करण्याचे काम केले. प्रक्रियेपासून ते मुलांच्या मनोगतापर्यंत सर्व शब्दबद्ध करण्याचा चांगला प्रयत्न केला. इयत्ता सातवीतील चि. अचिंत्य वरदप्पा या विद्यार्थ्याने ५०,००० रुपयांची राखी विक्री करून गुरुकुलात प्रथम येण्याचा मान पटकावला. १४, ५४, ३१० अशी गुरुकुलाची एकूण विक्री झाली. महिनाभर चाललेल्या या राखी विक्रीचा बक्षीस समारंभदेखील तेवढ्याच थाटात झाला. सर्व विद्यार्थ्यांना स्नेहभोजन व त्यांनी केलेल्या विक्रीनुसार काही अंशी रोख रक्कम व पुस्तके बक्षीस रुपात देण्यात आली.

## सायकल सहल

गुरुकुलच्या पंचकोशाधारित शिक्षणात विद्यार्थ्यांचा अन्नमय कोश विकसित होण्यासाठी सायकल सहलींचे उपक्रम घेण्यात येतात. या वर्षी हा उपक्रम सातवी, आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांसाठी २७ ते २९ डिसेंबर २०२३ या कालावधीत घेतला. यासाठी निगडी – लेण्याद्री – ओझर– शिवनेरी – निगडी असा मार्ग ठरवण्यात आला.

सहलीमधे इयत्ता सातवीचे १३, इयत्ता आठवीचे २१ आणि इयत्ता नववीचे २३ विद्यार्थी असे एकूण ५७ विद्यार्थी, ६ पालक, ६ स्नातक आणि ३ अध्यापक सहभागी झाले होते. ९ विद्यार्थ्यांचा एक गट याप्रमाणे प्रत्येक गटासोबत एक अध्यापक / पालक /स्नातक गटप्रमुख म्हणून नियुक्त केले होते.

३५ किलोमीटरचा पहिला टप्पा अतिशय उत्साहात पूर्ण झाला. अष्टविनायकापैकी एक असणाऱ्या लेण्याद्रीच्या गिरीजात्मजाचे दर्शन करून सर्वांनी ओझरच्या विघ्नेश्वराचे दर्शन घेतले आणि महाप्रसादाचाही लाभ घेतला.

दुसऱ्या दिवशी शिवनेरीच्या पायथ्यापर्यंत जाऊन सायकली लावून सर्वजण गड चढले. शिवरायांच्या जन्मस्थळाचे दर्शन घेऊन तितक्याच जोशात पद्य म्हटले. पुढे निमदरीला एका विद्यार्थ्याच्या घरी स्नेहभेट झाली. तिथेच तळ्यात मनसोक्त पोहण्याचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला. विशेष प्रकारची शेवंतीची शेती पाहून दुसऱ्या दिवसाचा निवास तेथेच केला. अशा प्रकारे दोन दिवसात २२५ किलोमीटरच्या सायकल सहलीचा पराक्रम या उपक्रमाद्वारे मुलांना करता आला.

## गुरुकुलातील अवांतर वाचनाचे प्रयोग

अवांतर वाचन हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अतिशय आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन गुरुकुलात विद्यार्थ्यांना अवांतर वाचनासाठी प्रवृत्त केले जाते. गुरुकुल ग्रंथालय व शाळेच्या ग्रंथालयातून या विद्यार्थ्यांना पुस्तके मिळण्याची व्यवस्था केली जाते. पुस्तक वाचून झाले की विद्यार्थ्यांना दोन्ही ठिकाणाहून ते बदलून घेता येत होते. वाचनाची वाचन वहीत नोंद ठेवावी, ती नोंद कशी करावी? असे मार्गदर्शन वर्गाध्यापकांनी केले. विद्यार्थी काय व कोणत्या प्रकारचे वाचन करत असतात याची नोंद वाचन प्रमुख घेत होता. आठवड्यातून घड्याळी एक तास वर्गात नियमितपणे अवांतर वाचनासाठी वेळ देण्यात आला. याव्यतिरिक्त मोकळ्या तासाला, सुट्टीच्या दिवशी व रोज किमान १० मिनिटे वर्तमानपत्र, मासिके, ग्रंथ इत्यादींचे वाचन कसे करता येईल? याविषयी संवाद साधण्यात आला. यावयात आवर्जून वाचावीत अशा ‘मोरी गाय, मृदू भाव जागे होता, पियुची वही, गोष्टीरूप आप्पा, एक होता कार्व्हर, वामनाचार्य, स्वा. विनायक दामोदर सावरकर, तोत्तोचान, राष्ट्रद्रष्टे विवेकानंद, भगिनी निवेदिता, सागरतीरी, दास डोंगरी राहतो, स्वीकारशील स्वदेशी, सखा आत्मसंवाद, विवेकानंदांचे उतारे इ. पुस्तकांची नावे आग्रहपूर्वक सुचविण्यात आली. त्याचबरोबर वर्गानुसार प्रत्येक वर्गात अध्यापकांनी काही पुस्तकांचे प्रकट वाचन व त्यावर मुक्त चर्चा घडवून आणली.

## एका जनार्दनी - वार्षिक स्नेहसंमेलन

**धन्य जगी तोची एक हरी रंगी नाचे ।**
**रामकृष्ण गोविंद सदा स्मरे वाचे ।।**

‘एका जनार्दनी’ अर्थात संत एकनाथांचे जीवनचरित्र या विषयावर गुरुकुलाचे स्नेहसंमेलन पार पडले. अवघ्या १५ दिवसांमध्ये दर्जेदार अभिनयासहित ही सुंदर कलाकृती सादर करण्यात आली. मुक्तिसोपान संगीत विभागातील अध्यापकांचे सहकार्य या कलाकृतीला लाभले. रंगभूषा, वेशभूषा ही जबाबदारी गुरुकुलातील पालकांनी सांभाळली. ही सगळी कथा गुरुकुल विभागप्रमुख आदित्य शिंदे यांच्या लेखणीतून सिद्ध झाली होती. अभंग, गौळण, भारुड, या माध्यामतून संत एकनाथांनी केलेले समाज प्रबोधन नृत्यनाटिकेद्वारे सादर केले. कार्यक्रमाला साजेशी रांगोळी व्यासपीठ सजावट या सर्वांनी कार्यक्रमाची शोभा वाढली. २०० विद्यार्थी, १५ अध्यापकांनी या सादरीकरणात सहभाग नोंदवला. या संमेलनास राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक ह.भ.प. श्री. किसन महाराज चौधरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाअंती त्यांनी हेच संमेलन तिकीट ठेवून ग. दि. माडगुळकर, बालगंधर्व नाट्यमंदिरात सादर करूया या शब्दात सर्वांचे कौतुक केले. यावरूनच संमेलनाचे महत्त्व, यश अधोरेखित होते. एका पालकांनी नाव न घेण्याच्या अटीवर पंधरा हजाराचे पारितोषिक देऊ केले.

# क्रीडाकुल विभाग

औपचारिक माध्यमिक शिक्षण विभाग


## हिवाळी शिबिर

हिवाळा हा ऋतू आरोग्य व बलसंवर्धनाच्या दृष्टीने सर्वात उपयुक्त असा ऋतू. आल्हाददायक, पोषक वातावरणात शारीरिक कसरतींमुळे झालेल्या श्रमांची झीज लवकर भरुन येणारा हा कालखंड. म्हणूनच शुक्रवार दि. १ डिसेंबर ते शनिवार ३० डिसेंबर २०२३ या कालावधीत इयत्ता पाचवी ते नववीचे अर्धनिवासी शिबिर घेण्यात आले. राष्ट्रीयस्तर विजेते खेळाडूंच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. एकूण १४६ विद्यार्थी या शिबिरात सहभागी होते.

खेळातील यशाची कमान सातत्याने उंचावत ठेवणे हे खेळाडू व प्रशिक्षकांसाठी असणारे मोठे आव्हान असते. यासाठी आवश्यक असतो तो न थकता केलेला सातत्यपूर्ण सराव. अशा सरावादरम्यान स्नायूंची ताकद उत्तम असणे आवश्यक असते. सराव करताना तसेच स्पर्धेत स्नायूंना एकच क्रिया न थकता सातत्याने करता यावी यासाठी स्नायूंचा दमदारपणा (muscle endurance) हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून शिबिराची रचना करण्यात आली होती. त्याप्रमाणे विविध व्यायामप्रकार, आहार, पंचकर्म उपचार व औषधोपचार यांचे नियोजन केले गेले.

पहिला आठवडा खेळातील तंत्र शिकताना शरीर रचना कशी असावी याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले गेले. दुसऱ्या आठवड्यात स्नायूंचा दमदारपणा वाढवण्यासाठी विश्रांतीचा व व्यायामाचा योग्य मेळ साधून नियोजन केले गेले. तिसऱ्या व चौथ्या आठवड्यात स्नायूंची वाढ होण्यासाठी विश्रांतीचा काळ कमी करून व्यायामाचा काळ (Intensity) वाढवला. क्रीडा प्रशिक्षणाचे असे चार आठवड्यामध्ये नियोजन केले होते. यासाठी मैदानावर हाताच्या व्यायामामध्ये स्वतःचे शरीर हेच वजन वापरून व्यायाम प्रकार व ससाहित्य व्यायाम प्रकार घेतले गेले. याबरोबरीने योग माध्यमातून शरीराची लवचिकता वाढवण्याचे व्यायाम आणि सर्किट ट्रेनिंगच्या माध्यमातून कमी कालावधीत सर्व प्रकारच्या स्नायूंच्या व्यायामासाठी आवश्यक ते व्यायाम प्रकारही घेण्यात आले.

**संध्याकाळ सत्र :** मल्लखांब, जिम्नास्टिक हे खेळ वर्षभराच्या कालावधीमध्ये सर्वांनाच खेळता येत नाहीत. पण तो सर्वांग व्यायामाचा प्रकार असल्याने प्रत्येकाला येणे गरजेचे आहे म्हणून शिबिर काळात हे खेळ शिकवण्यात आले. याबरोबरीनेच दांडपट्टा, कुडो, बॉक्सिंग यासारख्या स्वसंरक्षणात्मक खेळांचेही प्रशिक्षण




मुलांना दिले गेले.

या प्रशिक्षणाचे मूल्यमापन करण्यासाठी शिबिरात पूर्व व उत्तर चाचणी घेण्यात आली. यातून शिबिराचे उद्दिष्ट किती टक्के साध्य झाले हे समजले. पूर्ण शिबिरामध्ये विद्यार्थी-खेळाडूंच्या हाताची, पायाची व पोटाची ताकद यामध्ये अनुक्रमे ३५%, २४% व ४१% वाढ दिसून आली. फक्त २८ दिवसांच्या या शिबिरामुळे उल्लेखनीय वाढ झालेली दिसून आली.

**आरोग्य विभाग : –**

- स्नायूंची ताकद वाढविण्यासाठी संपूर्ण महिन्याच्या आहाराचे नियोजन करून भोजन कक्षात लावण्यात आले.
- मैदानानंतर भरपूर भूक लागलेली असताना योग्य पोषणमूल्य असलेला संपूर्ण आहार सकाळी देण्याचे नियोजन यावर्षी पहिल्यांदाच केले गेले. भोजनानंतर विश्रांतीचीही योजना करण्यात आली होती.
- अन्नाचे योग्य पचन व्हावे तसेच बलवर्धन व्हावे यासाठी जेवणानंतर औषधांची योजना करण्यात आली होती.
- पंचकर्म उपचारांचे इयत्तानिहाय वेळापत्रक तयार करून त्यानुसार स्नेहन – स्वेदन, बस्ती या उपक्रमांची योजना करण्यात आली. तर दररोज विश्रांतीच्या वेळेत नस्य व धूपन उपक्रम सुरु ठेवण्यात आला.
- श्रमपरिहार म्हणून रोज संध्याकाळच्या मैदानानंतर खर्जूरादी मंथ हे आयुर्वेदिक सरबत दिले गेले.
- मुलांची आवड-निवड बाजूला ठेवून सहभोजनात सर्व पदार्थ खाण्याची सवय त्यांना लावता आली.

**मानस सत्र :** स्नायूंचा दमदारपणा (muscle endurance) हा हिवाळी शिबिराचा हेतू मुलांपर्यंत पोहोचविणे आणि त्यातूनच शिबिराबाबत गांभीर्य वाढवणे यासाठी महिनाभर मानसिक सत्रांचे नियोजन केले.

काही वेळा वर्गवार संवाद, गटातील संवादाबरोबरच पालक संवाद व त्यांचे प्रतिसादही नोंदवून घेण्यात आले. इयत्ता पाचवी ते सातवीच्या वर्गांसाठी विविध बौद्धिक खेळ, खेळाडूंचा परिचय अशी विषयांची विविधता ठेवून तास घेण्यात आले. काही खेळाडूंमधील नेतृत्व गुण लक्षात घेता शिबिरामधील जबाबदाऱ्या त्यांना देण्यात आल्या. त्याचबरोबर काही खेळांच्या राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा चालू असल्याने खेळाडूंसाठी मानसिक प्रशिक्षण सत्रे घेतली गेली. तसेच विविध सायकॉलॉजिकल अँपरेटसच्या साहाय्याने खेळाडूंना स्पर्धेपूर्वी मार्गदर्शन केले गेले.

**दैनंदिनी लेखन :** शिबिरातील नवीन, वेगळा अनुभव स्वतःच्या शब्दात लिहिता येणे या उद्देशाने दैनंदिनीसाठी रोज स्वतंत्र वेळ दिला गेला. प्रार्थनेच्या वेळी होणाऱ्या संवादात दैनंदिनी कशी लिहायची याविषयी मुलांशी संवाद साधण्यात आला.

**पालक सहभाग :** शिबिरात पालकांचाही सहभाग असावा या हेतूने शिबिरापूर्वीच पालकांच्या सोयीनुसार भोजन व्यवस्था व आरोग्य उपचारासाठी पालकांची मदत घेतली गेली. त्यानिमित्ताने पालक संपर्क व संवाद होत गेला.

## गृहभेटी

यंदाच्या वर्षी अधिकाधिक विद्यार्थ्यांच्या गृहभेटी करण्याचा विभागाचा एक संकल्प होता. वर्ग शिक्षकांनी व अधिमित्र यांनी गृहभेटी कराव्यात असे ठरले.

**गृहभेटीचा उद्देश:–**

१. विद्यार्थी पालक व शिक्षक यांच्यामधील नातेसंबंध दृढ व्हावेत.

२. विद्यार्थ्यांमध्ये काही वर्तन समस्या जाणवत असल्यास त्याही संदर्भात पालकांशी सविस्तर संवाद व्हावा. व विद्यार्थ्यांच्या वर्तन बदलामध्ये सकारात्मक बदल व्हावा.

३. तसेच पालक संघटन उत्तम व्हावे व शाळेतील विविध उपक्रमांमध्ये पालकांचेही सहकार्य लाभावे.

इयत्ता पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांच्या मिळून एकूण ५७ गृहभेटी झाल्या. विशेष म्हणजे इयत्ता दहावीच्या सगळ्या विद्यार्थ्यांच्या गृहभेटी वर्गशिक्षकांनी केल्या.

**काय साध्य झाले:**

- कुटुंबातील वातावरण समजले.
- कुटुंबातील व्यक्तींची नव्याने ओळख झाली.
- कुटुंबातील व्यक्ती, विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये छान नाते निर्माण झाले.
- कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज आला.

- विद्यार्थ्यांच्या खेळातील, अभ्यासातील किंवा वर्तनातील समस्या जाणवत असतील तर त्या संदर्भात पालकांशी मोकळा संवाद होऊन विद्यार्थ्यांच्या या समस्या दूर होण्यास मदत झाली.
- विशेषतः इयत्ता आठवी, नववी आणि दहावीच्या गृहभेटी ह्या जास्त परिणामकारक झाल्या असे जाणवले.

पुढील वर्षातही गृहभेटी अशाच सतत करत राहू असा अध्यापकांनी निश्चय केला आहे.

## अधिमित्र योजना

निगडी केंद्रात यंदाचे शैक्षणिक वर्ष अधिमित्र वर्ष म्हणून जाहीर झाले होते. पण क्रीडाकुलात अधिमित्र योजनेवर २०१६ पासूनच काम सुरू होते. मा. संज्योत देशपांडे व मा. मुकुलिकाताईंच्या मार्गदर्शनानंतर क्रीडाकुलात अधिमित्र तासिकेचे दर महिन्याचे विषय ठरविण्यात आले. या प्रक्रियेत प्रामुख्याने पुढील उद्दिष्टांचा विचार केला गेला.

१. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वास पूरक रचना बसवणे.

२. मुलांना स्वतःच्या क्षमतांची जाणीव करून देणे.

३. पालक व पाल्य यांसोबत साहचर्य अधिक दृढ करणे.

इयत्तानुसार विषय ठरवले गेले. यात हसत खेळत बुद्धी विकास, सामाजिक जाणीव संवर्धन आणि छात्र प्रबोधन साहित्याचा वापर केला गेला.




**कोईमतूर येथील ३८व्या नॅशनल ज्युनियर ॲथलिटेक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत श्रावणी सणस हिने उंच उडी क्रीडा प्रकारात सुवर्णपदक संपादन केले.**

# संगणक विभाग

अनुभव शिक्षण विभाग

**आधुनिकातले आधुनिक...** या उक्तीनुसार निगडी केंद्राचा संगणक विभाग गेल्या २५ वर्षांपासून विद्यालयातील प्रत्येक विद्यार्थी संगणक साक्षरतेबरोबरच डिजिटल साक्षर व्हावा यासाठी काळानुरूप सुसंगत अशी आधुनिक प्रशिक्षण योजना राबवीत आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबरच इतर शाळेतील विद्यार्थी, अध्यापक व परिसरातील नागरिक यांनी देखील आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे यासाठी कार्यशाळा, प्रशिक्षणे, व्याख्याने या माध्यमातून संगणक विभाग मार्गदर्शन करीत आहे. जिल्हास्तरीय संगणक बुद्धिमत्ता स्पर्धेमार्फत शहरी शाळांबरोबरच ग्रामीण भागातील शाळांमध्येही संगणक साक्षरता व्हावी यासाठी विभाग प्रयत्नशील आहे. गेल्या १४ वर्षांपासून संगणक हे साधन म्हणून स्वत:च्या व इतरांच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी कसे वापरावे याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना दिला जात आहे.

## प्रवास रौप्य महोत्सवी वर्षापर्यंतचा...

१९९९ साली ४ संगणकापासून स्थापन झालेल्या संगणक विभागाचे यंदाचे **रौप्य महोत्सवी वर्ष** होते. या २५ वर्षात विभागामार्फत संगणक साक्षरतेसाठी अनेक उपक्रम, कार्यशाळा, स्पर्धा, प्रकल्प राबविण्यात आले. या प्रवासाचे चित्ररूपी वर्णन **कालरेषेच्या स्वरूपात** एका फलकावर रेखाटण्यात आले होते. कोणत्याही प्रकारची डिजिटल छपाई न करता विभागातील सर्व अध्यापकांनी एकत्रितपणे ही कालरेषा हाताने तयार केली.

## अधिमित्र योजना

संगणक विभागात इयत्ता तिसरीपासून पुढील सर्व वर्गांचे विद्यार्थी प्रशिक्षण घेण्यासाठी आठवड्यातून ठरविलेल्या वेळेनुसार येत असतात. संगणकाधारित विकसन प्रकल्प तसेच अभिरुची योजनेतील अनेक विद्यार्थ्यांशी वेगवेगळ्या विषयांवर वेळेपलीकडे जाऊन व्यक्तिगत संवाद होत असतो. यालाच अनुसरून यावर्षी केंद्राच्या **अधिमित्र** विषयांतर्गत 'विशेष अभिरुची योजना' राबविण्यात आली. यामध्ये इयत्ता आठवीपासून पुढील वर्गाचे व संगणकाधारित विकसन प्रकल्पाचे माजी विद्यार्थी असे एकूण **६३ विद्यार्थी** वर्षाच्या सुरुवातीला नावनोंदणी करून सहभागी झाले होते. यामध्ये विद्यार्थ्यांचे तीन गटात विभाजन करण्यात आले होते.

**१. चला अनुभव घेऊया –** या गटात विद्यार्थ्यांनी नवीन उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा अध्यापकांबरोबर अभ्यास

केला. यात त्यांना नवीन शिकायला तर मिळालेच पण याबरोबरीनेच अभ्यासातून प्रकल्प निर्मितीचा अनुभवही विद्यार्थ्यांनी घेतला.

२. **डिजिटल जागृती –** या गटातील विद्यार्थ्यांनी सोशल मिडीया, मोबाईल गेम, मोबाईलचा वाढता वापर, स्क्रीन टाइम कमी करणे अशा विषयांवर विद्यार्थ्यांना गप्पांच्या स्वरूपात मार्गदर्शन केले.

३. **नॉलेज ट्रान्सफर –** या गटातील विद्यार्थ्यांना छोट्या स्वरूपातील प्रशिक्षण देण्यासाठी तयार केले होते. त्यांनी पूर्व प्राथमिक व प्राथमिक गट क्र. १ च्या अध्यापकांना ४ स्तरावर प्रशिक्षण दिले. मायक्रोसॉफ्ट वर्डमध्ये वृत्त कसे लिहायचे, फॉरमॅटिंग कसे करायचे, टेबल्स कसे तयार करायचे हे प्रशिक्षणाचे विषय होते.

इयत्ता सातवीनंतर फक्त अभिरुचीचे विद्यार्थी विभागात येत होते, यावर्षीच्या या योजनेमुळे आठवी ते दहावीचे अनेक विद्यार्थी संगणक विभागाशी जोडले गेले. यातील प्रत्येक विद्यार्थ्याचा विभाग प्रमुख अनुजा ताईशी संवाद होत होता.

### NIELIT - केंद्र सरकार मान्यताप्राप्त डिजिटल लिटरसी परीक्षा

२०२२ साली संगणक विभागाच्या यशामध्ये एक मानाचा तुरा रोवला गेला. केंद्र सरकारच्या योजनेतील National Institute of Electronics IT (NIELIT), New Delhi (Ministry of Electronics and Information Technology, Government of India) या विभागामार्फत Digital Literacy Course च्या Facilitation Center ची मान्यता मिळाली आहे.

यावर्षी ACC, BCC व CCC परीक्षेसाठी विद्यार्थी बसले होते. विभागाद्वारे इच्छुक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. भवितव्य लेखातील ठरविलेल्या उद्दिष्टाकडे जाण्यासाठी हे पुढचे पाउल आहे.




**संगणक विभाग रौप्यमहोत्सवानिमित्त साकारलेली कालरेषा**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये ACC परीक्षेसाठी इयत्ता सहावीचे २६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. BCC परीक्षेसाठी इयत्ता सातवी, आठवी व नववीचे ४३ विद्यार्थी बसले होते. CCC परीक्षेसाठी इयत्ता आठवीचे ५ विद्यार्थी बसले होते.

२०२२ पासून आतापर्यंत ११७ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली आहे.

## विद्याव्रत पूर्वतयारी शिबिर

नमस्कार, माझी मुलगी आत्मजा महाजन इयत्ता आठवीमध्ये आहे. विद्याव्रत शिबिराबद्दल शाळेतील मुलांकडून खूप ऐकले होते. त्यामुळे माझ्या मुलीच्या शिबिराची सुरुवात झाल्यापासून मला खूप बारकाईने सर्व उपक्रमाबद्दल जाणून घ्यायची तिच्या एवढीच उत्सुकता मलाही होती.

या शिबिरातील मी ऐकलेली सर्व व्याख्याने मला खूप आवडली. मी माझ्या मुलीशी रोजच्या व्याख्यानानंतर तिने काय शिकले व त्यानुसार ती काय करणार यावर चर्चा करायचे. मौनसंवाद लेखनामुळे मुलांचा निसर्गात रमण्याचा अनुभव घेता आला व त्यांच्या आकलनशक्तीला चालना मिळाली. सर्व व्याख्याने आपल्या आयुष्याला परिपूर्ण बनवण्याच्या दृष्टीनेच होती.

रोजची दिनचर्या तिने सुनिश्चित केली. अजूनही त्यानुसारच तिची वर्तणूक आहे, असे मला जाणवते. तिच्यातील आहाराविषयी झालेले बदल पाहून 'अन्न हे पूर्णब्रह्म' ही पंक्ती मला आठवते. ताटात मिळालेले अन्न ते जिभेला आवडो वा नावडो, आपण खावे, हे ती शिकली आहे.

शिबिरात दिवसाची दिनचर्या शिस्तबद्ध आखलेली होती. सकाळच्या व्यायमापासून ते संध्याकाळच्या स्वच्छतेपर्यंत सारे उपक्रम खूप छान होते. शिबिरातील व्यायाम व योगासनामुळे मुलांना क्रीडास्पर्धेत त्रास झाला नाही. त्यांच्यातील खेळाडू जागृत होऊन आपले पथक कसे जिंकणार, यासाठीची एकी सर्वांमध्ये दिसून आली. निर्मिती कौशल्यांच्या तासातील पेन स्टँड वर नक्षीकाम करणे व ते एखाद्याला बाजारात मिळू शकेल अशा दर्जाचे कसे तयार करावे याचा अनुभव मुलांनी घेतला.

स्वसंरक्षणाचे वर्ग देखील खूप छान राबविण्यात आले. त्यातील लाठीकाठीचा प्रयोग व कुडोचे प्रयोग घरी आल्यावर आमच्यावरही व्हायचे. विद्याताईचा दररोजचा संचालनाचा कार्यक्रम प्रत्येक विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने व्हायचा. शिबिरातील कामायनी शाळेतील स्थळ भेटीचा एक आगळा-वेगळा अनुभव माझ्या मुलीने घेतला. मतिमंद विद्यार्थ्यांचे विश्व, त्यांचे आचार-विचार, त्यांना आपल्यातलेच मानून त्यांच्यासोबतचे जे क्षण तिने अनुभवले त्याचा परिणाम म्हणून तिने देवाचे खूप आभार मानले व आपल्या क्षमता विकसित कशा करणार यावर लक्ष केंद्रित करणार असा निश्चय केला.

व्याख्यानमालेतील गोपदीदास प्रभूंचे 'Does God Exist' हे व्याख्यान तिला खूप आवडले. आणि त्यावर खूप चर्चाही केली. ती सध्या 'Lean In' हे पुस्तक वाचत आहे. या पुस्तकात स्त्रीची सामाजिक व वैयक्तिक परिस्थितीशी कशी झुंज करावी, यावर सविस्तर सांगितले आहे. तिने केलेल्या काही संकल्प बद्दल तिला विस्मरण झाल्यास, त्याची आठवण मी तिला करून द्यावी असेही तिने मला सांगितले.

एकंदरीत हे शिबिर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने खूप उपयुक्त ठरले.

**– सौ. दीपमाला महाजन**

(माध्यमिक विभाग इंग्रजी माध्यम पालक)

# मुक्तिसोपान संगीत विभाग

अनुभव शिक्षण विभाग

## वह्नि तो चेतवावा

ज्ञान प्रबोधिनी निगडी आणि PCET Infinity (९०.४ FM) यांच्या संयुक्त विद्यमाने 'वह्नि तो चेतवावा' हा प्रकल्प राबविण्यात आला. ज्ञान प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी डॉ. राजीव नगरकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या प्रकल्पाच्या निमित्ताने ५२ देशभक्तीपर गीते तसेच स्फूर्तीगीतांचे ध्वनिमुद्रण करण्यात आले. एका सप्ताहात प्रतिदिवशी ३ वेळेस, म्हणजेच एकूण २१ वेळेस एक गीत श्रोते ऐकू शकत होते. काही गीतांच्या निरूपणाची संधी श्री. नागेश जोशी, सौ. राजश्री मराठे अशा निगडी केंद्राच्या सदस्यांनीही घेतली. या गीतांचे निरूपण देखील राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्तबुवा आफळे, राहुल सोलापूरकर आदी दिग्गजांनी केले आहे. यानिमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये विविध शाळांमधील संगीत अध्यापकांशी संपर्क करण्यात आला. या खेरीज अनेक विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ध्वनिमुद्रणालयात आपले गीत ध्वनिमुद्रित करण्याची संधी मिळाली. १५ ऑगस्ट २०२३ ते १५ ऑगस्ट २०२४ अशा संपूर्ण वर्षभर चालणाऱ्या या प्रकल्पातील सर्वही ५२ गीतांचे ध्वनिमुद्रण पूर्ण झाले आहे. साधारणपणे २५० जणांनी या प्रकल्पात सहभाग नोंदवला. १४ शाळांतील सुमारे २०५ विद्यार्थी, ८ तबला वादक, १३ संवादिनी वादक, ७ तालवाद्य वादक, १२ मार्गदर्शक अध्यापक यांनी या प्रकल्पात आपले योगदान दिले.

## प्रबोधन गीते रेकॉर्डिंग

ज्ञान प्रबोधिनीच्या प्रत्येक कार्यक्रमात तसेच नित्याच्या कामात देखील प्रबोधन गीते गायली जातात. सामूहिकरित्या म्हणता येतील अशा गीतांच्या चालींचे प्रमाणीकरण करून त्याचा सर्वत्र प्रसार करण्याच्या उद्देशाने काही प्रबोधन गीतांचे रेकॉर्डिंग यंदाच्या वर्षी दोन टप्प्यात करण्यात आले. पहिल्या टप्प्यात(ऑक्टोबर २०२३) दहा तर दुसऱ्या टप्प्यात(एप्रिल २०२४) दहा गीते रेकॉर्ड करण्यात आली. या प्रकल्पाला श्री. मिलिंद संत यांनी मार्गदर्शन केले.

**माध्यमिक विभाग (मराठी)** **अभिनंदन!**

- भूगोल परीक्षा केंद्र यांच्या वतीने राज्य पातळीवर घेण्यात आलेल्या भूगोल प्रज्ञाशोध परीक्षेत इयत्ता नववी ब मधील **कु. शर्वरी गुर्जर** हिला १०० पैकी १०० गुण मिळालेले आहेत. राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमध्ये तिचा समावेश झाला.

# ग्रंथालय

अनुभव शिक्षण विभाग

## सरस्वती पूजन

दिनांक १९ ऑक्टोबर २०२३ रोजी ग्रंथालयात सरस्वती पूजनाचा कार्यक्रम झाला. यावेळी प्राचार्य सौ.विद्याताई उदास यांनी नवरात्रीतील देवीच्या विविध रूपांची माहिती सांगितली व ग्रंथालयात सरस्वती पूजनाचे महत्त्व सांगितले. इयत्ता नववी दहावीचे मराठी अभिरुचीचे विद्यार्थी व अध्यापक पूजनासाठी उपस्थित होते.

## कै. वि. अ. जोशी यांचा स्मरणदिन

दिनांक २८ जुलै २०२३ रोजी ग्रंथालयात कै. वि. अ. जोशी यांचा स्मरणदिन झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अभ्यागत म्हणून वि. अ. जोशी याचे चिरंजीव श्री. प्रकाश जोशी हे उपस्थित होते. ग्रंथालयात कै. वि. अ. जोशी यांच्या प्रतिमेला पुष्प समर्पण करण्यात आले. सभेचा कार्यक्रम मनोहर सभागृहात झाला. वाचन या विषयावर श्रीमती उषाकिरण सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री. प्रकाश जोशी सरांनी विद्यार्थ्यांना कै. वि. अ. जोशींविषयी माहिती दिली तसेच विद्यार्थ्यांना विविध ग्रंथालयांविषयी माहिती सांगितली. या कार्यक्रमांमध्ये काव्यवाचन व अभिवाचन स्पर्धेत यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक प्रमुख अभ्यागतांच्या हस्ते करण्यात आले.

### माध्यमिक विभाग (मराठी) अभिनंदन!

- छात्र प्रबोधनतर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय अभिवाचन स्पर्धेत विद्यालयाला तृतीय क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले. या स्पर्धेत चि. चैतन्य दीक्षित, चि. सिद्धेश जोशी, कु. जान्हवी लिंगडे, कु. पर्णवी कुलकर्णी, कु. महेश्वरी जोशी, कु. अदिती परळे, कु. सुरभी चंद्रशेखर, कु.आर्या जयतीर्थ, कु. मुक्ता देशमुख हे विद्यार्थी सहभागी झाले होते.

अनुभव शिक्षण विभाग

# अनुभव अभिरुची
# जैवतंत्रज्ञान



नव्याने उदयास येणाऱ्या तंत्रज्ञानाची विद्यार्थ्यांना तोंडओळख असणे गरजेचे आहे. त्यासाठी बायोरोबोटिक्स कार्यशाळेचे नियोजन करण्यात आले होते. रोबोटिक्स संशोधनामध्ये जैविक पद्धतीचा आपण कसा संदर्भ घेऊ शकतो? या प्रश्नाचे उत्तर म्हणून ही कार्यशाळा घेण्यात आली. बायोरोबोटिक्स तंत्रज्ञान हे रोबोटिक्स, बायोनिक्स, बायोइंजिनीअरिंग, वैद्यकीय शोध, जीवशास्त्र आणि अवकाश संशोधनासाठी महत्वपूर्ण योगदान देणारे आहे. याचा विचार करून जैवतंत्रज्ञान, संगणक आणि जीवशास्त्र अभिरूची गटातील एकूण ७९ विद्यार्थ्यांसाठी या कार्यशाळेचे आयोजन केले गेले. मा. विरेंद्र डोईजड (इलेक्ट्रिकल इंजिनिअर, डी स्मार्ट सायन्स, रोबोटिक फर्म ओनर), स्वातीताई डोईजड (मायक्रोबायोलोजी, १७ वर्षांचा शिक्षण क्षेत्रातील अनुभव) आणि राधिका डोईजड (इलेक्ट्रॉनिक्स, टेलिकम्युनिकेशन इंजिनीअर, क्रीडाकुल निगडी माजी विद्यार्थिनी) याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

सुरुवातीला विविध कार्टून्स, फिल्म्स यांचे छोटे व्हिडिओज दाखवण्यात आले, ज्यात अनेक रोबो विविध कामे करताना दाखवल्याने विद्यार्थ्यांची उत्सुकता वाढत होती. बायोरोबोटिक्स आणि बायोमीमिक संकल्पनामधून रोबोट्स कसे तयार केले जातात याची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली गेली. जैविक डी. एन्. ए. प्रमाणे डिजिटल डी. एन्. ए. मॉडेल हे जिनेटिक डायग्नोसिस मध्ये कसे काम करू शकते याचा परिचय विद्यार्थ्यांना करून देण्यात आला. तसेच ब्रेन न्यूरॉन्स नेटवर्क कॉपी करून आर्टिफिशिअल न्यूरॉन्स नेटवर्क कसे तयार केले जाते याची माहिती विद्यार्थ्यांना सादरीकरणाद्वारे देण्यात आली.

प्रत्यक्ष कृतिसत्रात विद्यार्थ्यांना सुरुवात म्हणून रोबो हँड मॉडेल तयार करण्यास दिले गेले. मॉडेल किट्स मधील अगदी छोटे छोटे पार्टस नाजूकपणे हाताळून, निवडून मॉडेल बनवायचे होते. प्रत्येक विद्यार्थी अगदी गुंतून जाऊन काम करताना दिसत होता. कार्यशाळेत, विद्यार्थ्यांचे प्रश्न मार्गदर्शक तिथल्या तिथेच सोडवत असल्याने अगदी अवघड कृती सोपी झाली. विविध क्षेत्रांमध्ये बायोरोबोटिक्सचा वापर करून कसे प्रश्न सोडवता येतील? याच्यावर विद्यार्थ्यांचा विचार सुरु झाला यातच कार्यशाळेचे यश दिसून आले.

# संवेद विभाग

**संशोधन व विस्तार कार्यदिशा**

## वर्ग संवाद - क्रीडाकुल तासिका

सहावी आणि सातवी क्रीडाकुल विभागासाठी मानस तासिका आठवड्यातून एक दिवस वर्षभर घेण्यात आल्या. यात क्षमता संवर्धन, मैत्री, स्वनियमन, मनाची ताकद, नातेसंबंध असे विविध विषय घेण्यात आले. त्याचबरोबर काही कथा आणि त्यांना सोडून कृती खेळ घेण्यात आले. ह्या तासिका घेत असताना मुलांमध्ये मैत्रीचे छान नाते तयार झाले.

**क्रीडाकुलसाठी नवीन प्रवेश** घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची मानस चाचणी घेण्यात आली. या चाचणीमध्ये वन टू वन, ग्रुप चाचणी या दोन उपचाचण्या होत्या. आरतीताई खोत यांच्यासोबत हे काम पूर्ण करण्यात आले.

क्रीडाकुलाच्या सहावी आणि सातवी वर्गाच्या वर्षभराच्या तासांमध्ये निरीक्षण नोंदींचा निकाल देण्याचे काम पूर्ण करण्यात आले.

**वर्गसंवाद – घरकुल तासिका :** मराठी व इंग्रजी माध्यमाच्या सातवीच्या सर्व वर्गांची संवेद विभागातर्फे वर्गसंवाद ही तासिका वर्षभर घेण्यात आली. यातही क्रीडाकुलप्रमाणे सर्व विषय घेतले गेले.

या सर्व तासिका घेण्यासाठी पुरेशी पूर्वतयारी करण्यात आली. कृती खेळ घेत असताना सर्व वर्गाचा सहभाग असेल अशी रचना करण्यात आली.

**वर्गसंवाद :** प्राथमिक विभागात पहिलीच्या व दुसरीच्या वर्गात निरीक्षणासाठी दर शनिवारी प्रत्येकी एक वर्ग घेऊन वर्गशिक्षक व मुलं या दोघांचेही निरीक्षण करून टिपण वहीत नोंदण्यात आले. हे करत असताना लहान मुलांच्या समस्या समजल्या. अध्यापकांच्या वागण्याचा विद्यार्थ्यांवर होणारा आणि विद्यार्थ्यांच्या वर्तनाचा अध्यापाकांवर होणारा परिणाम या दोन्हींचे निरीक्षण करता आले.

हे सर्व करत असताना शिक्षकांशी होणारा नियमित संपर्क आणि संवाद त्याचबरोबर वर्गसंवादातून मुलांशी जवळीक वाढली.

दर आठवड्याला एक तासिका याप्रमाणे सर्व विभागातील वर्गांच्या मिळून वर्षभरात वर्ग संवादाच्या १३१ तासिका घेतल्या गेल्या.

## वर्गमित्र

विद्यार्थ्यांच्या वर्तन समस्या ओळखण्यासाठी आणि प्राथमिक वयोगटातील विद्यार्थ्यांना व्यक्त होताना

येणाऱ्या अडचणी समजून घेण्यासाठी संवेद गट व पालक गट मिळून वर्गमित्र हा उपक्रम दर वर्षी राबवला जातो. यावर्षी सहा वर्गांमध्ये या तासिका झाल्या. एकूण १५ पालकांचा नियमित सहभाग वर्षभर होता. मुलांशी गप्पा, झालेल्या उपक्रमांच्या चर्चा व मुलांच्या प्रश्नांची वेळोवेळी उत्तरे देणे असे संवादाचे स्वरूप होते. पूर्वतयारीसाठी ऑनलाईन व प्रत्यक्ष बैठका झाल्या, यावर्षी या उपक्रमाला व गटाला पाच वर्षे पूर्ण झाली.

**व्यक्तित्त्व शोधिका चाचणी –** आठवीच्या व नववीच्या इंग्रजी व मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी घेतली गेली. नवीन सदस्यांनी चाचणीचे काम शिकून घेतले. तसेच या सर्व चाचण्यांची माहिती संगणकावर भरण्याचे कामही केले.

### मॉरिस -

प्राथमिक स्तरावरच विद्यार्थ्यांच्या वर्तन समस्या समजून घेऊन त्यावर वेळीच उपाययोजना शोधण्यासाठी यावर्षीपासून मॉरिस संस्थेची मदत घेण्यात आली. त्यापूर्वी मॉरिस फौंडेशनतर्फे पालक सभा घेण्यात आली. या बैठकीत पहिली ते सातवीपर्यंतचे मोजके विद्यार्थी ज्यांना अभ्यास करण्यात अडचणी येतात अशा विद्यार्थ्यांचा व पालकांचा सहभाग होता. एकूण ४४ विद्यार्थ्यांवर काम झाले. मुलांच्या समस्या समजून घेत त्यांची केस हिस्टरी जाणून घेण्यात आली. यादरम्यान मॉरिसच्या शिक्षिका सोनालीताई यांच्याशी वेळोवेळी संवाद साधण्यात आला. अध्यापक व पालकांसोबत जागृतीसाठी सत्रे झाली.

### कलचाचणी –

गेल्यावर्षी प्रमाणेच यावर्षी देखील कल चाचणीचे काम उद्दिष्टानुसार पूर्ण झाले. सुमारे २२० विद्यार्थ्यांची कलचाचणी घेण्यात आली.

### माध्यमिक विभाग (मराठी) अभिनंदन!

- आंतरविभागीय राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये पुणे मुलींच्या संघाने उपविजेतेपद मिळवले. या संघात इयत्ता नववीतील कु. समृद्धी वाघ, कु. मनस्वी पाटोळे, कु. तन्वी भोसले या विद्यार्थींनी सहभागी झाल्या होत्या.
- छात्र प्रबोधनतर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय हस्तलिखित स्पर्धेत विभागाला प्रथम क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले यात कु. अनन्या माजगांवकर, कु. अदिती परळे, कु. सुरभी चंद्रशेखर, कु. दिशा शिरसाट, कु. शिवानी कोळपकर, कु. शर्वरी गुर्जर, कु. पूर्वा शिंदे, कु. समिक्षा ईटकर या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.
- कलापिनी संस्थेतर्फे घेण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय वाचिक अभिव्यक्ती स्पर्धेमध्ये कु. अदिती परळे हिला वाचिक अभिनयात प्रथम क्रमांक, कु. आराध्या हांडे हिला वाचिक अभिनयात तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

# मातृमंदिर विश्वस्त संस्था



## गुरुपौर्णिमा कार्यक्रम

गुरूपौर्णिमेच्या निमित्ताने होणाऱ्या या कार्यक्रमात संस्थेच्यावतीने विविध क्षेत्रात समर्पणपूर्वक काम करणाऱ्यांचा प्रातिनिधिक स्वरूपात सन्मान करण्यात येत असतो.

यावर्षी अध्यापकोत्तम पुरस्कार आयसरच्या 'वाच. नीरजा दशपुत्रे' यांना संस्थेचे अध्यक्ष मा. नितीनभाई कारिआ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. 'कार्यकर्ता गुणगौरव पुरस्कार' पुणे प्रशालेच्या 'वाच. अनघा लवळेकर' यांना मा. रवी पंडित यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मणिपूर येथील शुभान फाउंडेशनचे संस्थापक 'श्री. शुभाशिष नंदी' यांना संचालक वाच. गिरीशराव बापट यांच्या हस्ते 'समाजशिक्षक पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. तर 'वा. ना. अभ्यंकर गुरुगौरव पुरस्काराने' भटक्या विमुक्त जमातींसाठी विशेष काम करणाऱ्या 'श्री. नरसिंग झरे' यांना 'श्री. रवी पंडित' यांच्या हस्ते गौरवण्यात आले. श्री. झरे यांनी सरकारी कागदपत्रे मिळवून देऊन या समाजातील लोकांना प्रवाहात आणले आहे. बचत गटातून हक्काची घरे मिळवून दिली. उदरनिर्वाहासाठी या समाजातील लोकांचे बँडपथक उभे केले. यानंतर मातृमंदिर विश्वस्त संस्थेचे अध्यक्ष मा. नितीनभाई कारीआ यांना त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शुभेच्छा देऊन सन्मान करण्यात आला. ''देशाच्या कानाकोपऱ्यातील लोकांची परिस्थिती बिकट आहे. त्यासाठी अनेक व्यक्ती काम करत आहेत. त्यांचा शोध घेऊन त्यांचे कार्य समाजापर्यंत पोहोचवण्याचे कार्य मातृमंदिर विश्वस्त संस्था करीत आहे. त्यासाठी संस्थेचा देखील गौरव केला पाहिजे.'' असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. रवी पंडित यांनी व्यक्त केले.

शुभाशिष नंदी या मणिपूरच्या अभ्यागतांसाठी यावर्षी संपूर्ण सूत्रसंचालन हिंदी भाषेतून करण्यात आले हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

## राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

दिनांक ११ सप्टेंबर २०२३ रोजी विनोबा भावे यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यस्तरीय अध्यापक, पालक व विद्यार्थी निबंध स्पर्धा बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला. विविध विषयांवर एकूण ४०० निबंध संस्थेकडे प्राप्त झाले. पैकी ३७० निबंध विद्यार्थ्यांचे होते. व १५ परिक्षकांनी या निबंधांचे परीक्षण केले. आशय, भाषाशैली, सुसूत्रता, हस्ताक्षर व शुद्धलेखन या निकषानुसार परीक्षण करण्यात आले.

संस्कृत, मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषातून सुमारे ४० निबंध बक्षिसपात्र ठरले. तसेच वेदाध्यायी पुरस्कार वेदमूर्ति प्रथमेश जोशी यांना मा. यशवंत लिमये यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. धन्य राधामाता पुरस्कार मा.शुंभागीताई नित्सुरे यांना व समाज शिक्षक पुरस्कार मा. गजानन लोनबले यांना मा. अशोक कामत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तपस्वी विद्वत् पुरस्कार हा वाच्. अशोक कामत यांना ज्ञान प्रबोधिनीचे संचालक मा. गिरीश बापट यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.

मनोगत व्यक्त करताना अशोकजी म्हणाले, ''उत्तम मैत्री करणारा मनुष्य स्वतः पुढे येतो व जगाला पुढे घेऊन जातो. मी सर्वत्र जोडला गेल्यामुळे मोठ्या व्यक्तींशी संपर्क आला, व घडत गेलो. विवेकानंद हा अभ्यासाचा विषय झाला पाहिजे. आज विनोबांसारख्या समाज शिक्षकांची गरज आहे. गांधी व विनोबांना समजणं म्हणजे जग समजण्यासारखं आहे. चांगल्या माणसांची भक्ती न करता त्यांच्यातील शक्ती समजून घ्या.''

## संत साहित्य पुरस्कार वितरण सोहळा

महाराष्ट्राच्या मातीला संतत्वाचा सुगंध आहे. संतविचार हे मानवी मनाला सुख आणि शांती देणारे असतात. या विचारांचा लाभ नव्या पिढीला व्हावा या उद्देशाने अनेकांच्या लेखण्या हातभार लावतात. हे निर्माण झालेले साहित्य जास्तीतजास्त वाचकांपर्यंत पोहोचावे आणि त्यानिमित्ताने लेखक आणि प्रकाशकांना प्रोत्साहन मिळावे म्हणून मातृमंदिर विश्वस्त संस्थेतर्फे संत साहित्य पुरस्कार दरवर्षी प्रदान करण्यता येतात. या स्पर्धेचे हे २५ वे वर्ष होते.

यावर्षी सुमारे २८ ग्रंथांचे पुरस्कारासाठी प्राप्त झाले. वाच्. सुनीता जोशी आणि वाच्. माधवी महाजन यांनी या संपूर्ण ग्रंथसंपदेचे परीक्षण केले.

एकूण २८ ग्रंथांपैकी संतजीवन ललित साहित्य या गटात २ पुस्तकांची, चिंतनपर विवेचनपर गटातून एकूण ४ पुस्तकांची तर या दोन्ही गटांव्यतिरिक्त दोन पुस्तकांची पुरस्कारांसाठी निवड परीक्षकांनी केली.

प्रथम पुरस्कार प्राप्त पुस्तके व प्रकाशकांची नावे–

**संतजीवन ललित साहित्य–**

- **प्रथम क्र. समर्थ शिष्य कल्याण**

  लेखिका – लेखक–अनुराधा फाटक, प्रकाशक – रावा प्रकाशन

- **चिंतनपर विवेचनपर–**

  **प्रथम – पंचलतिका,** लेखिका – डॉ. शुभदा मुळे, प्रकाशक – श्रीरंग प्रकाशन

प्रातिनिधिक स्वरूपात पुरस्कार प्राप्त लेखिका मा. शुभदाताई मुळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच स्नेहवर्धन प्रकाशनाच्या प्रकाशक सौ. स्नेहलताई तावरे यांनी संतविचार परंपरा पुढे चालत राहावी, यासाठी सुरू

असलेल्या या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रमुख अभ्यागत मा. वाच. अजितराव कुलकर्णी यांनी आपल्या जीवनातील एक उदाहरण देऊन संतवचनांचे वाचन आणि त्यातून झालेले चिंतन आयुष्यासाठी किती महत्त्वाचे असते हे विद्यार्थ्यांना सांगितले. ''माणूसपण घडविण्याचे कार्य केवळ संतच करू शकतात. आणि म्हणून संतविचारांचे वाचन हे विद्यार्थीदशेतच व्हावे.''

## समूहगान श्रमदान व अन्य स्पर्धा पारितोषिक वितरण समारोह

**मातृमंदिर विश्वस्त संस्थेच्या** समूहगायन आणि अन्य स्पर्धेचा पारितोषिक वितरण कार्यक्रम शुक्रवार दि. १६ फेब्रुवारी २०२४ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमाची सुरुवात वैदिक राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाला ज्येष्ठ कीर्तनकार अंजली कऱ्हाडकर आणि वाच. गीताताई शिंदे या प्रमुख अभ्यागत म्हणून उपस्थित होत्या.

यावर्षी २२ जिल्ह्यांतील ११९ शाळांमधील सुमारे २२,००० विद्यार्थ्यांचा सहभाग या स्पर्धेमध्ये होता. ही स्पर्धा विभाग व राज्यस्तरावर घेण्यात आली होती. सहभागी सर्व शाळांमध्ये जाऊन संस्थेच्या कार्यकर्त्यांनी परिक्षण केले. तसेच अहिल्यादेवी हायस्कूल फॉर गर्ल्स, शनिवार पेठ, पुणे या विद्यालयातील मुलींनी अतिशय सुंदर असे समूहगीत सादर केले. स्पर्धेचे परीक्षक प्राज्ञेश पोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



**गुरूपौर्णिमा कार्यक्रम**

## मा. राज्यपाल भेट

स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी माननीय राज्यपाल हे पुणे राजभवन येथे संध्याकाळी असतात. त्यावेळी पुणे व परिसरातील सामाजिक, कला, राजकीय, सैन्य तसेच पोलीस क्षेत्रातील प्रतिनिधी यांना राजभवनचे निमंत्रण असते. 'मन की बात' या मुंबईमध्ये झालेल्या कार्यक्रमात ज्ञान प्रबोधिनीला निमंत्रण होते. त्यावेळी आ. संचालकांच्या वतीने निगडी केंद्रातून श्री. शिवराज पिंपुडे आणि श्री. सुधीर कुलकर्णी या भेटीस उपस्थित होते. त्या संदर्भातून १५ ऑगस्ट २०२३ रोजी संध्याकाळच्या कार्यक्रमाचे ज्ञान प्रबोधिनीचे प्रतिनिधी म्हणून श्री. शिवराज पिंपुडे यांना निमंत्रण होते. मा. राज्यपालांची भेट झाली. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचा परिचय करून घेता आला.

## संवादातून मैत्रीकडे...

गुरुकुलातील जे विद्यार्थी त्यांचा संपूर्ण दिवस म्हणजे १२ तास शाळेतच घालवतात. या १२ तासांमध्ये त्यांना अनेक अनुभव येत असतात. नवनवीन लोकांना भेटण्याची संधी त्यांना मिळत असते. त्याच सोबत अवांतर वाचन, मौन संवाद, चिंतनिका या माध्यमातून चर्चा केली जाते. पण या सगळ्याला सामोरे जायचे कसे असे प्रश्नही त्यांना पडतात. त्यांची उत्तरे देताना मात्र अनेकदा आपणच प्रश्नात पडतो.

दादा हल्ली खेळताना भान रहात नाही रे वातावरण तापले की आपसूक अपशब्द निघतात अशी एकाची स्वतःबद्दलची तक्रारहोती. तो अपशब्द वापरतो असे पूर्वीच आमच्या कानावर आलं होत.पण त्याने स्वतःहून येउन मान्य करण आणि चूक दुरुस्त करण्यासाठी संवाद साधावासा वाटणं हे मला कौतुकास्पद वाटलं.

विद्यार्थ्यांसोबत नियमित आणि शाळेशिवाय, अनौपचारिक संवादातून ही आपुलकी वाढत जाते, मैत्री वाढत जाते बघता बघता आपल्या अडचणी अन्य कोणाशी बोलण्यापेक्षा दादाशी बोलू हा विश्वास वाढतो. त्यांचा विश्वास पाहून आपणही त्याना पुरेसा वेळ देऊन योग्य मार्गदर्शन करायला हवं ही भावना समृध्द होते.

**अभिलाष देशपांडे**
(गुरुकुल अध्यापक)

# चिपळूण विस्तार केंद्र

संशोधन व विस्तार कार्यदिशा

चिपळूण संपर्क केंद्राची वर्षारंभ उपासना २ जुलै २०२३ रोजी संपन्न झाली. यानिमित्त श्री. आदित्य शिंदे यांचे काश्मीर अभ्यास दौरा अनुभव कथन झाले.

पूरक शिक्षणांतर्गत यावर्षी चिपळूण तालुक्यातील ५ शाळांमध्ये अग्रणी – प्राग्रणी शपथ ग्रहण समारंभ आणि त्यासंदर्भातील शाळेतील शिक्षकांसोबत बैठक झाली. या उपक्रमातील २०० अग्रणी – प्राग्रणी यांनी वर्षभरात शाळेतील उपक्रमांच्या नियोजनात सहभाग घेतला. काही क्षेत्रभेटी व उद्योगांना भेटी दिल्या. याचबरोबर ३ शाळांमधून इयत्ता नववीमधून दहावीमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रभावीपणे अभ्यास करण्याचे तंत्र चांगल्याप्रकारे विकसित व्हावे यासाठी स्वयं अध्ययन शिबिरे घेण्यात आली. त्यात माध्यमिक गटातील एकूण २४५ विद्यार्थी सहभागी झाले होते. तसेच ३ शाळा व १ महाविद्यालय यामध्ये वाचक मेळावे घेण्यात आले, काय वाचावे, कसे वाचावे याबद्दल या मेळाव्यातून मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमात माध्यमिक गटाचे एकूण १७० विद्यार्थी व महाविद्यालयातील १२ युवती व ३ युवक सहभागी झाले होते. छोटे सायंटिस्ट उपक्रमांतर्गत चिपळूण व गुहागर तालुक्यातील विज्ञान शिक्षकांचे शिक्षक प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना प्रयोगाधारे विज्ञानाच्या संकल्पना कशा स्पष्ट कराव्यात याबद्दल सत्रे झाली. या प्रशिक्षणात चिपळूण मधील ३८ माध्यमिक व गुहागर तालुक्यातील २५ माध्यमिक व ३६ प्राथमिक शिक्षक उपस्थित होते. या प्रशिक्षित विज्ञान शिक्षकांमार्फत चिपळूण मधील १५२० माध्यमिक विद्यार्थी तसेच गुहागर मधील ७५० माध्यमिक व १०८० प्राथमिक विद्यार्थी छोटे सायंटिस्ट उपक्रमात सहभागी झाले. यावर्षी प्रथमतःच एक्सेल इंडस्ट्री या कंपनीसोबत विज्ञान प्रकल्प कार्यशाळा ५ शाळांमध्ये घेण्यात आल्या. या कार्यशाळांमध्ये विज्ञान प्रकल्प कसे तयार करावेत याबद्दलचे मार्गदर्शन करण्यात आले व सुमारे २२५ माध्यमिक विद्यार्थी या कार्यशाळेत सहभागी झाले.

मागील वर्षी नव्याने सुरु झालेल्या हिरकणी उपक्रमाची ३ सत्रे पोफळी या ग्रामीण भागातील मातांसाठी झाली. सर्व सत्रांना आठ हिरकणी माता धरून एकूण २२ महिला उपस्थित होत्या. या सत्रांबरोबर आरोग्यविषयक व्याख्यान झाले, तसेच या उपक्रमावर आधारित चित्रफित स्पर्धा घेण्यात आली.

५ ते ७ जानेवारी या कालावधीत चिपळूण मधील दातार-बेहेरे-जोशी महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शन व विज्ञान शिबिर घेण्यात आले. विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांनी प्रयोगांद्वारे वैज्ञानिक संकल्पना समजून घेतल्या.

विज्ञान शिबिरात कल्पक समस्या परिहाराचे सत्र झाले सहभागी विद्यार्थ्यांनी Practical Research and Analysis चे प्रयोग प्रत्यक्ष केले. हे तीनही दिवस मिळून साधारण १५० युवक युवती या उपक्रमात सहभागी झाले होते.

२२ जानेवारी २०२४ रोजी प्रभू श्रीरामांच्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवाच्या निमित्ताने चिपळूण केंद्राने सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत अखंड रामरक्षा पठण यज्ञ केला. शालेय विद्यार्थ्यांपासून, युवक-युवती, प्रौढ सदस्यांपर्यंत एकूण ९८ जणांनी १०९१ पेक्षा अधिक वेळा रामरक्षा पठण केले. विशेष बाब म्हणजे ४० अग्रणी - प्रग्रणी विद्यार्थ्यांनी प्रत्येकी ५ वेळा रामरक्षा म्हटली.

वरील सर्व उपक्रमांसोबत केंद्रावर नियमित साप्ताहिक उपासना, प्रबोधिनी वाङ्मयाचे एकत्रित वाचन होते.

## विस्तार

### ग्रामीण भागातील खेळाडू विकसन -

साधारण पहिले सत्र संपताना ग्रामीण भागातील खेळाडू विकसन प्रकल्पाची सुरुवात झाली. यामध्ये life skill education या विषयासाठी काम सुरू आहे. महाराष्ट्रातील चार ठिकाणी - मावळ, बारामती, चिपळूण व हराळी येथे प्रत्येकी सहा याप्रमाणे खेळाची केंद्रे सुरू करायची आहेत व खेळातून व्यक्तिमत्त्व विकास यासाठी काम करायचे आहे. सध्या baseline assessment चे काम झालेले आहे व गट गोळा करण्यासाठी तसेच प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी सर्व ठिकाणच्या सदस्यांचे प्रशिक्षण देखील झाले, त्यामध्ये 'life skill' यविषयाची मांडणी केली.

या अंतर्गत चिपळूण केंद्र हे मुख्य केंद्र करण्यात आले आले. या प्रकल्पांतर्गत ८ ते १४ वयोगटातील मुलामुलींची खेळाची आवड जोपासणे, खेळांमध्ये सहभाग वाढवणे व निरोगी जीवनशैलीच्या सवयींसह जीवन कौशल्ये याबद्दल आवड निर्माण करणे असे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. चिपळूण केंद्रात माखजन, आंबडस, भोम आणि आकले या ४ ठिकाणी उपकेंद्रे सुरु करण्यात आली आहेत. प्रकल्पाचा पहिला टप्पा म्हणून सौर फाल्गुन १० ते चैत्र ११, शके १९४५ (१ ते ३० मार्च) मध्ये आंबडस हे उपकेंद्र पूर्ण क्षमतेने सुरु करण्यात आले. याचबरोबर या चारही उपकेंद्रांवर सौर चैत्र २६ ते वैशाख १०, शके १९४५ (१५ ते ३० एप्रिल) मध्ये उन्हाळी क्रिडा शिबीर घेण्यात आले. यामध्ये सर्व उपकेंद्रांवर मिळून २०० मुलेमुली सहभागी झाली होती.



# जैवतंत्रज्ञान विभाग

संशोधन व विस्तार कार्यदिशा

## रतिलाल भगवानदास जैवतंत्रज्ञान विभाग

समाजाच्या सर्व स्तरांवर पर्यावरण पूरक तंत्रज्ञान पोचविण्याचा जैवतंत्रज्ञान विभागाचा मानस आहे. या विभागातील अनुभव अभिरुची, संशोधन व कृषी विस्तार, अटल सामाजिक उद्भवन केंद्र (अटल कम्यूनिटी इनोवेशन सेंटर) असे तीन उपविभाग आहेत. जैवतंत्रज्ञान मूलभूत व उपयोजित तंत्रज्ञान यातील आंतर दुव्यांमधून विकसित होते आहे. जैव तंत्रज्ञानाच्या कृती आधारित प्रशिक्षणामधून विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती आणि नवोन्मेषता निर्माण करणे हा विद्यार्थी प्रशिक्षणाचा गाभा आहे. उती संवर्धनातील संशोधनातून रोपांची निर्मिती ही जैवविविधता संवर्धनासाठी केली जाते. संशोधनासोबतच कृषीविस्तार कार्य हा जैवतंत्रज्ञान विभागाचा एक महत्वाचा घटक आहे. विभागाद्वारे शेतकरी आणि ग्रामीण महिलांपर्यंत पर्यावरणपूरक तंत्रज्ञान पोचविले जाते.

## प्रबोध- बांबू सेतू प्रकल्प (संशोधन व कृषी विस्तार )

२०२२ मध्ये सुरु झालेल्या प्रबोध-बांबू सेतू प्रकल्पांतर्गत संशोधन व विस्तार बांबू आधारीत कामे सातत्याने सुरु आहेतच.

**संशोधन निबंध:** प्रबोध-बांबू सेतू प्रकाल्पर्गात ३ बांबू प्रजातीवर काम सुरु आहे. त्यापैकी कटांग बांबू वरील कामाने महत्वपूर्ण टप्पा गाठला आहे. त्या कामावर आधारित संशोधन निबंध, तैवान येथे होणाऱ्या **वर्ल्ड बांबु काँग्रेस** एप्रिल २०२४ मधील परिषदेत सादर झाला आहे. अशा प्रकारे संशोधनाचे काम जागतिक स्तरांपर्यंत पोहोचले आहे. याकरिता डॉ. अरुणा अत्रे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

**बांबू मूल्यवर्धन साखळी:** २०२३-२४ मध्ये, प्रबोध-बांबू सेतू प्रकल्पाच्या कामामध्ये **बांबू मूल्यवर्धन साखळी (वॅल्यू डेवलपमेंट चेन)** या मितीची नव्याने भर पडली आहे. या कामासाठी श्री. अमितजी पराळे यांचे सुरुवातीपासूनच सक्रीय मार्गदर्शन लाभते आहे. शाश्वत विकासाकरिता बांबू आधारित उपजिविका व उद्योजकता विकास हे प्रबोध प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टाच्या कार्यवाहीसाठी भोर भागातील, बांबू आधारीत उद्योग परिसंस्थेच्या अभ्यासासाठी ६ क्षेत्रभेटी करण्यात आल्या. तसेच एकूण १३ बांबू आधारित कौशल्य व उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम केले गेले. बांबू आधारित ४ स्टार्टअप्सना सातत्याने मार्गदर्शन सुरू आहे. या स्टार्टअप्सच्या अनुभव शिक्षणासाठी बांबू सोसायटी ऑफ इंडियाच्या

राज्यस्तरीय प्रदर्शनात सहभाग घेण्यात आला. या वर्षात बांबू इंडिया, बांबू संस्कृती आणि संपूर्ण बांबू केंद्र या तीन संस्था, परीसंस्था भागीदार (ईको सिस्टम पार्टनर) म्हणून जोडल्या गेल्या. अशाप्रकारे प्रौढ गटाच्या उद्योजकता विकासासाठी अधिमित्रांच्या साहाय्याने काम सुरु झाले आहे.

**बांबू सोसायटी ऑफ इंडिया प्रदर्शन सहभाग:** डिसेंबर २०२३ मध्ये बांबू सोसायटी ऑफ इंडियाने आयोजित केलेल्या बांबू प्रदर्शनामध्ये विभागाने सहभाग घेतला होता. प्रबोध बांबू सेतू प्रकल्पांतर्गत घेण्यात येणाऱ्या बांबू लागवड, महिला प्रशिक्षण, बांबू पॉलीहाऊस, मूल्यवर्धन साखळी या विषयाची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. तसेच महिला प्रशिक्षक गटाने तयार केलेल्या बांबूच्या वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. या स्टॉलला सुमारे ७५० लोकांनी भेट दिली. बांबू लागवड आणि बांबू पॉलीहाऊस याविषयी सुमारे २६० शेतकऱ्यांनी माहिती घेतली आणि प्रशिक्षणाचीही मागणी केली.

**प्रबोध– बांबू सेतू स्वयं रोजगार आणि उद्योजकता विकास:** प्रबोध– बांबू स्वयंरोजगार आणि उद्योजकता विकास अंतर्गत प्रशिक्षकांची दोन प्रशिक्षणे घेण्यात आली. जयतपाड येथे बांबूच्या पट्ट्या काढणे, टोपली बनविणे प्रशिक्षण श्री. गजानन जगताप आणि ज्ञानदेव साळुंखे यांनी घेतले. सासवड येथे बांबू बास्केट बनविण्याचे प्रशिक्षण सौ. नंदा पवार व श्री. सुरेश पवार यांनी महिला वर्गाला दिले.

या प्रकल्पांतर्गत प्रशिक्षणातून तयार झालेल्या महिला प्रशिक्षण गटाने दिवाळी निमित्त बांबूचे आकाश कंदील बनविण्याचे ठरविले. प्रबोध बांबू उद्योग समूहाचे श्री. मोहनराव गुजराथी यांनी या गटाला १५५ आकाश कंदील बनिवण्याची ऑर्डर दिली. या गटाने १५–२० दिवसात ही ऑर्डर पूर्ण केली.

## अटल सामाजिक उद्भवन केंद्र (अटल कम्यूनिटी इनोवेशन सेंटर)

अटल सामाजिक उद्भवन केंद्राचे काम पूर्वतयारी, नियोजन आणि काही अंशी प्रत्यक्ष कार्यवाही या तीन स्तरांवर सुरू आहे.

**विषय तज्ज्ञ समिती:** अटल सामाजिक उद्भवन केंद्र प्रकल्पातील ३ प्रयोगशाळांचे व्हीजन अँड मिशन स्टेटमेंटचे पहिले प्रारूप तयार झाले आहे. यासाठी मा. रत्नाकर ठोंबरे (तज्ज्ञ– आयुर्वेदिक व नैसर्गिक उत्पादने), डॉ. देवयानी सावंत (तज्ज्ञ– सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान), डॉ. अरुणा अत्रे (तज्ज्ञ – वनस्पती ऊती संवर्धन) यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

**निधी संकलन:** देसाई ब्रदर्स लि. आणि ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन या संस्था, अटल सामाजिक उद्भवन केंद्राबरोबर निधी भागीदार (फंडिंग पार्टनर) म्हणून जोडल्या गेल्या आहेत.

**मनुष्यबळ विकास:** अटल सामाजिक उद्भवन केंद्र प्रकल्पासाठी नवीन मनुष्यबळ उभे करावे लागणार आहे. यासाठी मुलाखत सत्रांमधून ३ मॅनेजर व ३ तरुण व्यावसायिक निवडण्यात आले आहेत.

**सहभागी सामाजिक संस्था यांच्या बरोबर प्रत्यक्ष काम:** ‘ज्ञान प्रबोधिनी हराळी केंद्र’ आणि ‘दिशा’ या सहभागी सामाजिक संस्थाबरोबर प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली.

ज्ञान प्रबोधिनी हराळी केंद्र येथे **‘बांधावरील प्रयोगशाळा’**, डॉ. संतोष चव्हाण यांच्या मार्गदर्शनाने सुरू करण्यात आली. यासाठी, शेतात उपयोगी असणारी ट्रायकोडर्मा बुरशी प्रयोगशाळेमध्ये कशी वाढवायची याचे प्रशिक्षण हराळी निगडी केंद्रातील ४ कार्यकर्त्यांना देण्यात आले.

दिशा (तळेगाव) या संस्थेबरोबर विघटनशील सॅनिटरी नॅपकिन्स बनवण्यासाठीचे युनिट तयार करण्यात आले आहे. मा. स्वाती बेडेकर यांनी प्रशिक्षण दिले. मा. श्यामजी बेडेकर यांनी दिशा संस्थेमधील महिलांना सॅनिटरी नॅपकिन्स बनवण्याचे दोन दिवसीय प्रशिक्षण दिले आहे. पायलट स्तरावर निर्मितीही सुरु केली आहे.

## माध्यमिक विभाग (इंग्रजी)

**यावर्षी विभागातील विद्यार्थ्यांनी विविध आंतरशालेय स्पर्धांमध्ये खालीलप्रमाणे यश संपादित केले.**

| | | | |
|---|---|---|---|
| चि. अश्विन मनोज देवळेकर | ८ वी | स्टुडन्ट ऑफ इयर – वाद विवाद स्पर्धा | प्रथम |
| कु. मिहिका त्रिशल चौधरी | ८ वी | स्टुडन्ट ऑफ इयर – वाद विवाद स्पर्धा | प्रथम |
| कु. स्नेहा शेखर पवार | ९ वी | IUCAA आंतरशालेय विज्ञान प्रदर्शन | प्रथम |
| कु. श्रेया राहुल खिस्ते | ९ वी | स्टुडन्ट ऑफ इयर – वाद विवाद स्पर्धा | प्रथम |
| चि. अश्विन मनोज देवळेकर | ८ वी | जिल्हा परिषद आंतरशालेय व्हॉलीबॉल स्पर्धा | द्वितीय |
| चि. अथर्व प्रशांत चिंचोळकर | ८ वी | जिल्हा परिषद आंतरशालेय व्हॉलीबॉल स्पर्धा | द्वितीय |
| चि. रोहन राजेश बेडेकर | ८ वी | जिल्हा परिषद आंतरशालेय व्हॉलीबॉल स्पर्धा | द्वितीय |
| चि. निखिल शशांक चव्हाण | ८ वी | जिल्हा परिषद आंतरशालेय व्हॉलीबॉल स्पर्धा | द्वितीय |
| कु. अद्विता कुलदीप मोकाशी | ९ वी | जिल्हा परिषद आंतरशालेय व्हॉलीबॉल स्पर्धा | द्वितीय |
| कु. सई केदार तळेगावकर | ९ वी | जिल्हा परिषद आंतरशालेय व्हॉलीबॉल स्पर्धा | द्वितीय |
| कु. अदिती शहाजी बारणे | १० वी | जिल्हा परिषद आंतरशालेय व्हॉलीबॉल स्पर्धा | प्रथम |
| कु. मुग्धा मनोज टिळेकर | १० वी | जिल्हा परिषद आंतरशालेय व्हॉलीबॉल स्पर्धा | प्रथम |
| चि. दीपांशु अजय लोखंडे | १० वी | जिल्हा परिषद आंतरशालेय व्हॉलीबॉल स्पर्धा | द्वितीय |
| चि. ओजस निनाद थत्ते | १० वी | जिल्हा परिषद आंतरशालेय व्हॉलीबॉल स्पर्धा | द्वितीय |
| चि. कृष्णा भानुदास रानवडे | १० वी | जिल्हा परिषद आंतरशालेय व्हॉलीबॉल स्पर्धा | द्वितीय |

# अंतर्गत गुणवत्ता

## विभाग प्रमुख प्रशिक्षण

### प्राथमिक व पूर्व प्राथमिक कार्यदिशा शिबिर

प्रबोधिनीच्या कार्यादिशांपैकी नव्याने सुरु झालेल्या पूर्व प्राथमिक प्राथमिक कार्यदिशेचे पुढचे पाऊल म्हणजे अध्यापकांचे प्रशिक्षण. हे प्रशिक्षण निगडी केंद्रात दि. २१ एप्रिल ते २४ एप्रिल अशा तीन दिवसात आयोजिले होते. यात सोलापूर, हराळी आणि निगडीचे सदस्य उपस्थित होते. यात प्रामुख्याने गणित, वैचारिक कौशल्य, अवधान कक्षा, विज्ञान, शांतीची अभिरुची, बांधिलकी या सहा विशेष उद्दिष्ट गटांसाठी काही सत्रे आयोजित केली होती. उद्दिष्ट गटानुसार सदस्यांनी गटचर्चा केली. उपक्रमांची यादी करणे, काही उपक्रमांची मांडणी करणे, त्यांचे स्तरीकरण करणे असे चर्चेचे स्वरूप होते. सर्व उद्दिष्ट गटांची मांडणी ३ वर्षांपासून ते १० वर्षांपर्यंत कशी असावी याबाबत निलिमाताई सप्रे, सुलभाताई कुलकर्णी, अमिताताई बेहेरे, श्री. बर्वे सर आणि निलिमाताई रास्ते यांनी मार्गदर्शन केले.

### अध्यापक शिबिर जून २३

दिनांक १२, १३, १४ जून रोजी अध्यापक प्रशिक्षण आयोजित केले होते. यंदाचा वार्षिक विषय हा अधिमित्र हा होता. यासाठी औपचारिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक समस्यांचे निराकरण करता यावे व विद्यार्थ्यांशी जवळीक वाढून विद्यार्थ्यांचा अधिमित्र कसे होता येईल हा या प्रशिक्षणाचा एकूण सारांश होता. यात प्रमुख्याने निगडी केंद्र प्रमुख आ. देवळेकर सर– बीजभाषण, डॉ. संज्योत देशपांडे –अधिमित्र संकल्पना, डॉ. मुकुलिका थत्ते–अधिमित्र योजना अनुभव कथन या विषयांचा समावेश होता. तर; भवितव्य लेखाचा आढावा त्याची मांडणी, कार्यसंकल्प मांडणी, खाते नियोजन, गृहभेटी, विद्यार्थी संवाद, वर्ग सभा, साप्ताहिक भेटी अशा सत्रांचे आयोजनही करण्यात आले होते.

### अध्यापक शिबिर - एप्रिल मे २४

यावर्षी एप्रिलमधील अध्यापक शिबिर एक दिवसाचे झाले. यात एकूण ४ सत्रे झाली. पहिल्या सत्रात

केंद्रप्रमुख वाच्. मनोजराव देवळेकर सरांनी आधुनिक तंत्रज्ञान आणि शिक्षिण असा विषय मांडला. पुढील शैक्षणिक वर्षाचा विषय 'कुटुंब संस्कृती' असल्याने मा. अंजलीताई भाडळे यांनी या विषयावर संवाद साधला. शेवटच्या सत्रात सर्व विभागतून 'कुटुंब संस्कृती' वर्षानिमित्त काय काय उपक्रम-कार्यक्रम घेता येतील असे कल्पनाविस्फोट सत्र घेण्यात आले.

## पालक संघटन व गट बांधणी

नमस्कार,

माझी कन्या ज्ञान प्रबोधिनी विद्यालयात इयत्ता २ री मध्ये शिकत आहे. यावर्षी मी पालक प्रतिनिधी ही जबाबदारी स्वीकारली आणि त्यासोबत पालक महासंघासोबत जोडलो गेलो..

'पालक संघटन व गट बांधणी' ही उद्दिष्टे समोर ठेऊन कामाला सुरुवात केली. अनेक नवीन ऋणानुबंध जुळले गेले. ओळख मैत्रीत रूपांतरीत झाली. मला अनेक उपक्रमांमध्ये त्या निमित्ताने सहभागी होता आले.

पालक शिक्षक क्रीडा स्पर्धा म्हणजे जणू आम्हा सर्वांसाठी पर्वणीच !!

ज्ञान प्रबोधिनी पालक महासंघासोबत काम करताना समाजिक, संस्कृतिक विभागात प्राथमिक गटामध्ये काम करता आले याचा मला खूपच आनंद आहे. गणेशोत्सवं, श्रावणधारा, पालक विद्यार्थी खेळ, वर्गावर सणाचे सादरीकरण अशा अनेक उपक्रमांमध्ये सहभागी होता आले याचे समाधानही आहे.

या निमित्ताने पालक प्रतिनिधी व शिक्षक अशा सहलीला जाण्याचा योग आला. त्यादरम्यान आम्ही 'ग्राम प्रबोधिनी'ला भेट दिली आणि तिथे राबवले जाणारे उपक्रम जाणून घेतले. तिथून् आम्ही पवन मावळ मध्ये आनंदमेळा येथे भेट दिली. तिथे आम्ही निसर्गाचे आणि जैवविविधतेचे अनेक पैलू पाहिले. हा अनुभव आम्हाला समृद्ध करणारा होता असेच म्हणावे लागेल.

यापुढे देखील मला पालक संघाच्या नवनवीन उपक्रमात सहभागी होण्याची व सहकार्य करण्याची अगदी मनापासून इच्छा आहे.

**श्री. विनायक काकडे**
(पालक महासंघ प्रतिनिधी)

# वर्षारंभ- वर्षांत

अंतर्गत गुणवत्ता

## वर्षारंभ

भारतीय परंपरा आणि भारतीय संस्कृती यानुसार शिक्षण द्यायचे असेल तर ऋषीमुनी आणि संत यांच्या तत्त्वज्ञानाची आठवण आपण सतत ठेवली पाहिजे त्यानुसार आपल्या कार्याची दिशा ठरवली पाहिजे. यासाठी निगडी केंद्रात दि २२ जून वर्षारंभ उपासना होत असते. यावेळी सर्व विभागांची संकल्प मांडणी झाली. या सर्व संकल्पांना शुभेच्छा देण्यासाठी प्रबोधिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राच्या प्रमुख मा. सविताताई कुलकर्णी अभ्यागत म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विभागांच्या नव्या संकल्पांच्या मांडणीचे कौतुक केले. मार्गदर्शन करताना सविताताई म्हणाल्या, ''आपण comfort zone, fear zone, learniing zone, growth zone, अशा वेगवेगळ्या टप्प्यांमधून जात असतो. या सर्व टप्प्यांमधून मिळणारे अनुभव आणि त्यातून होणारे शिक्षण हे फार महत्त्वाचे असते हे सर्व अध्यापकांनी अनुभावावे आणि ते अनुभवले पाहिजे.''

## वर्षांत

उपक्रमांची निष्पत्ती ही ठरलेल्या उद्दिष्टांनुसार होते आहे ना? याचा आढावा वर्षांत उपासनेच्या वेळी घेतला जातो. निगडी केंद्राचा वर्षांत समारंभ दि. २८ मार्च या दिवशी झाला. यावेळी विभागशः संकल्प पूर्ती आढावा घेण्यात आला. यासाठी प्रत्येक विभागाला निवडक संकल्पांची सविस्तर मांडणी करण्यास सांगितले होते. मांडणीसाठी काही मुद्दे देण्यात आले होते. विभागशः मांडणी झाल्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख अभ्यागत पुणे जिल्हा शिक्षण अधिकारी (माध्यमिक) श्री. भाऊसाहेब कारेकर सरांनी सर्वांना प्रश्न विचारून अध्यापकांनी नेमका अभ्यास कसा करावा आणि त्याचा दैनंदिन अध्यापनात कसा उपयोग करावा याबद्दल मार्गदर्शन केले. दुसरे अभ्यागत श्री. सचिन गाडगीळ यांनीही उपस्थित सर्व सदस्यांना शुभेच्छा दिल्या.

### माध्यमिक विभाग (मराठी) अभिनंदन!

- कलापिनी आयोजित बालनाट्य स्पर्धेत माध्यमिक मोठ्या गटात 'विठ्ठल तो आला', या नाटकाला सांघिक द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. तर अभिनयात चि. चैतन्य दीक्षित (इ. ९ ब) याला व्दितीय क्रमांक प्राप्त झाला.
- चिन्मय मिशन गीता पाठांतर स्पर्धेच्या अंतिम फेरीत कु. पर्णवी कुलकर्णी (९ वी ब) हिला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

अंतर्गत गुणवत्ता

# बालभवन व्यासपीठ उदघाटन

मुलांना लहान वयातच व्यासपीठावर सादरीकरण करण्याची संधी मिळावी, त्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी पूर्व प्राथमिक विभागासाठी स्वतंत्र व्यासपीठ उभारण्यात आले. या व्यासपीठाचा उद्घाटन सोहळा शनिवार दि. २९ जुलै २०२३ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमाला महापौर मा. उमाताई खापरे व मा. कृपाशंकर सिंह उपस्थित होते. माननीय उमाताई पालकांशी संवाद साधताना म्हणाल्या की, ''जास्तीत जास्त निधी हा शाळांच्या विकासासाठी खर्च व्हावा अशी इच्छा आहे. त्यातून हे कार्य झाले.''

तसेच माननीय कृपाशंकर सिंह यांनीही मनोगत व्यक्त केले आणि मा. देवळेकर सरांनी मा उमाताईंना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व राजकीय वर्तुळातील व्यक्तींकडून याप्रमाणे उपयुक्त कार्य नेहमीच व्हावे ही सदिच्छा व्यक्त करून कार्यक्रमाचा समारोप केला.

## माध्यमिक विभाग (मराठी) अभिनंदन!

- जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा २०२३ १७ वर्षाखालील मुलांच्या गटात चि. ईशान देशमुख हा पारंपरिक आणि आर्टिस्टिक दोन्ही योगाप्रकारात प्रथम आला आहे.
- पुणे जिल्हा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये इयत्ता दहावी क मधील चि. हर्ष पाटील याने रोप्य पदक मिळवले.
- चि. हर्ष पाटील (१० वी क) याला पुण्यातील सणस ग्राउंडवर झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये Pentathlon या खेळामध्ये १६ वर्ष वयोगटात प्रथम क्रमांक मिळाला.
- चि. आर्यन पाटील (९ वी ब) याला पुणे जिल्हा ॲथलेटिक असोसिएशनतर्फे घेण्यात आलेल्या १६ वर्षाखालील मुलांच्या शॉर्टपुट या स्पर्धेमध्ये कांस्यपदक मिळाले.
- जिल्हास्तरावरील शालेय मैदानी स्पर्धेत चि. आर्यन पाटील (९ वी ब) याला गोळाफेक या क्रीडा प्रकारात  रोप्य पदक तर कु. ओवी क्षीरसागर (९वी ब) हिला १०० मीटर अडथळा स्पर्धेत रौप्यपदक प्राप्त झाले आहे.
- पिंपरीचिंचवड महानगरपालिका आयोजित कला स्पर्धेमध्ये मोठ्या गटामधून चि. भावार्थ हांडे (९ वी अ) हा सुगम गायन स्पर्धेत प्रथम क्रमांकावर आणि शास्त्रीय गायन स्पर्धेत द्वितीय क्रमांकावर आला. तसेच कु. गायत्री हराळे (८वी अ) हिला सुगम गायन स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

# समूहगुण विकसन

## विभाग प्रमुख प्रशिक्षण

संपूर्ण वर्षभरात महिन्यातून दोन मंगळवार याप्रमाणे विभाग प्रमुखांच्या पाक्षिक बैठका घेण्यात आल्या. यात विभाग प्रमुखांशिवाय प्रत्येक विभागातून अन्य एक सदस्य उपस्थित होता. यात नित्य कामकाजाच्या विषयांसोबत काही प्रशिक्षणेही घेण्यात आली. यांचे विषय पुढीलप्रमाणे...

१. समूहगुण विकसन – मा.श्री. आदित्य शिंदे

२. प्रतिसादी कार्यकर्ता – प्राचार्य सौ. विद्या उदास, श्री. कल्पेश कोठाळे

३. सहविचार समिती 'तंत्र आणि मंत्र' – मा. श्री. शरद सुंकर

## गणेशोत्सव आरती रचणे कार्यशाळा

या कार्यशाळेत तयार झालेल्या काही निवडक आरत्यांचे सादरीकरण प्रत्यक्ष महाआरतीला झाले. त्यातील ही निवडलेली आरती...

जय देव जय देव जय श्री गणराया ।
ज्ञान भक्ती आणि कलेचा पाया ।।
जय देव जय देव..।।धृ।।

तूझिया पूजेने प्रारंभ करू ।
जास्वदं केवडा प्रसाद वाहू ।
मनोभावे रूप नयनी ठेवू ।
विनायका तुझी आरती गाऊ ।।१।।

वक्रतुंड लंबोदर हे गणनायक ।
मयुरेश्वर, विघ्नेश्वर, हे विनायक ।
अनेक तुझी नावे रूपे अनेक ।
दीन–दास भक्तांचा तू तारक ।।२।।

आत्मलिगं शिवाचे रावणा दिधले ।
सारेदेव तेंव्हा भयभीत झाले ।
युक्तीने तू रावणाला हरविले ।
गोकर्ण क्षेत्री शिवमदिर स्थापिले ।।३।।

सघं–सामर्थ्य तुझमुळे कळते ।
पर्यावरणालाही महत्त्व मिळते ।
संस्क्रुतीचा तूची खरा वारस ।
जागृती करुनी हो समरस ।।४।।

(चाल सुखकर्ता दुखहर्ता प्रमाणे)

**अनन्या माजगांवकर व मुक्ता देशमुख**
(माध्यमिक विभाग मराठी मध्यम– विद्यार्थिनी)

# पालक महासंघ

**समूहगुण विकसन**

ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयात सुमारे अकरा वर्षांपूर्वी पालक महासंघाची स्थापना झाली. हे पालक महासंघाचे बारावे वर्ष! सुरुवातीला केवळ क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने एकत्र आलेल्या पालकांचे उत्तम संघटन होत गेले आणि यातून तयार झाला पालक महासंघ. पालकांच्या स्वयंसिद्धतेला आणि कृतिशीलतेला संधी आणि बळ देणारे एक व्यासपीठ म्हणजेच पालक महासंघ!

याद्वारे विद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या उपक्रमांमध्ये विद्यालयास मदत करणे, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न करणे, आपल्यातील उद्योजक पालकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांबरोबरच पालकांचाही सर्वांगीण विकास होण्यास मदत करणे ही पालक महासंघाची मुख्य उद्दिष्टे!

पालक महासंघाने वर्षभरात अनेक उपक्रम राबवले त्यातील काही प्रमुख उपक्रम पुढीलप्रमाणे...

## निर्मिती कौशल्य तासिका

पाठ्यपुस्तकातील अभ्यासाव्यतिरिक्त दैनंदिन जीवनात मुलांना अनेक कौशल्य आत्मसात करावी लागतात आणि याचेच प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला गेला.

मागच्या वर्षीपासून विद्यालयात निर्मिती कौशल्याच्या तासिका इयत्ता आठवीच्या मुलांसाठी घेतल्या जातात. यात मराठी माध्यमाचे तीनही वर्ग आणि इंग्रजी माध्यमाचा एक वर्ग असे चार वर्ग आहेत. यामध्ये माती, वर्तमानपत्र, लोकर, कापड, बांबू, मणी, लेस अशा वेगवेगळ्या घटकांपासून विविध वस्तूंची निर्मिती शिकवली जाते. वजन कसे करायचे? मापे कशी घ्यावीत? वेगवेगळ्या गोष्टी कशा हाताळाव्यात? हे शिकवले जाते. या वर्षी बीजारोपण, बांबू राख्या, लोकरीच्या फुलांच्या माळा, कागदी बॉक्स, तिळगुळाच्या वड्या, बांबूचे भेट कार्ड, जुन्या कपड्यांची पायपुसणी व बसकर इत्यादी गोष्टी मुलांना शिकवण्यात आल्या. तसेच कागदी पिशव्या, मण्यांच्या राख्या, वाती करणे, लेसचा हार बनवणे, बरची तयार करणे, रांगोळी, छोटे आकाशकंदील, बांबूपासून पेन स्टॅन्ड आणि सुतळीपासून टि कोस्टर बनवून घेतले. मुलांनी स्वत: तयार केलेल्या उटण्याची आणि मण्यांच्या राख्यांची विक्रीही केली.

## पालक शिक्षक क्रीडा स्पर्धा... वर्ष १२ वे

पालक महासंघाची मुहूर्तमेढ ज्या उपक्रमातून रोवली गेली आणि विद्यालयातील असंख्य पालक ज्यामुळे एकत्र जोडले गेले तो उपक्रम म्हणजेच सर्वांचा लाडका पालक-शिक्षक क्रीडा महोत्सव!

पालकांनी केवळ स्पर्धा म्हणून न बघता सहकुटुंब मैदानावर येऊन सगळ्या खेळांमध्ये सहभागी होऊन एकत्रित खेळण्याचा आनंद घ्यावा आणि काही क्षण आनंदाने घालवावेत हाच या मागचा मुख्य उद्देश. तसेच पालकांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये खेळांविषयी, व्यायामाविषयी जागृती निर्माण करणे हासुद्धा या उपक्रमामागचा उद्देश होता.

यावर्षी क्रीडा स्पर्धेमध्ये सुमारे ६६० पालकांनी नोंदणी करून सहभाग घेतला होता. यामध्ये १९७ महिला पालक आणि ४६३ पुरुष पालकांनी क्रिकेट, थ्रोबॉल, डॉजबॉल या नेहमीच्या खेळांबरोबरच यावर्षीच्या क्रीडा महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरलेल्या 'कौटुंबिक खेळांत' सहभाग नोंदवला.

क्रीडा महोत्सवाच्या सांगतेच्या आणि बक्षीस समारंभाच्या दिवशी संध्याकाळी मातृमंदिरात दीपोत्सव आणि सामुदायिक रामरक्षा पठणाच्या कार्यक्रमाचेही आयोजन केले होते. यालाही पालकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

## पथनाट्य सादरीकरण

पर्यावरण जागृती आणि प्लास्टिक संकलनासाठी विद्यालयात आणि परिसरात पथनाट्याचे आयोजन केले होते. समाजामध्ये पर्यावरणाबाबत जागृती निर्माण व्हावी आणि प्लास्टिक संकलन वाढीस लागावे यासाठी यावर्षी गणेशोत्सवात विद्यार्थ्यांसोबतच पालकांच्या पथनाट्याचेही आयोजन केले गेले. गणेशोत्सवाचे औचित्य साधून अनेक सोसायट्या, गणेश मंडळ या ठिकाणी ही पथनाट्ये सादर केली गेली. यानिमित्ताने अनेक महिला पालक पहिल्यांदाच अशा उपक्रमात सहभागी झाल्या होत्या.

दोन्ही सादरीकरणास उत्तम प्रतिसाद मिळाला. पथनाट्याच्या सादरीकरणाच्या आधी अथर्वशीर्षाचे पठण केले गेले. आणि उपस्थित नागरिकांना त्यांना प्लास्टिक संकलन, ओला सुका कचरा विलगीकरण, खतं निर्मिती याविषयी तसेच सागरमित्र संस्थेविषयी माहिती दिली.

## निसर्ग शाळा आणि वृक्ष संवर्धन गट

यामध्ये पालकांच्या गटाकडून २०० पेक्षा अधिक वृक्षाची लागवड करण्यात आली तसेच ७०० हून अधिक बीजारोपण करण्यात आले. उल्लेखनीय बाब म्हणजे या वर्षी क्रीडा स्पर्धेत बक्षीस म्हणून २७० झाडे देण्यात आली तसेच ५०० पालकांसाठी (पूर्व प्राथमिक व १ली, २ रीचे पालक) पर्यावरण जागृती कार्यशाळा तसेच निसर्ग शाळा शिक्षक प्रशिक्षण हे उपक्रम घेण्यात आले.

निर्माल्यापासून खत निर्मिती कार्यशाळा, श्री. बोधनकर सरांची प्लास्टिक प्रदूषण व संकलन विषयक प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा, निर्माल्यापासून धूप तयार करणे कार्यशाळा, ४० सेवकांसाठी प्लास्टिक जागृती कार्यशाळा घेतल्या गेल्या. पवनामाई जलदिंडीत इयत्ता सातवीतील २४ मुली व २२ मुले असे ४६ विद्यार्थी, एक अध्यापक आणि ७ पालक सहभागी झाले होते.

## उद्योजकांचे स्टॉल्स

आपल्या पालक उद्योजकांचे दिवाळी आणि क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने लागणारे स्टॉल्स हा उपक्रम म्हणजेच पालक संघाच्या अनेक उपक्रमांपैकी एक महत्त्वाचा तसेच सर्वांच्या आवडीचा आणि आकर्षणाचा केंद्रबिंदू असतो.

दिवाळी आणि क्रीडा स्पर्धेदरम्यान अनेक पालक उद्योजक आपले वेगवेगळे स्टॉल्स विद्यालयात लावतात. यामध्ये खाद्यपदार्थ, कपडे, पिशव्या, पर्सेस, साबण, सुगंधी अत्तरे, शोभेच्या वस्तू, रांगोळ्या... या आणि अशा अनेक वस्तू विक्रीसाठी उपलब्ध असतात. आणि याला दरवर्षी अतिशय उत्तम प्रतिसाद मिळतो.

यावर्षी दिवाळी स्टॉल्सच्या दरम्यान आपल्या ६६ पालकांनी मनोहर सभागृहाच्या खालील मैदानावर आपले स्टॉल्स लावले. यामधील महत्त्वाचे आकर्षण म्हणजे खाऊ गल्ली. यामध्ये १८ खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावले गेले होते.

या दोन दिवसात सुमारे ४ ते ५ लाख रुपयांची उलाढाल झाली. या दिवाळी स्टॉल्स दरम्यान शाळेचे विद्यार्थी, आजी-माजी पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि परिसरातील नागरिकांनी खूप मोठी गर्दी केली होती.

यावर्षी या दिवाळी स्टॉल्सच्या उद्‌घाटनासाठी ओशन इंजीनियरिंग वर्क्स तळवडे या कंपनीच्या संचालिका स्नेहलताई पाटील तसेच सुगरण हॉटेलच्या संस्थापक प्रज्ञाताई रावल व श्रद्धाताई गाडेकर अभ्यागत म्हणून आल्या होत्या.

आलेल्या अभ्यागतांनी सगळ्या स्टॉलचे निरीक्षण करून स्टॉल्स धारकांना, उद्योजक पालकांना प्रोत्साहन दिले. या दिवाळी स्टॉलच्या निमित्ताने आपल्या अनेक विद्यार्थ्यांना देखील व्यवसाय प्रशिक्षणाचा अनुभव आणि आनंद घेता याला.

एखाद्या वस्तूची विक्री करताना कोणते कौशल्य लागते? त्यासाठी काय काय पूर्वतयारी करावी लागते? ग्राहकांशी कसा संवाद साधायचा असतो? या अनेक गोष्टी यातून त्यांना शिकायला मिळाल्या.

## गिर्यारोहण

ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयाच्या पालक महासंघाने आयोजित चंद्रखणी पास ट्रेकमध्ये ६ ते ५९ या

वयोगटातील सदस्यांनी सहकुटुंब यामध्ये सहभाग घेतला होता. ४८ जणांच्या या गटातील सर्वांनी १२५०० फुटावरील हा ट्रेक यशस्वीरित्या पूर्ण केला.

हा चन्द्रखणी पास म्हणजे एका व्हॅलीतून दुसऱ्या व्हॅलीत जाण्याचा १२५०० फुटांवरील चिंचोळा मार्ग! या मार्गामधून अनेक नयनरम्य हिमशिखरांचे दर्शन होते. शिबिरातील अवघड मार्ग, विरळ प्राणवायू यांच्याशी सामना करत असताना प्रबोधिनी म्हणून निसर्गाच्या सान्निध्यात केलेली दैनंदिन उपासना आणि पालक संवाद हे या गिर्यारोहण उपक्रमांचे प्रमुख वैशिष्ट्य होते.

**प्राथमिक गट क्र. २**

**अभिनंदन!**

| | | | |
|---|---|---|---|
| आरंभी तुषार रिठे | All Artist फौंडेशन | कोण होणार पुण्याचे Singing Superstar-Little Champ | प्रथम |
| मल्हार कोंडीबा हांडे | पिंपरी चिंचवड आंतरशालेय स्पर्धा | तबला वादन | प्रथम |
| शांभवी मिलिंद दलाल | पिंपरी चिंचवड आंतरशालेय स्पर्धा | संवादिनी वादन | तृतीय |
| आशुतोष सुकेश देशपांडे | पिंपरी चिंचवड आंतरशालेय स्पर्धा | संवादिनी वादन | उत्तेजनार्थ |
| मल्हार कोंडीबा हांडे | पिंपरी चिंचवड आंतरशालेय स्पर्धा | सुगम गायन | प्रथम |
| मल्हार कोंडीबा हांडे | पिंपरी चिंचवड आंतरशालेय स्पर्धा | शास्त्रीय गायन | द्वितीय |
| अर्णव अक्षय भागवत | पिंपरी चिंचवड आंतरशालेय स्पर्धा | सुगम गायन | तृतीय |
| प्राथमिक विभाग सांघिक (३री व ४थी) | पिंपरी चिंचवड आंतरशालेय स्पर्धा | एकांकिका | प्रथम |
| प्राथमिक विभाग सांघिक (३री व ४थी) | पिंपरी चिंचवड आंतरशालेय स्पर्धा | लोकनृत्य (मुले) | प्रथम |
| प्राथमिक विभाग सांघिक (३री व ४थी) | पिंपरी चिंचवड आंतरशालेय स्पर्धा | लोकनृत्य (मुली) | द्वितीय |
| नेत्रा योगेश थिटे | राज्यस्तरीय | योगासने | द्वितीय |
| राजवीर आनंद साने | राज्यस्तरीय | कराटे | तृतीय |
| श्रेयस संतोष साटम | राष्ट्रीय | जिम्नॅस्टिक्स | प्रथम |
| वंशिका गणेश थरकुटे | राष्ट्रीय | Voinam Championship 2023 Aasam | सुवर्ण पदक |
| अन्वीका योगेश वायकर | South Asian Youth Games, Shrilanka | Gymnastic | प्रथम |
| विराट गणेश सोन्नर | राज्यस्तरीय | Kudo | तृतीय |
| आरुष अभिजित भांडारकर | राज्यस्तरीय | Lathikathi Silambam | Silver Medal |

# युवती विभाग

**समूहगुण विकसन**

ज्ञान प्रबोधिनीच्या युवती विभागाद्वारे वय वर्षे १५ पुढील युवतींचे संघटन केले जाते. समाज विकासासाठी युवतींचे व्यक्तिमत्त्व विकसन करण्यासाठी तसेच युवतींमधील सामाजिक जाणीव आणि नेतृत्वगुण वाढण्यासाठीचे उपक्रम या विभागाद्वारे घेतले जातात.

## नेतृत्व विकसन शिबिर

शाळेतील आठवीतून नववीत जाणाऱ्या ३८ विद्यार्थिनी आणि १० युवतींसाठी दिनांक १ जून ते १० जून २०२३ या कालावधीमध्ये युवती विभागाने नेतृत्व विकसन शिबिराचे आयोजन केले होते. १ जून, २०२३ रोजी मा. संचालकांच्या मार्गदर्शनाने शिबिराचे उद्‌घाटन झाले.

नेतृत्व विकसनाच्या दृष्टीने महत्त्वाची वेगवेगळी कौशल्ये मुलींना समजणे, विद्यार्थिनींना प्रबोधिनीचा अधिक जवळून परिचय होणे, ही शिबिराची मुख्य दोन उद्दिष्टे होती.

या शिबिरात विद्यार्थिनींना नेतृत्त्वाशी संबंधित कौशल्यांचा परिचय करून देण्यासाठी व्याख्यानांची योजना केली होती. ह्या व्याख्यानांमध्ये गटबांधणी, निर्णय कौशल्य व समस्या परिहार, नियोजन कौशल्य, वेळ व्यवस्थापन, मानसिक आरोग्य याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक व्याख्यानानंतर त्या विषयावर आधारित कृतिसत्रे घेण्यात आली. फ्रेम तयार करणे, मॉडेल बनविणे, खजिना शोध, चुलीवर स्वयंपाक बनविणे अशी वेगवेगळी कृतिसत्रे दररोज होत होती. एक दिवस विद्यार्थिनींना गम्मत जत्रेचे आयोजन करण्याचा अनुभवदेखील देण्यात आला. विद्यार्थिनींना संचलन आणि स्व-संरक्षणासाठी लाठी काठीचे प्रशिक्षणही देण्यात आले. प्रबोधिनीचा परिचय या दुसऱ्या उद्दिष्टासाठी ज्ञान प्रबोधिनी पुणे केंद्र, दादा महाराज नाटेकर पंचाकोशाधारित गुरुकुल, चिखली - उपक्रम केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, वेल्हे केंद्र, या ज्ञान प्रबोधिनीच्या तीन वेगवेगळ्या केंद्रांवर भेटी झाल्या.

विद्यार्थिनींनी पुणे केंद्रामध्ये वेगवेगळ्या विभागांना भेट दिली. चिखलीमधल्या उपक्रम केंद्रात सायकल सहल नेण्यात आली. विद्यार्थिनींना तिथे जाऊन प्रत्येक वर्गावर जाऊन काहीतरी खेळ घेण्याची संधी मिळाली. ५ जून रोजी चिखली येथे पर्यावरण दिनाच्या निमित्ताने झालेल्या वृक्षारोपणात सर्व युवती आणि विद्यार्थिनी-देखील सहभागी झाल्या. वेल्हे केंद्रावर निवासी भेट झाली. यावेळी विद्यार्थिनी, युवती व वेल्ह्यामधील युवती अशा पंधरा गटांनी पासली खोऱ्यात एकूण पंधरा ठिकाणी मेळावे घेतले. या मेळाव्यांत विद्यार्थिनींनी तेथे जाऊन

दल घेतले. दुसऱ्या दिवशी सकाळी तोरणा किल्ल्यावर गिर्यारोहण करण्यात आले. दिनांक १० जून, २०२३ रोजी मा. बागेश्रीताई पोंक्षे यांच्या उपस्थितीत शिबिराचा समारोप झाला.

## तंबू शिबिर

दिनांक २९ मे ते ३१ मे २०२३ या कालावधी मध्ये युवती विभागाने इयत्ता दहावी व अकरावीमध्ये गेलेल्या मुलींसाठी तंबू शिबिराचे आयोजन केले होते. एकूण १८ युवती या शिबिरात सहभागी झाल्या. ग्राम प्रबोधिनीचा परिचय व्हावा व सहभागींना युवती विभागाची ओळख व्हावी ही या शिबिराची उद्दिष्टे होती. गार्गी ताई देवचके हिने वेगवेगळ्या केंद्रांवरील युवती विभागाची रचना आणि तिला युवती विभागात काम करताना आलेले अनुभव, तिच्या सत्रात मांडले. ग्राम प्रबोधिनीचे संस्थापक मा. व्यंकटशन भताने यांनी ग्राम प्रबोधिनी कशी सुरु झाली आणि तिथे काय काम चालते असे थोडक्यात सांगितले. याशिवाय आपल्या कल्पनेतील आदर्श गावाचे पोस्टर बनवणे, साळुंब्रेशी त्याची तुलना करणे, खजिना शोध अशी विविध कृतीसत्रे, पद्यसत्रे घेण्यात आली. गावातल्या युवतींबरोबर एकमेकींना आपल्याला येणारी कौशल्ये/खेळ शिकवणे, गोठ्यात काम करणे, चुलीवर जेवण बनवणे असे अनुभवदेखील युवतींनी घेतले. असे हे ३ दिवसांचे शिबिर जोशात आणि उत्साहात पार पडले.

## गणेशोत्सव

दरवर्षीप्रमाणेच यावर्षीचाही गणेशोत्सव अगदी उत्साहात पार पडला. गणेशोत्सव हा संघटन आणि त्या संघटनेच्या सकारात्मक ऊर्जेचे कर्तृत्व दर्शवणारा सण आहे. याच सकारात्मक ऊर्जेचा वापर करून युवती विभागाने यावर्षी अनेक उपक्रम केले. गणेशोत्सवाच्या पूर्वतयारीची सुरुवात मातृभूमीपूजन करून झाली. त्याचदिवशी बर्चीसाठीच्या वाद्यवादनाची सुरुवात झाली. संस्कृती संवर्धन अंतर्गत यावर्षी युवती विभागाने नावीन्यपूर्ण उपक्रम घेतला होता. दिनांक २३ ऑगस्ट ते १८ सप्टेंबर २०२३ रोजी शंखवादन प्रशिक्षण कार्यशाळा युवती विभागाच्या वतीने घेण्यात आली. ५ युवतींनी प्रशिक्षण घेतले व प्रत्यक्ष प्राणप्रतिष्ठा, मिरवणुका व विसर्जन प्रात्यक्षिकाच्या सुरुवातीला शंखवादन केले.

**अन्य शालेय बर्ची :** यावर्षी निगडीच्या युवती विभागाच्या गणेशोत्सवाच्या उद्दिष्टांमधील एक उद्दिष्ट म्हणजे प्रबोधिनी व्यतिरिक्त अन्य शाळांमध्ये जाऊन बरचीनृत्य शिकवणे. त्यानुसार सिटीप्राईड आणि अमृता विद्यालय या दोन शाळांमध्ये बरची शिकवली आणि दोन्ही शाळांमध्ये त्याची प्रात्यक्षिके सादर झाली.

**निर्माल्य संकलन:** पर्यावरणाबाबत जागरूकता वाढविण्यासाठी युवतींनी निर्माल्य संकलनाचा उपक्रम करायचे ठरवले. आपल्याच एका पालकांच्या अगरबत्ती बनवायच्या कारखान्यात हे सर्व संकलित निर्माल्य गेले. या उपक्रमाला अनेक नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. उपक्रमाच्या सुरुवातीला १५० किलो निर्माल्य गोळा होईल इतक्या जणांपर्यंत आपण पोहोचायचं असं ठरवलं होतं. एकूण ३९० किलो निर्माल्य

कचऱ्यात किंवा नदीत जाण्यापासून वाचले याचा निश्चितच आनंद आहे.

**कला सादरीकरण:** चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचा अधिपती असणाऱ्या आपल्या लाडक्या बाप्पाकडून सर्वच काही शिकण्यासारखे आहे. त्यातील स्वतःला येणाऱ्या कला आपण त्याला अर्पण करून गणेशोत्सव अधिक उत्साहपूर्ण आणि नावीन्यपूर्ण बनवूया असे ठरवले होते. त्यासाठी युवतींकडून काही कलांचे फोटो-व्हिडिओ मागवण्यात आले होते. त्यातील काही निवडक कला युवती विभागाच्या INSTAGRAM पेजवर पोस्ट करण्यात आल्या.

युवती विभागाने यावर्षी एकूण ९ ठिकाणी बर्चीच्या मिरवणुका व ३ प्रात्यक्षिके केली. वेगवेगळ्या ठिकाणी अनेक चांगले वाईट अनुभव घेता आले. संघटन करत असताना गणपती बाप्पाप्रती असलेली श्रद्धा जपत; समोर उभ्या राहणाऱ्या अनेक प्रश्नांना अतिशय सर्जनशीलतेने उत्तरे देत या सर्व मिरवणुका अविस्मरणीय झाल्या.

**गिर्यारोहण:** २०२३-२४ या वर्षात १२ महिन्यांत १२ गड-किल्ले सर करूया असे युवतींनी ठरवले होते. महाविद्यालयीन दलांतर्गत येणाऱ्या या उपक्रमाचा संघटन हा मुख्य हेतू होता. या उपक्रमातून जास्तीत जास्त युवतींना युवती विभागाच्या संपर्कात आणायचे असे ठरवले होते. एप्रिल महिन्यात झालेल्या कोथळीगड या गिर्यारोहणाने या उपक्रमाची सुरुवात झाली. मग तुंग, तिकोणा, पेब, रतनगड, प्रबळ गड, कलावंतीण, कळसूबाई, राजगड व राजमाची असे १० गड किल्ले मार्च २०२४ मधे पूर्ण झाले. या उपक्रमाद्वारे एकूण २३३ युवतींपर्यंत पोहोचता आले.

## माध्यमिक विभाग (इंग्रजी) — अभिनंदन!

यावर्षी विभागातील अनेक विद्यार्थी हे चित्रकला इंटरमिजीएट परीक्षेत सहभागी झाले होते त्यापैकी इयत्ता नववीतील खालील विद्यार्थ्यांना 'अ' श्रेणी प्राप्त झाली.

कु. स्नेहा शेखर पवार, चि. भार्गव समीर फंड, चि. शिवलसत्य निलेश पथ्ये, चि. श्रेयस राजेश ननावरे, कु. आर्या अमोल केसकर, कु. अंतरा चंद्रकांत पाटील, कु. मुग्धा सिद्धेश्वर काडविदे, कु. रुचि मंदार दामले, कु. श्रेया अमोद भाटे, कु. इशिता विशाल सोनावणे, कु. मृण्मयी मच्छिंद्रनाथ पवार, कु. कनक अमर कुलकर्णी, चि. वेदांत किशोर अंबाडकर, चि. कृष्णा भानुदास रानवडे, चि. प्रथम भूषण पथे.

तर इयत्ता आठवीतील चि. अश्विन मनोज देवळेकर, चि. अथर्व प्रशांत चिंचोळकर, चि. दर्श सुनील निकम, कु. कावेरी चारुदत्त गांधी, कु. तनु सुनील हरमलकर, कु. मिहिका त्रिशल चौधरी या विद्यार्थ्यांना अ श्रेणी प्राप्त झाली.

# युवक विभाग

समूहगुण विकसन

## बर्ची प्रात्याक्षिके - युवक विभाग

युवक विभागाच्या भविष्यातील विस्ताराच्या दृष्टीने, गणेशोत्सव प्रात्यक्षिकांमुळे अनेक मंडळांशी संपर्क झाला. याचे पुढचे पाऊल म्हणजे गणेशोत्सवातील मंडळांव्यतिरिक्त काही ठिकाणी प्रात्याक्षिके सादर करणे या उद्देशाने मा. नितीनभाई कारिआ यांच्या संपर्कातून बालकल्याण अनाथाश्रम, औंध याठिकाणी केवळ युवकांचे बर्ची प्रात्यक्षिक सातव्या दिवशी झाले. विशेष मुलांसोबत ४० युवक पूर्ण तीन तास त्या वातावरणात रमून गेले होते. आश्रमातील सर्वांनी बर्ची नृत्यात सहभाग नोंदवला.

शिवराज्याभिषेकाचे ३५० वे वर्ष म्हणून महाराजांच्या पराक्रमाला अभिवादन करायला समाजातील विविध संस्था, पिंपरी चिंचवड मधील ५० हून अधिक वाद्य पथके जमली होती. यात १००० ढोल, ३५० ध्वज, २५० ताशे असे सहभागी झाले होते या एकत्रित वादनात युवक विभागाच्या १०० युवकांचा गट बर्ची नृत्य करण्यासाठी सहभागी झाला होता.

## गिर्यारोहण

युवक विभाग, साहस दलांतर्गत, दिनांक २५ मे ते ३१ मे या कालावधीत नेण्यात आलेल्या, हिमालयीन गिर्यारोहण मोहिमेमध्ये ११ युवकांनी सहभाग घेतला. यापैकी १० जणांनी यशस्वीरित्या मोहीम पूर्ण केली.

हिमाचल प्रदेश येथील, बुरान घाटी पास या १५००० फुटांवरील ट्रेकचे आयोजन यावर्षी करण्यात आले होते. ६ दिवसात ४५ किमी चालणे, बर्फाच्या पाण्यातून चालत नदी पार करणे, शेवटच्या टप्प्यातील उभी चढण, पास पूर्ण झाल्यावर ७० मीटरच्या बर्फाच्या भिंतीवरून rapelling, त्यानंतर पाच ते सहा बर्फातील slides, हिमवर्षाव, सततचा पाऊस, उणे अंश तापमान, विरळ ऑक्सिजन, गुडघाभर बर्फातून चालणे इत्यादी अडचणींना तोंड देत या सर्वांनी मोहीम यशस्वीरित्या पूर्ण केली.

# राष्ट्रीय एकात्मता

## निगडी केंद्र गणेशोत्सव

लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव हा संघटनेचे उत्तम साधन म्हणून ओळखला जातो. याचेच औचित्य साधून निगडी केंद्रात यावर्षी गणेशोत्सव हा तीन आयामांना धरून साजरा करण्यात आला. पर्यावरण, संस्कृती संवर्धन आणि राष्ट्रीय एकात्मता या अंगांनी विचार करून विविध उपक्रमांची रचना करण्यात आली होती.

**पर्यावरण–** याअंतर्गत निर्माल्याचे संकलन करून त्यापासून धूप अगरबत्ती, खत निर्मिती करण्यासाठी या संस्थेकडे पाठवण्यात आले. याला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**संस्कृती संवर्धन–** या अंतर्गत संपूर्ण निगडी केंद्रात स्पष्टोच्चारासह अथर्वशीर्ष पठण व्हावे या हेतूने गणेशोत्सवापूर्वी सर्व पालक, अध्यापक व विद्यार्थी गटांना अथर्वशीर्षाचे प्रशिक्षण देण्यात आले.

**राष्ट्रीय एकात्मता–** या विषयाला अनुसरून यावर्षी संपूर्ण गणेशोत्सवाची सजावट व प्रदर्शनाचे आयोजन केले होते. यात प्रामुख्याने ईशान्य भारताची माहिती मिळवून ८ राज्यांचे तक्ते, ईशान्य भारतातील समाजजीवन आणि निसर्ग यांची ओळख करून देणारी सजावट या सर्वांचा समावेश होता. समावेशकता ह्या आयामाला धरून यावर्षी विविध राज्ये, धर्म, पंथ, भाषा असणाऱ्या परिसरातील नागरिक व पालकांना महाआरतीसाठी निमंत्रित करण्यात आले. तसेच त्यांच्या हस्ते मातृभूमीपूजन करण्यात आले.

# मातृभूमी परिचय शिबिर

## माध्यमिक इंग्रजी विभाग

'अभ्यास देशस्थितीचा समतोल चालो' ह्या प्रार्थनेच्या ओळीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी इयत्ता दहावी इंग्रजी माध्यमाचे ४८ विद्यार्थी कोकणातील चिपळूण व पावस येथे मातृभूमी परिचय शिबिरासाठी ९ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत गेले होते. तेथे सुरू असलेले प्रबोधिनीचे कार्य, लोकजीवन, निसर्ग, सांस्कृतिक वारसा जाणून घेता यावा, समाजदर्शन घडावे या दृष्टीने शिबिरातील सत्रांचे नियोजन करण्यात आले.

**पावस शिबिर:** विद्यार्थिनींचे शिबिर पावस येथे गेले. मा. सौ. शीतलताई सामंत (छात्र प्रबोधन प्रमुख, पावस), यांचा व्यक्तिपरिचय झाला. 'मुलींनी शिक्षण घेऊन स्वकर्तृत्वावर आपले आयुष्य घडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे, ' असा मोलाचा सल्ला या व्यक्तिपरिचयातून विद्यार्थिनींना मिळाला.

स्वामी स्वरूपानंद मठामध्ये उपासना करून, रत्नागिरी येथील स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी बांधलेले पतित पावन मंदिर व मंदिर परिसरातील संग्रहालय येथे भेट दिली.

स्वा. सावरकरांना वंदन करून लो. टिळकांच्या जन्मस्थानी जाऊन टिळकांचा जन्म झाला तो कक्ष, लोकमान्यांची जन्मकुंडली, टिळक घराण्याचा वंशवृक्ष, टिळकांनी शालेय जीवनात केलेल्या संस्कृत कविता व टिळकांच्या राजकीय कारकिर्दीतील काही क्षणचित्रे अशा विविध गोष्टी यावेळी पाहता व समजून घेता आल्या.

यानंतर थिबा राजवाड्यात ब्रिटिशांनी आक्रमणानंतर हद्दपार केलेल्या व त्यामुळे भारतात आलेल्या या ब्रह्मदेशाच्या राजाविषयी थोडक्यात इतिहास जाणून घेतला. तेथे थिबा राजाच्या दैनंदिन वापरातल्या काही वस्तू व प्राचीन मूर्ती, भांडी व पावसच्या आजूबाजूच्या परिसरातील प्रसिद्ध स्थळांचे फोटो यावेळी पाहता आले.

यानंतर नारळ संशोधन केंद्रालाही भेट देण्यात आली. तेथे मा. श्री. शांताराम चव्हाण सरांनी नारळाच्या विविध प्रजाती, नारळाचे बीज, दालचिनी, लवंग, कर्दळी यांची मिश्र शेती, कलमे, खतांचा वापर, गांडूळ खत तयार करणे इ. विषयी माहिती दिली.

गोगटे जोगळेकर महाविद्यालयाच्या संस्कृत विभागप्रमुख वाच. कल्पनाताई आठल्ये यांचा व्यक्तिपरिचय झाला. प्रबोधिनीच्या विद्यार्थिनी, युवती ते आत्ता संस्कृत प्राध्यापिका असा त्यांचा प्रवास त्यांनी यावेळी उलगडला. कोकणाचे वैशिष्ट्य असलेल्या कातळशिल्प या चित्ररचना विद्यार्थिनींनी प्राध्यापक ऋत्विज आपटे यांच्या मार्गदर्शनाखाली पाहिल्या. पुरातत्त्वशास्त्र क्षेत्रातील ज्ञानवृद्ध व्यक्तिमत्त्व श्री. सोनावणे सर यांची प्रत्यक्ष भेट घेण्याचा व त्यांचे अनुभव ऐकण्याचा दुग्धशर्करा योग जुळून आला.

समुद्रतज्ज्ञांबरोबर गावखडी येथील समुद्रकिनाऱ्याला अभ्यासभेट दिली. मा. डॉ. सुरेंद्र ठाकूरदेसाई यांनी Beach sandbar, upper, lower beach, swash mark, sand binding इ. संकल्पना प्रत्यक्ष समुद्रकिनाऱ्यावर दाखवत व अत्यंत सोप्या भाषेत स्पष्टीकरण देत सहजगत्या विद्यार्थिनीपर्यंत पोचवल्या. सागरी किनारा पाहण्याची नवीन दृष्टी सर्वांना मिळाली.

यानंतर या समुद्रकिनाऱ्यावरच कासव संरक्षण व संवर्धन प्रकल्पामध्ये काम करणाऱ्या श्री. प्रदीप डिंगणकर यांचा कार्यपरिचय मुलींनी करून घेतला.

यानंतर रात्रीच्या भोजनासाठी शिबिरार्थी श्री. परांजपे यांच्याकडे गेले. या सर्व भरगच्च कार्यक्रमांबरोबरच कोकणाचे निसर्ग सौंदर्य, पारंपरिक कोकणी घरे आणि घराच्या अंगणामध्ये सात्विक सहभोजन या सर्वांचा आनंद मुलींनी घेतला. शेवटच्या दिवशी कनकादित्य मंदिरात दर्शन घेऊन ऑर्गन या वाद्याला पुनरुज्जीवित करणारे श्री. बाळ उर्फ उमाशंकर दाते या संगीत तज्ज्ञांचा व्यक्तिपरिचय झाला.

या प्रवासादरम्यान विद्यार्थिनींनी ‘स्वीकारशील स्वदेशी’ या लेखांचे वाचन करून त्याबद्दल गटचर्चा व सादरीकरण केले. या शिबिरामध्ये २२ विद्यार्थिनी, दोन अध्यापिका व दोन युवतीदेखील सहभागी झाल्या होत्या.

## चिपळूण शिबिर

विद्यार्थ्यांचे शिबिर चिपळूण येथे नेण्यात आले. केतकी अरण्यक येथील श्री. सौरभ घोरपडे यांचे बोटिंगचे पहिले सत्र झाले. सौरभदादा आणि त्याच्या मित्रांबरोबर मासेमारी, होडी व त्याची डागडुजी, पूर, पर्यावरणाचे मानवी हस्तक्षेपामुळे होणारे नुकसान इ. विषयाची उत्तम माहिती विद्यार्थ्यांनी घेतली.

यानंतर अरण्यकचे सर्वेसर्वा मा. श्री. विनीत यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शहरातील कृत्रिम व निरस जीवन सोडून एक engineer गावात का राहायला आला आणि आज तो गावातल्या मुलांना पुन्हा गावाकडे कसा वळवत आहे हे विनीतदादांनी त्यांच्या मार्गदर्शनातून खूप छान समजावले. जंगलवाचनाचे सत्र मा. श्री. सोहम घोरपडे यांनी घेतले. यातून विद्यार्थ्यांना विविध प्रकारची झाडे, रानटी वनस्पती, ऋतुनुसार उमलणारी फुले, माकडांचे कळप पाहता आले. जंगल बघताना फक्त प्राणीच नाही तर त्यांची विष्ठा, पायाचे ठसे इत्यादी गोष्टी कशा महत्वाच्या असतात हे देखील सोहमदादांनी या सत्रात स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांनी प्लॅस्टिक प्रक्रिया प्लांटला भेट दिली. तेथील प्लॅस्टिकचे ७ प्रकार, त्यांच्या रिसायकलिंगची प्रक्रिया आणि रिसायकल न होणाऱ्या प्लॅस्टिकचे होणारे upcycling, त्यासाठी वापरण्यात येणारी उपकरणे विद्यार्थ्यांना पाहता आली.

लोकजीवन जवळून अनुभवता यावे या हेतूने या दिवसातील शेवटच्या सत्राचे - वाडी भेट व गावकरी संवाद नियोजन केले होते. तेथे पिण्याच्या पाण्यासाठी केलेले झरे, विविध प्रकारची शेती, गावकऱ्यांचे शेतीप्रती प्रेम या गोष्टी विद्यार्थ्यांना अनुभवता आल्या. यानंतर आर्ट कॉलेजमध्ये चित्र, शिल्पकला अशा कलात्मक गोष्टी पाहिल्या. यावेळी मा. श्री. परागदादा लघाटे यांचाही परिचय झाला व त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यानंतर गरम पाण्याची कुंडे आणि ७००-८०० वर्षे प्राचीन असलेले, दगडी बांधकाम असलेले सोमेश्वर मंदिर पाहिले.

गेल्या २-३ वर्षात प्रबोधिनीला जोडल्या गेलेल्या माखजनच्या शाळेत विद्यार्थी गेले. तेथील अग्रणी गटाशी विद्यार्थ्यांनी संवाद साधला. विचारांची, उपक्रमांची देवाणघेवाण झाली. पांडवकालीन अमणेश्वर मंदिर येथे मा. श्री. सचिन साठे यांनी मंदिरातील प्रथा, मंदिराची माहिती व तत्संबंधी कथा अतिशय सहजतेने सांगितल्या.

यानंतर श्री. पराग लघाटे यांच्या घरचा गणेशमूर्ती बनवण्याचा कारखाना विद्यार्थ्यांनी पाहिला. मोल्ड कसा बनवतात, त्यात शाडू माती कधी, कशी भरतात, मग फिनिशिंग, रंगकाम, सुशोभीकरण व विक्री ही सगळी प्रक्रिया जाणून घेतली.

याचवेळी सुप्रसिद्ध गायक श्री. प्रथमेश लघाटे यांचीही भेट झाली व त्याचे गायन प्रत्यक्ष ऐकण्याचा अनुभवही मुलांना मिळाला.

यानंतर शेवटचे सत्र आकाशदर्शनाचे झाले. आधी श्री. विनीत दादांनी ppt द्वारे माहिती दिली व नंतर सर्वांनी टेलीस्कोपमधून गुरू, शनी, देवयानी आकाशगंगा (Andromeda galaxy), काही नक्षत्रे पाहिली.

या सर्व अभ्यास उपक्रमांसोबतच चिपळूणचा निसर्ग अनुभवत विद्यार्थ्यांनी गुहागरच्या समुद्रात भिजण्याचा आनंदही घेतला.

या शिबिरात एकूण २६ विद्यार्थी, एक अध्यापक आणि तीन युवक सहभागी झाले होते.

या शिबिराचे फलित म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन वाढलेले दिसले, त्याचबरोबर नैसर्गिक साधनसंपत्तीविषयी संवेदनशीलता वृध्दींगत झालेली जाणवली. नवीन दृष्टिकोन देणारे व समाजाविषयी जाणीवजागृती निर्माण करणारे हे शिबिर होते.

## माध्यमिक मराठी विभाग

**देशस्थितीचा अभ्यास** या उद्देशाने प्रतिज्ञाग्रहणानंतर मराठी माध्यमिक विभागातील इयत्ता नववीच्या ४२ मुलींचे मातृभूमी परिचय शिबिर दिनांक १८ डिसेंबर ते २३ डिसेंबर या कालावधीत मेळघाट येथे संपन्न झाले. मातृभूमी परिचय शिबिराला जाण्यापूर्वी शिबिराच्या हेतूविषयी अध्यापकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला होता. विद्यार्थिनींनी लवादा येथील संपूर्ण बांबू केंद्राला भेट दिली. तिथे विद्यार्थिनींनी गटकार्य केले. बांबूच्या सुंदर वस्तू बनवल्या. संपूर्ण बांबू प्रकल्प केंद्र चालविणाऱ्या निरूपमाताई देशपांडे यांची मुलाखत घेतली. कुपोषित बालकांसाठी मोठे सामाजिक कार्य करणारे डॉक्टर रवींद्र कोल्हे व सौ. स्मिता कोल्हे यांचीही विद्यार्थिनींनी मुलाखत घेतली. या मुलाखतीमधून विद्यार्थिनींनी समाजकार्याची व राष्ट्रकार्याची प्रेरणा घेतली. चिखलदरा येथील अंध विद्यालयाला भेट दिली. तेथील अंध विद्यार्थ्यांशी संवाद केला. विद्यार्थिनींनी जंगल सफारी केली. घनदाट जंगल परिसराचे निरीक्षण करताना विद्यार्थिनींनी निसर्गाची संपन्नता, विशालता अनुभवली.

या शिबिरातून विद्यार्थिनींनी मैत्री, शिस्त, सहकार्य, समायोजन, स्वावलंबन, वक्तशीरपणा, पाठांतर, अडचणींवर मात करणे, घरापासून दूर राहणे, समृद्ध निसर्ग संपदा, प्राणी संपदा, खेड्यातील शांततामय प्रदूषणविरहीत जीवन, कमी गरजांमध्ये समाधानी राहणे, आनंदी जीवन जगणे या गोष्टींचा अनुभव घेतला.

**देशच माझा... माझी भूमी–माझे दैवत येथील व्यक्ती...**

**हिच्याचसाठी माझा कणक्षण... हिच्याकारणी माझी शक्ती....**

याच उद्देशाने प्रतिज्ञाग्रहणानंतर मराठी माध्यमिक विभागातील इयत्ता नववीच्या ३५ मुलांचे मातृभूमी परिचय शिबिर दिनांक १७ डिसेंबर ते २२ डिसेंबर या कालावधीत वर्धा आणि नागझिरा अभयारण्य येथे गेले. या पाच दिवसात विद्यार्थ्यांनी महात्मा गांधीजींच्या कार्याचा आणि व्यक्तित्त्वाचा परिचय व्हावा यासाठी सेवाग्राम, मगन संग्रहालय आणि पूज्य विनोबा भावेंचे कार्य समजून घेण्यासाठी पवनार आश्रमाला भेट दिली. विद्यार्थ्यांनी कुमार आप्पा पुरम येथील विज्ञान केंद्राला सुद्धा भेट दिली. यानंतर गोंदिया जिल्ह्यातील नागझिरा व्याघ्र

प्रकल्पाजवळील पिटेझरी गावात शहरी सोयी सुविधा, आराम कायमचा सोडून निसर्गाचा अभ्यास करण्यासाठी गेलेल्या निसर्ग तज्ञ आणि पक्षीप्रेमी श्री. किरण पुरंदरे यांच्याशी व्यक्ती परिचयातून संवाद साधला. गावातील आदिवासी जीवन, तिथे श्री. किरण पुरंदरे यांनी घडवून आणलेला बदल असा सर्व अभ्यास करत असताना विद्यार्थी तिथल्या निसर्गाशी एकरूप झाले. नागझिरा जंगलातील नैसर्गिक साधन संपत्ती, वन्य जीवन जवळून पाहिले. हा सर्व अनुभव घेत असताना स्थानिक लोकांच्या अडचणी आणि समाज जीवनसुद्धा विद्यार्थ्यांनी जवळून पाहिले.

एकंदरच या पाच दिवसाच्या अनुभवातून विद्यार्थ्यांनी प्रतिज्ञा ग्रहणातील ‘देशस्थितीचा अभ्यास’ या उद्दिष्टाच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला.

## गुरुकुल विभाग

गुरुकुलाच्या पंचाकोशाधारित शिक्षण पद्धतीच्या महत्त्वाच्या उपक्रमांपैकी एक उपक्रम म्हणजे मातृभूमी परिचय शिबिर. यावर्षी हे शिबिर व त्यातील उपक्रम पुढीलप्रमाणे झाले.

**इयत्ता पाचवी–** कर्डेलवाडी १६००-१८०० लोकसंख्या असलेल्या छोटेसे समृद्ध व अनेक पुरस्कारांनी सन्मानित गावात शिबिर संपन्न झाले. गावातील शाळेला आदर्श शाळा, डिजिटल शाळा असेही पुरस्कार प्राप्त झाले आहेत. शिबिराच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना या गावाचा आणि शाळेचा परिचय झाला.

**इयत्ता सहावी –** वडनेर ता. चांदवड जिल्हा भगूर येथील देशभक्त स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जन्मस्थान असलेला वाडा पाहून त्यांच्या प्रेरणादायी व जाज्वल्य स्मृतींना उजाळा देत शिबिरास सुरुवात झाली. अडत व कृषी उत्पन्न बाजार समितीतील अत्यंत अभ्यासपूर्ण भेट, शेतमाल व बाजारपेठ या प्रवास प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला.

**इयत्ता सातवी**चे शिबिर डोंगर कठोरा ता. यवल जिल्हा जळगाव येथे गेले होते. तेथील सातपुडा पर्वतरांगेची भौगोलिक ओळख व प्रत्यक्ष दर्शन, पावरी या आदिवासी जमातीच्या पाड्याला भेट व त्यांच्याशी संवाद. असे उपक्रम शिबिरात घेण्यात आले.

**इयत्ता नववी**चे शिबिर कच्छ, गुजरात येथे नेण्यात आले. कच्छचे सफेद रण, दलदल, समुद्र किनारा अशी भौगोलिक विविधता पाहण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. लखपत किल्ल्यावरील जीवाश्म, दगड, भूवैज्ञानिक संरचना यांचे निरीक्षण, ढोलावीरा येथे ५००० वर्षांपूर्वीची अचंबित करणारी हडप्पा संस्कृतीची रचना विद्यार्थ्यांना बघता आली.

**इयत्ता दहावी**चे शिबीर अमृतसर, फिरोजपूर, लुधियाना पंजाब येथे नेण्यात आले. तेथील भारत - पाकिस्तान अटारी सीमावर्ती भागात जोशपूर्ण ध्वजावतरण, फिरोजपूर येथील कर्नल भार्गव अभ्यंकर यांचा प्रेरणादायी व्यक्ती परिचय, आर्मी कँपसमध्ये निवासव्यवस्था, रणगाडे कार्य विद्यार्थ्यांना अनुभवता आले.

## माध्यमिक विभाग (मराठी) अभिनंदन!

- रामकृष्ण मठाच्या आंतरशालेय मराठी वक्तृत्व स्पर्धेत कु. मुक्ता देशमुख (इ ९ ब) हिला प्रथम क्रमांक मिळाला.
- Silver Zone international Olympiad मध्ये Maths, Science आणि Reasoning and Aptitude – यात प्राप्ती शौचे (१०वी क) हिने सुवर्ण पदक पटकावले.

## पंचकोशाधारित गुरुकुल

आदरणीय भाऊंच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या पंचकोशावर आधारित गुरुकुलात जेव्हा श्रीराजचा प्रवेश झाला तेव्हा आनंदाने डोळे भरून आले आणि एका वेगळ्या पालकत्वाची सुरुवात झाली.

माणसाची पहिली संपत्ती म्हणजे त्याचे शरीर. गुरुकुलाची वेळ सकाळी सात ते संध्याकाळी सात अशी आहे. यात सकाळचा व्यायाम, सूर्यनमस्कार, वेगवेगळी आसन, श्लोक पाठांतर, उपासना यामुळे मनाची एकाग्रता व इंद्रिय संयमन होण्यास मदत होते. तसेच संध्याकाळी दोन तास मैदानावर खेळल्याने शारीरिक क्षमता वाढणे, नेतृत्व, टीम बिल्डिंग आणि महत्त्वाचं म्हणजे आनंद ह्या गोष्टी साधता येतात, कुठलीही गोष्ट साध्य करायची म्हणजे नियमितपणा हवाच. रोजच्या दिनचर्येमुळे अर्थात योग्य आहार व व्यायाम यामुळे १२ जानेवारीला मुले जेव्हा सूर्यनमस्कार घालतात तेव्हा त्यांचा सूर्यनमस्कार घालण्याचा विक्रमी आकडा ऐकून हेवा वाटतो.

बुद्धीचे विविध पैलू विकसित झाले तर बुद्धीचा योग्य वापर करता येतो. गुरुकुलात स्वयं अध्ययन कौशल्य विकसित करण्यासाठी दरवर्षी व्याख्यानमाला होतात. त्यात ताई किंवा दादा अतिशय छान मुद्देसूद सर्व गोष्टी मांडतात. हे शिकण्याचे भाग्य आम्हाला ऑनलाईन तासिकेमुळे लाभले. शिवाय करोनाच्या काळात 'इंग्रजी संभाषण वर्ग' हा उपक्रम घेण्यात आला. आपल्या शाळेच्या स्नातक ताई–दादांशी आमची व मुलांची ओळख झाली. सगळं जग थांबलेलं असताना, गुरुकुलात सुरू झालेल्या या नवीन उपक्रमामुळे मुलांना एक नवी दिशा लाभली. फक्त खंत एवढीच वाटते, करोनाच्या या दोन वर्षात आमचा आवडता उपक्रम मातृभूमी परिचय शिबिर होऊ शकले नाही. पण त्यावर श्रीराजने जे उत्तर मला दिले ते ऐकून मला कौतुकच वाटले. तो म्हणाला, ''अग आई स्नातक म्हणून मी शिबिराला जाऊ शकतो.'' हे प्रबोधिनीच श्रेय आहे – मुलं केवळ शालांत वर्षासाठी नाही तर कायमस्वरूपी प्रबोधिनीशी जोडले जातात. मला जाणवलेली एक गोष्ट... कुठल्याही व्यक्तीत अचानक बदल होत नाही तर योग्य तेव्हा योग्य त्या गोष्टींची पेरणी झाली की व्यक्तिमत्त्व खुलू लागते. आणि हा चांगला बदल मला जाणवला तो प्रतिज्ञा ग्रहण व दासबोध पारायण नंतर. इयत्ता पाचवी ते इयत्ता दहावी असे टप्प्याटप्प्याने सकारात्मक व चांगले बदल मला श्रीराज मध्ये जाणवले आणि हे श्रेय गुरुकुलातील सर्व ताई दादांचे आहे. १२ तास शाळेत असल्याने त्यांचा आपल्या ताई –दादांशी खूप छान संवाद, नातं आहे. याचे मला कौतुक वाटते. गुरुकुलातल्या उपक्रमांमध्ये आम्हालाही सहभाग घेण्याची संधी दिल्याबद्दल मी आनंद व्यक्त करते. आम्हाला गुरुकुलाचे पालकत्व लाभल्यामुळे आमच्याही 'आनंदमय कोशाचा' विकास होत आहे. म्हणूनच म्हणावेसे वाटते.

'प्रबोधिनी संगे आम्ही बी घडलो, आम्ही बी घडलो प्रबोधक झालो'.

**सौ. कीर्ती ओंकार जोशी**
(गुरुकुल पालक)

# समावेशकता

## गणेशोत्सव (निगडी केंद्र)

लो. टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव हा संघटनेचा उत्तम नमुना म्हणून ओळखला जातो. याचेच औचित्य साधून निगडी केंद्रात यार्वर्षी गणेशोत्सव हा तीन आयामांना धरून साजरा करण्यात आला.

पर्यावरण, संस्कृती संवर्धन आणि राष्ट्रीय एकात्मता या अंगांनी विचार करून विविध उपक्रमांचा रचना केली होती.

**पर्यावरण–** या अंतर्गत निर्माल्याचे संकलन करून त्यापासून धूप, अगरबत्ती आणि खत निर्मिती करण्यासाठी या संस्थेकडे पाठवण्यात आले. याला पालकांचा उत्सफूर्त प्रतिसाद मिळाला.

**संस्कृती संवर्धन–** या अंतर्गत संपूर्ण निगडी केंद्रात स्पष्टोच्चारासह अथर्वशीर्ष पठण व्हावे या हेतूने गणेशोत्सवापूर्वी सर्व पालक अध्यापक व विद्यार्थी गटांना अथर्वशीर्षाचे प्रशिक्षण देण्यात आले.

**राष्ट्रीय एकात्मता–** या विषयाला अनुसरून यावर्षी संपूर्ण गणेशोत्सवाची सजावट व प्रदर्शनाचे आयोजन केले होते. यात प्रामुख्याने ईशान्य भारताची माहिती मिळवून ८ राज्यांचे तक्ते, ईशान्य भारतातील समाजजीवन, निसर्ग यांची ओळख करून देणारी सजावट या सर्वांचा समावेश होता.

**समावेशकता–** ह्या आयामाला धरून यावर्षी विविध राज्ये धर्म पंथ भाषा असणाऱ्या परिसरातून नागरिक व पालकांना महाआरतीसाठी निमंत्रित करण्यात आले. तसेच  त्यांच्या हस्ते मातृभूमीपूजन करण्यात आले.

## नारायण हट शाळा, भोसरी (पूर्व प्राथमिक विभाग)

**फूल फूल गुंफुनीच माळ होत असे**

या ओळीप्रमाणेच ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी यांच्या मार्गदर्शनाने भोसरीतील नारायण हट शाळा उभी राहिली आहे. या शाळेला दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी भेट देण्याची संधी मिळाली. विभाग प्रमुख मा. वैशाली तळेगांवकर यांना बक्षीस समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रण दिले होते. त्यांच्याबरोबर विभागातील सात अध्यापिकांनीही भेट दिली. छोटी असली तरी शाळा खूप छान आहे. तेथील मुलांना शिस्तीसाठी खूप चांगले धडे दिले जातात असे दिसून आले. त्यांनी दाखवलेली प्रात्यक्षिकं अभ्यासपूर्ण होती. आणि शिक्षकांनी त्यासाठी घेतलेली मेहनत दिसत होती. कार्यक्रम झाल्यानंतर वर्ग पहाणी करत

असताना वर्गातील भिंतीवर छान चित्र काढली होती, लहान मुलांच्यासाठी सोयी केल्या होत्या. ही प्रकाशन असलेली पुस्तके आणि खेळण्याची लॅब होती यात पंचेंद्रीय तसेच गणित, भाषा, विज्ञान यावरील खूप सुंदर साहित्य असलेली लॅब पाहिली. संकल्पना स्पष्ट करण्यासाठी नक्कीच त्याची मदत होत होती. हे सर्व साहित्य पूर्व प्राथमिक वयोगटासाठी उपयुक्त व हाताळण्यास सोपे असे आहे. त्याचप्रमाणे तेथील मुख्याध्यापिका व शिक्षिका यांना भेटून त्यांच्याशी ओळख करून घेताना जाणवत होते की, शाळा उभारणीसाठी प्रत्येकीनेच खूप मेहनत घेतली आहे आणि अडचणीतून मार्ग काढत प्रवास चालू आहे. भोसरीतील कामगार वर्गाच्या मुलांसाठी दर्जेदार व संस्कार देणारी शाळा उभी करण्याचे ध्येय नक्कीच पूर्णत्वास जाईल.

## पालक - अध्यापक सहल (प्राथमिक गट क्र. २)

**जाऊनी पर्यटनाला ।**

**वाढवूया मैत्री भावाला ।**

**सलाम ज्ञानप्रबोधिनीच्या कार्याला ।**

**ओळखूया ग्रामीण स्त्री शक्तीला ।**

**सहकार्य मिळवून पालकांचे ।**

**गुंफाया बंध संघटनेचे ।।...**

असे संघटनेचे बंध गुंफण्यासाठी आम्ही बुधवार दि. २० डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ७:३० वाजता निघालो. निमित्त होते अध्यापक पालक सहलीचे. १३ अध्यापक, १५ पालक व ३ विद्यार्थ्यांसह ही क्षेत्रभेट जात होती. **सिंहगडाच्या पायथ्याशी असणाऱ्या गुंजवणी खोऱ्यातील, वेल्हे तालुक्यातील, ग्राम प्रबोधिनी केंद्राला भेट देण्यासाठी. सर्वप्रथम वेल्हे तालुक्यातील शिवापूर येथील यंत्र शाळेला भेट दिली.** कै. वि.वि.पेंडसे यांनी लावलेल्या रोपाचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे हे बघता आले. अनुभवता आले. त्यांच्या या कार्यात हिरीरिने काम करणाऱ्या श्री. रामभाऊ डिंबळे व सौ. सुवर्णा गोखले तसेच प्रबोधिनीच्या इतर कार्यकर्त्यांबद्दलचा अभिमान मनात जागा झाला. आपल्या हक्कासाठी लढणाऱ्या, आपल्याबरोबर इतरांचा विचार करणाऱ्या अनेक दुर्गांचे येथे दर्शन झाले.

**आता पुरे झाले घरात बसून ।**

**ऊठ हक्कासाठी कंबर कसून ।।** ..........पद्याच्या या ओळी तेथील महिलांनी प्रत्यक्षात आणल्या.

अतिशय दुर्गम भागात असणाऱ्या वेल्हे येथील युवती सहनिवास केंद्राला या निमित्ताने भेट दिली. दुर्गम भागातील जवळजवळ १६५ स्त्रिया इथे काम करतात, हे सहनिवासाच्या प्रमुख सौ. तृप्ती कुलकर्णी यांच्याशी बोलताना समजले.

## निवासी शिबिरे - (पूर्व मध्यामिक विभाग )

**डोळे उघडून बघा गड्यांनो झापड लावू नका**

**जे दिसते ते असेच का हे उलगडण्याला शिका...**

म्हणजे पूर्व माध्यमिक वयोगटातील विद्यार्थ्यांच्या स्वावलंबन, जिज्ञासा, निरीक्षण, प्रश्नकौशल्य या सर्वांना एकत्रित अनुभव देण्याचे माध्यम म्हणजे निवासी शिबिरे. विभागामध्ये इयत्तावार शिबिरांचे आयोजन पुढीलप्रमाणे करण्यात आले.

यंदाच्या वर्षी माध्यमाच्या एकत्रीकरणामुळे शिबिरातील सहभागी विद्यार्थ्यांची संख्या- इयत्ता ५ वी (१६६), इयत्ता ६ वी (१४०), ७ वी (१०८) लक्षणीय होती.

प्रबोधिनी, संलग्न संस्था आणि परिसर परिचय. ग्रामप्रबोधिनी, साळुम्ब्रे आणि प्रज्ञानबोधिनी, शिरगाव येथे सुरू असलेले शिक्षण व विविध उपक्रम यांचा परिचय इयत्ता पाचवी विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय शिबिरात आयोजित केला होता.

केंद्राचा परिचय व तेथील विशेष बालसत्रांचा लाभ घेणे. या हेतूने मनशक्ती केंद्र, लोणावळा येथील साधकांचा व्यक्ति परिचय करून घेणे, ज्योती ध्यान, परिसरातील नैसर्गिक साधन संपत्तीचा परिचय, बुद्धिवार्धक खेळ, प्रयोग, वंदे मातरम चित्रफीत यांचा अनुभव इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी तीन दिवसीय शिबिरा दरम्यान घेतला. पार्श्वप्रज्ञालय जैन मंदिर, कार्ले लेणी भेट यांचेही नियोजन करण्यात आले होते.

पुणे जिल्ह्याबाहेरील ग्रामीण जीवनाचा अनुभव घेणे या हेतूने बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील, डोंमरी गावात सोनदरा गुरुकुलम येथे इयत्ता सातवीचे चार दिवसीय निवासी शिबिर झाले.

शिबिरात विद्यार्थ्यांसाठी आकर्षण असणाऱ्या शेकोटी, खेळ, गटांतर्गत स्पर्धा यांचे आयोजन प्रत्येक शिबिराच्या वेळी करण्यात आले होते. सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येक दिवसाचे दैनंदिन लेखन करण्याची ओळख शिबिरादरम्यान करून देण्यात आली. पाचवी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिबिर गटात गाव भेटीच्या निमित्ताने ग्रामपंचायत भेट, पदाधिकारी सदस्यांच्या मुलाखती, गावातील गृह भेटी, बाजारातील खरेदी-विक्रीचा अनुभव, श्रमदान असा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला.

विद्यार्थ्यांशी मनमोकाळेपणाने मैत्री करण्याची संधी या निमित्ताने शिक्षकांनी घेतली. पालक प्रतिनिधी आणि पालक सदस्य यांचादेखील शिबिरामध्ये उत्तम सहभाग लाभला.

## देवगाणी - खुली सांगीतिक स्पर्धा -( मुक्तीसोपान विभाग )

**परमेशाच्या नामजपाने चला करूया पवित्र वाणी ।**

**तुम्ही आम्ही मिळूनी गाऊ गोड गळ्याने देव गाणी ।।**

ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र संचालित मुक्तिसोपान संगीत विभाग आयोजित देवगाणी ही खुली सांगीतिक स्पर्धा दिनांक २७ ऑगस्ट २०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती. १४ दिग्गज परीक्षक, १० वादक यांच्या उपस्थितीत ही स्पर्धा विद्यालयाच्या प्रांगणात संपन्न झाली. वय वर्षे ५ ते वय वर्षे ७५ अशा तब्बल ७५० स्पर्धकांनी या नृत्य-गायन स्पर्धेत सहभाग नोंदवला. शालेय मुली, मुलगे, युवा गट, खुला गट, असे गायन व नृत्य याप्रमाणे आणि खास आग्रहास्तव समूहनृत्य (खुला गट) अशा विविध १० गटात ही स्पर्धा संपन्न झाली. स्पर्धा खूपच उत्साहात, खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. ''परीक्षकांनी इतक्या मोठ्या संख्येने स्पर्धकांनी नोंदविलेला सहभाग खरोखरच उल्लेखनीय आहे.'' असे म्हणत सर्वांचे खूपच कौतुक केले. संपूर्ण दिवसभर ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्राचे प्रांगण अगदी भक्तिमय झाले होते. परमेश्वराची आळवणी करताना सर्वजण ही स्पर्धा आहे हे विसरून अगदी तल्लीन होऊन आपली कला सादर करत होते. काही स्पर्धक विशेष प्रशिक्षित तर काही निव्वळ आनंद मिळविण्याच्या उद्देशाने आले होते. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ गणेशोत्सवात २६ सप्टेंबर २०२३ रोजी मनोहर सभागृहात संपन्न झाला.

## बर्ची प्रात्याक्षिके ( युवक विभाग )

युवक विभागाच्या भविष्यातील विस्ताराच्या दृष्टीने, गणेशोत्सव अनेक मंडळांची सकारात्मक भर पडली. याचे पुढचे पाउल म्हणजे गणेशोत्सवातील मंडळांव्यतिरिक्त काही ठिकाणी आणि गणेशोत्सवाव्यतिरिक्त इतर निमित्ताने प्रात्याक्षिके सादर करणे या उद्देशाने बालकल्याण अनाथाश्रम, औंध: मा. नितीनभाई करिया यांच्या संपर्कातून याठिकाणी केवळ युवकांचे बर्ची प्रात्यक्षिक सातव्या दिवशी झाले. विशेष मुलांसोबत ४० युवक पूर्ण तीन तास त्या वातावरणात रमून गेले होते. आश्रमातील सर्वांनी बर्ची नृत्यात सहभाग नोंदवला.

शिवराज्याभिषेकाचे ३५० वे वर्ष म्हणून समाजातील विविध संस्था, पिंपरी चिंचवड मधील ५० वाद्य पथके यांनी आयोजित केलेल्या एकत्रित वादनात युवक विभागाच्या १०० युवकांचा गट बर्ची नृत्य करण्यासाठी सहभागी झाला होता.

## 'संगणक बुद्धिमत्ता स्पर्धा' - युग डिजिटल स्पर्धेचे ( संगणक विभाग )

संगणक बुद्धिमत्ता स्पर्धेचे हे २२ वे तर जिल्हास्तरीय १५ वे वर्ष होते. यावर्षी स्पर्धेचे स्वरूप हे ऑनलाईन व ऑफलाईन असे होते.

एकूण २६ शाळांमधील ७५० विद्यार्थी व ४३ अध्यापकांनी सहभाग नोंदवला.

| | एकूण शाळा | एकूण विद्यार्थी | एकूण शिक्षक |
|---|---|---|---|
| ग्रामीण मराठी माध्यम | १ | २ | ४ |
| ग्रामीण इंग्रजी माध्यम | २ | ४३ | ७ |
| **एकूण** | **३** | **४५** | **११** |
| शहरी मराठी माध्यम | १२ | २७२ | २९ |
| शहरी इंग्रजी माध्यम | ११ | ४३३ | ३ |
| **एकूण** | **२३** | **७०५** | **३२** |
| **एकूण (ग्रामीण + शहरी)** | **२६** | **७५०** | **४३** |

इयत्ता तिसरी ते सहावीच्या विद्यार्थ्यांना स्पर्धेचे वेगवेगळे विषय देण्यात आले होते. त्यानुसार वेगवेगळ्या सॉफ्टवेअर व प्रोग्रामिंगचा वापर करत विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले होते.

तसेच इयत्ता सातवी ते नववीच्या विद्यार्थ्यांचे ९ आणि १० सप्टेंबर रोजी ऑफलाईन वर्कशॉप घेण्यात आले. खालील विषयावर वर्कशॉप घेण्यात आले.

१. प्ले विथ पॉवरपॉइंट

२. क्रिएटीव्ह क्रिएशन

३. लॉजीक बिल्डींग

१५ शाळांमधील १०४ विद्यार्थी या वर्कशॉप मध्ये सहभागी होते. विद्यार्थ्यांचा वर्कशॉप झाल्यावर लगेच विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात आली. संगणक विषयातील तज्ज्ञ श्री. विवेकानंद खिरे, श्री. गिरीश पाटील हे परीक्षक म्हणून लाभले होते.

दिनांक १९ डिसेंबर २०२३ रोजी संगणक बुद्धिमत्ता स्पर्धेचा बक्षीस समारंभ पार पडला. या बक्षीस समारंभाला सीडॅक संस्थेमध्ये कार्यरत असलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेत संशोधन करणाऱ्या सौ. लक्ष्मी पानट या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच निगडी केंद्राचे केंद्रप्रमुख आ. श्री. मनोज देवळेकर व निगडी केंद्रातील मान्यवर सदस्य उपस्थित होते.

# नवोन्मेषता

## टाटा समूहातर्फे ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्प (क्रीडाकुल विभाग)

ज्ञान प्रबोधिनी क्रीडाकुल व टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्प कार्यशाळा अंतर्गत Radical Transformational Leadership प्रशिक्षण दिनांक ३० व ३१ मार्च २०२४ रोजी घेण्यात आले. सदर प्रशिक्षणात बारामती, मावळ, चिपळूण व सोलापूर केंद्रातील प्रशिक्षक, वैद्य, मानसतज्ज्ञ व समन्वयक असे एकूण ४० सदस्य उपस्थित होते. कार्यशाळेमध्ये सदस्यांना RTL प्रशिक्षणातून संघ बांधणी, ध्येय निश्चित करणे तसेच खेळाडूंच्या जडण-घडणीमध्ये क्रीडा-आरोग्य व मानस विभागाचे महत्त्व व जबाबदारी काय असते हे सांगण्यात आले. तसेच खो-खो, कबड्डी व ॲथलेटिक्स या खेळांचे सराव घेण्यात आला. यामध्ये प्रशिक्षकांना सदर खेळातील मूलभूत कौशल्ये व पूरक खेळ शिकवण्यात आले. या कार्यशाळेमध्ये प्रमुख अभ्यागत म्हणून श्री. सुदर्शन रॉड्रीक्स (CEO-RTL), श्री. लिमये काका व मा. नीलम बाबरदेसाई (HOD TATA Trust-Sports) उपस्थित होते.

## गणेशोत्सव ( माध्यमिक विभाग इंग्रजी माध्यम )

ज्ञान प्रबोधिनीने या वर्षी गणेशोत्सव साजरा करताना पुढील ३ उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न केला.

उद्दिष्टे – १. संस्कृती संवर्धन, २. पर्यावरण संवर्धन, ३. सामाजिक ऐक्य

माध्यमिक इंग्रजी विभागानेदेखील ही उद्दिष्टे समोर ठेऊन काही उपक्रम घेतले. संस्कृति संवर्धनांतर्गत सर्व मुलांनी अथर्वशीर्षाचे पठण केले. या वर्षी मुलांनी अथर्वशीर्षाचे पठण शुद्ध उच्चारासाहित करावे असे ठरवले होते. त्यानुसार त्यांचा सरावदेखील घेण्यात आला. इयत्ता नववीतील काही मुलांनी गटश: दोन सोसायटीमधील सदस्यांसमोर अथर्वशीर्षाचे पठण केले.

पर्यावरण संवर्धन या उद्दिष्टानुसार विभागामध्ये इयत्ता आठवी, नववी, व दहावी या वर्गांमध्ये पर्यावरण हा विषय देऊन घोषवाक्य बनविणे हा उपक्रम दि. १५ सप्टेंबर २०२३ रोजी दोन दोन मुलांच्या गटामध्ये घेण्यात आला. मुलांनी नवनवीन कल्पना वापरुन सुंदर आणि अर्थपूर्ण घोषवाक्य तयार केली. विभागाच्या महाआरती मध्ये मुलांनी तयार केलेली निवडक घोषवाक्ये मांडण्यात आली. पर्यावरणाविषयी जनजागृती करण्यासाठी दोन सोसायट्यांमध्ये पर्यावरण हा विषय घेऊन इयत्ता आठवीच्या मुलांनी पथनाट्य सादर केले. त्यानंतर प्लॅस्टिक कमीत कमी वापरण्याविषयी आणि ओला व सुका कचरा वेगवेगळा करण्याविषयी लोकांना शपथ देण्यात

आली. त्याचप्रमाणे सोसायटीमधील सादरीकरणामध्ये देखील पथनाट्य सादर करताना ह्याच घोषवाक्यांचा योग्य उपयोग करण्यात आला. त्याचबरोबर इयत्ता आठवी, नववी व दहावीच्या मुलांसाठी रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे नेहमीची रांगोळी न वापरता पर्यावरणपूरक नैसर्गिक साहित्य वापरुन रांगोळी काढायची होती. रांगोळी न वापरता काढलेल्या रांगोळ्या ही एक 'अनोखी' कला सर्वांना पाहायला मिळाली. त्यात सहभागी झालेले विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचे खूप कौतुक करण्यात आले.

सामाजिक ऐक्य ह्या उद्दिष्टपूर्तीसाठी समाजामध्ये प्रत्यक्ष जाऊन संवाद साधणे अपेक्षित होते. त्यासाठी गिरीराज सोसायटी व स्वामी विवेकानंद सोसायटीमध्ये जाऊन काही उपक्रम सादर करण्यात आले. शाळेतील शिक्षक, युवक, युवती आणि पालकांच्या मदतीने मुलांचे सादरीकरण झाले. यावेळी मुलांनी अथर्वशीर्ष पठण, पर्यावरण विषयावर पथनाट्य आणि बर्ची नृत्य सादर केले. त्याचप्रमाणे या गणेशोत्सवामध्ये अभिरुची गटातील मुलांनी काही विषयांचा अभ्यास केला होता. त्याचे सादरीकरण मुलांनी सोसायटीमध्ये केले. त्यात गणेशोत्सव व भौतिक शास्त्र – पंचांग शास्त्र, गणेशोत्सव व रसायनशास्त्र – कापूर, गणेशोत्सव व भूगोल – प्लॅस्टिक प्रदूषण, गणेशोत्सव व संस्कृत मंत्र महत्त्व इ. विषयांचा समावेश होता.

## निसर्ग शाळा उपक्रम ( पूर्व माध्यमिक विभाग )

विकासाच्या प्रक्रियेत निसर्गाचा विचार व्हावा, उपलब्ध संसाधने बेसुमार वापरल्याने होणाऱ्या दुष्परिणामांची सखोल ओळख व्हावी; मुलांमध्ये कृतीशील संवेदना निर्माण व्हावी या उद्देशाने निसर्ग शाळा हा उपक्रम पूर्व माध्यमिक विभागात सातवीच्या चारही तुकड्यांसाठी (१५८ विद्यार्थी) दर शनिवारी सुरू झाला. वर्षभरात एकूण ३० तासिका, २ क्षेत्र भेटी, ४ तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली.

उपक्रमाची कार्यवाही करण्यापूर्वी तयारी म्हणून भूसंवर्धनासाठी काम करणाऱ्या ऑयकॉस संस्थेच्या केतकी घाटे यांचा तीन दिवसीय प्रशिक्षक प्रशिक्षण वर्ग झाला. यामध्ये २ पालक व ४ शिक्षक यांचा सहभाग होता. नियोजित अभ्यासक्रम झाडे, नकाशा, पाणी, प्रदूषण, ऊर्जा – कर्ब उत्सर्जन, शेती या विषयांमध्ये विभागण्यात आला.

विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता वाढणे, उपलब्ध माहितीचे विश्लेषण करता येणे, प्रश्न कौशल्य, निसर्गाप्रती संवेदनशीलता वाढीस लागणे या उद्दिष्टांचा विचार करून तासामध्ये कृतीयुक्त रचना केलेली होती. उदा. बॉटनीमध्ये शिकवली जाणारी हर्बेरियम ही संकल्पना विद्यार्थ्यांना शिकविण्यात आली. पर्जन्यमापक, दंतमंजन, झेंडू पाकळ्यांपासून रंग, ओल्या कचऱ्यातून खत निर्मिती, प्लास्टिक संकलन आवाहन असे प्रयोग काही मुले घरून करायला लागली. नकाशावर दोरीच्या मदतीने सोलापूर – गोवा अंतर मुलांना मोजायला शिकविण्यात आले. समाजातील प्रदूषणाची वास्तवता विद्यार्थ्यांसामोर मांडण्यात आली आणि त्यावर चर्चा घडवण्यात आली.

निसर्गाचे संवर्धन राखण्यासाठी सुरू असलेले प्रयत्न मांडण्यासाठी श्री. उमेश वाघेला यांचे वृक्ष परिचय, श्री. उपेंद्र धोंडे यांचे जलसुरक्षा विषयक, श्री. कुमार भवार यांचे शेतीविषयक, टेक्स्टाइल डिझायनर मीनल रेडिज यांचे नैसर्गिक रंगांची निर्मिती विषयक व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.

पेट्रोल फ्री ब्राझील, हरित क्रांतीचे जनक डॉ. स्वामीनाथन, पाणी फाउंडेशन, हिवरे बाजार, बंगलोर मेट्रो सिटीमधील पाणी संकट अशी सद्य स्थितीतील उदाहरणे व तज्ज्ञ व्यक्तींशी थेट संवाद यातून विद्यार्थ्यांची प्रेरणा वाढली असा विश्वास निसर्ग शाळा तास घेणाऱ्या पालकांनी नोंदविला.

या तासांच्या माध्यमातून दोन अभ्यास सहली अनुक्रमे पवना जलदिंडी व मोशी कचरा डेपो येथे नेण्यात आल्या. समाजातील नदी प्रदूषण वस्तुस्थिती आणि तयार झालेले कचऱ्याचे डोंगर यांचे दर्शन विद्यार्थ्यांना या सहलीच्या माध्यमातून झाले. ओल्या कचऱ्यातून खत निर्मिती व सुक्या कचऱ्यातून वीज निर्मिती असे प्रकल्प मुलांनी मोशी येथे प्रत्यक्ष जाऊन पाहिले.

निसर्ग शाळा या उपक्रमात नऊ पालकांनी नियमितपणे आणि अभ्यासपूर्ण सहभाग नोंदविला. अतिशय मैत्रीपूर्ण वातावरणात निसर्गाप्रत असलेली विद्यार्थ्यांची भूमिका कृतियुक्त उपक्रमांच्या माध्यमातून स्पष्ट केली.

## एक वर्ग एक सण सादरीकरण ( प्राथमिक गट क्रमांक १ )

स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील एक आनंदाचा क्षण असतो. या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुणाला तसेच इतर कलागुणांना वाव मिळतो. मुले शाळेच्या वातावरणात अधिक मोकळी होतात, पालक – शिक्षक छान गटबांधणी होते. प्राथमिक विभागात एक वर्षाआड स्नेहसंमेलन होत असल्यामुळे सांस्कृतिक खात्यांतर्गत अनेक उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून 'एक वर्ग एक सण' सादरीकरण हा उपक्रम घेण्यात आला.

प्रत्येक वर्गाच्या वर्गशिक्षकांनी मे महिन्यात आपल्या वर्गासाठी सणाची निवड केली. त्यानुसार वर्गाशिक्षकांचे नाटक लिहिणे किंवा नाचासाठी गाणे शोधणे असे काम हळूहळू सुरू झाले. पूर्ण वर्षभर आषाढी एकादशीबरोबर नागपंचमी, राखीपौर्णिमा, दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दिवाळी आणि संक्रांत असे आठ सण आठ वर्गांनी उत्तमरित्या साजरे केले. प्रत्येक पारंपरिक सणाला आधुनिकतेची जोड देऊन सणाचे वेगळेपण जपण्यात आले. प्रत्येक सणाला त्या वर्गाच्या मुलांसोबत त्या वर्गाच्या पालक व शिक्षकांचेही सादरीकरण झाले. यामुळे त्यांच्यातील नातेसंबंध दृढ झाले. १ जुलै २०२३ रोजी महाराष्ट्राचं आद्य दैवत असणाऱ्या विठोबाच्या आषाढी एकादशीच्या कार्यक्रमाने श्रीगणेशा झाला. या कार्यक्रमात ग्रंथदिंडी, वृक्षदिंडी अशा प्रबोधन दिंड्यांचा समावेश होता.

https://youtu. be/ipbpbtj8tfg?si=v9ErTB6sNNDcjatR या लिंकवर आपण ही चित्रफीत पाहू शकतो.

## प्राणीमित्रांचा परिचय (पूर्व प्राथमिक विभाग)

पूर्व प्राथमिक विभागातील बालचमूंसाठी महिन्यातून एकदा बालसभांचे आयोजन केले गेले. यात प्रामुख्याने त्या त्या महिन्यातील वाढदिवस झालेल्या मुलांचे कौतुक आणि उपासना, प्रकल्प सादरीकरण, नाट्यीकरण, पपेट शो अशा विविध उपक्रमांचे सादरीकरण असते.

मार्च महिन्यातील बालसभा मात्र अविस्मरणीय ठरली. या बालसभेत विविध पाळीव प्राणी घेऊन एक दादा विभागात आले होते. यामध्ये ऑस्ट्रेलियन जातीचे आणि पर्शियन जातीचे मांजर, अमेरिकन जातीची कोंबडी, बदक आणि एक जायंट लिझर्ड, सुंदर छोटे छोटे पक्षी तसेच उंदीर यांचा समावेश होता.

सगळे प्राणी पाहताच मुलांनी आनंदाने कलकलाट सुरू केला. नंतर आलेल्या दादांनी प्रत्येक प्राण्याविषयी थोडक्यात माहिती सांगितली. प्रत्येक मुलाने प्राण्यांना हात लावण्याचा अनुभव घेतला.

मिठू मिठू करणारा पोपट आणि मुक्त संचार करणारी मांजर आणि अमेरिकन कोंबडी मुलांना जास्त आवडली. मुलांमधील प्राणी, पक्षी यांच्या विषयीची भिती दूर होणे, त्यांच्या विषयी प्रेम मनात निर्माण होणे हा उद्देश ठेवून हा उपक्रम घेतला गेला.

## वार्षिक स्नेहसंमेलन (प्राथमिक गट क्रमांक २)

शिक्षक-विद्यार्थी-पालक आंतरक्रिया दृढ करणे, विविध कलागुणांना वाव देणे आणि मुख्य म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांची सविस्तर माहिती होणे या उद्देशाने यावर्षी प्राथमिक गट २ चे वार्षिक स्नेहसंमेलन बुधवार दिनांक ३१ जानेवारी २०२४ रोजी संपन्न झाले. यात १००% मुलांचा सहभाग होता. या सादरीकरणाच्या मदतीसाठी आणि प्रत्यक्ष सादरीकरणातही पालकांनी सहभाग घेतला.

मुलांच्या सादरीकारणापूर्वी गोष्टीरूपात शिवाजी महाराजांचे चरित्र विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. दोन आठवड्यात सर्व सादरीकरणाचा सराव घेण्यात आला. पोतराज नृत्य, पोवाडा आणि शिवराज्याभिषेक यांसारखे कार्यक्रम हे या संमेलनाचे वैशिष्ट्य ठरले.

कार्यक्रमाला इतिहास अभ्यासक, कवी, गझलकार श्री. संतोष घुले उपस्थित होते. कार्यक्रम पाहून पाहुण्यांनी मुलांचे भरपूर कौतुक केले. 'हा कार्यक्रम तिसरी-चौथीच्या मुलांनी सादर केला आहे यावर माझा विश्वासच बसत नाही'. अशा शब्दात त्यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

भारताबाहेर असणाऱ्या मुलांच्या नातेवाईकांनीसुद्धा दूरस्थ पद्धतीने कार्यक्रमाचा आनंद घेतला. त्यामुळे ७००० पेक्षा जास्त views online कार्यक्रमाला मिळाले.

# प्रभाव

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा

राज्यात २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' हे अभियान राबवले होते. यात १,०३,३१२ शाळांनी सहभाग नोंदवला होता. यात ज्ञान प्रबोधिनी निगडीचा महानगरपालिका गटात राज्यात प्रथम क्रमांक आला. याचा पारितोषिक वितरण समारंभ दिनांक ५ मार्च २०२४ रोजी मा. मुख्यमंत्री, आणि शिक्षण मंत्री यांच्या उपस्थितीत मुंबई येथे झाला. या सोहळ्यासाठी विद्यालयातर्फे पालक, अध्यापक, माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि प्राचार्य सहभागी झाले होते. या अभियानाच्या माध्यमातून शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ, शालेय व्यवस्थापन, सामाजिक बांधिलकी अशा विविध विषयांवर घेतलेल्या उपक्रमांची दखल घेतली गेली.

## अधिमित्र योजना

निगडी केंद्रात २०२३-२४ हे शैक्षणिक वर्ष अधिमित्र वर्ष म्हणून जाहीर झाले. वार्षिक विषयाच्या नियोजनापूर्वी सर्व सदस्यांचे अध्यापक शिबिरात एक प्रशिक्षण सत्र आयोजित केले होते. यासंबंधी काय उपक्रम योजिले जातील? त्यांची अंमलबजावणी कशी करता येईल? याचा विचार विभागशः चर्चांमधून करण्यात गेला. त्याप्रमाणे पूर्व प्राथमिक विभागापासून सर्व वयोगटाच्या विद्यार्थ्यांसाठी, पालक व अध्यापकांसाठीही अधिमित्र योजनेतून वैयक्तिक संवाद, पालक संवाद, गृहभेटी, वर्गमित्र संवाद, अधिमित्र विशेष तासिका अशा स्वरूपाच्या उपक्रमांचे नियोजन केले होते. अध्यापकांसाठी दिवाळीत कुटुंब मेळावा आयोजित केला होता. अधिमित्र तासिकांचे नियोजन करताना, वर्गमित्र तासिका, हसत खेळत बुद्धी विकास, सामाजिक जाणीव संवर्धन आणि छात्र प्रबोधन निर्मित साहित्याचा वापर केला गेला.

## चतुर्वेद मंत्रशतक पारायण यज्ञ

बुधवार दिनांक १ मे २०२४ रोजी निगडी केंद्राचे संस्थापक कै. वामनराव अभ्यंकर तथा भाऊ यांची जयंती; तसेच महर्षी दयानंद यांची २०० वी जयंती या दोन्हीचे औचित्य साधून निगडी केंद्रातील मातृमंदिरात चतुर्वेद मंत्र शतक आहुती यज्ञाचे दोन सत्रात आयोजन केले होते. निगडी केंद्राचे केंद्रप्रमुख वाच. मनोजराव देवळेकर हे सपत्निक पूजक म्हणून यज्ञास उपस्थित होते. निगडी केंद्रातील सर्व सदस्य देखील या यज्ञास

उपस्थित होते. यानिमित्ताने व्याख्यानांचेही आयोजन केले होते. यात सकाळी ज्ञान प्रबोधिनीचे संचालक वाच. गिरीशराव बापट यांनी व्याख्यानात प्रामुख्याने प्रबोधिनीचे पथदर्शक असलेल्या महर्षी दयानंदांचे विचार सांगितले. हे विचार प्रबोधिनीच्या राष्ट्रकार्यात कसे प्रेरणादायी ठरतात हे सांगितले. स्वामी दयानंदांच्या 'सत्यार्थ प्रकाश' ग्रंथातील १० समुल्लासांच्या माध्यमातून त्यांनी हे विचार समजावून सांगितले.

दुपार सत्रामध्ये जागतिक धर्मप्रचारक आचार्य सोनेरावजी यांनी महर्षी दयानंद व आर्य समाज या विषयी अधिक माहितीची भर घालताना ज्ञानार्जनाबरोबरच अध्यात्मिक उपासना सर्वांनी केली पाहिजे, आपल्या संस्कृतीचे जतन करायला पाहिजे, त्या मागचा विचार समजून घेतला पाहिजे असे सांगितले.

## दिल्ली प्रशिक्षण योजना : क्रीडाकुल

Directorate of Education, GNCTD DIET/SCERT यांच्या माध्यमातून दिली पब्लिक स्कूलच्या शालेय क्रीडा शिक्षकांसाठी क्रीडाकुल विभागातर्फे प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्याची संधी या वर्षात मिळाली ती दिल्ली शिक्षण विभागातील निवृत्त Dept. Director सौ. निरुपमाताई अभ्यंकर यांच्या सहकार्यामुळे.

खेळातील प्रशिक्षणासाठी शास्त्रशुध्द योजनेचा अवलंब क्रीडाकुल विभागात गेली २५ वर्षे करण्यात येत आहे. या संकल्पनेचा प्रचार व प्रसार होण्याच्या दृष्टीने दिल्ली शासन संस्थेतील उच्च पदस्थ अधिकाऱ्यांच्या समोर क्रीडाकुल संकल्पनेची मांडणी करण्यात आली.

Traditional Science आणि Modern Science याचे collaboration खेळात करून त्या माध्यमातून खेळाडूंचा सर्वांगीण विकास घडविण्याचा हेतू डोळ्यांसमोर ठेऊन या प्रशिक्षण वर्गांची रचना एकून तीन टप्प्यात करण्यात आली होती.

त्या अंतर्गत दिनांक १९ ते २३ जून २०२३ दिनांक २ ते ६ ऑगस्ट २०२३ आणि दिनांक २ ते ७ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत झालेल्या सत्रात ३८ क्रीडा शिक्षक, ४ समन्वयक यांचा सहभाग होता.

या अंतर्गत –

- सुयोग्य जीवनशैलीसाठी योगशास्त्राचा आधार
- खेळाडूच्या सर्वांगीण विकासासाठी आयुर्वेदाचा अवलंब
- Body Posture
- खेळाडूचा आहार
- Recovery
- व्यक्तिमत्त्व विकसनासाठी क्रीडा माध्यम

- Lead up games ही संकल्पना
- Mother game – खेळाडू विकसनाचे साधन
- Fitness Assesment
- पंचकोश माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकसन

अशा संवादमालेचे आयोजन करण्यात आले होते.

त्याबरोबरीने पारंपरिक क्रीडा प्रकार, Rifle Shooting, Archery, Mat Kabaddi, योगासने, कुडो, लाठी–काठी, बर्ची या विषयांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण व त्याचे सहभागी सदस्यांकडून सादरीकरण अशा कृती सत्रांचा देखील समावेश करण्यात आला होता.

या जोडीला निगडी केंद्रातील क्रीडाकुल, गुरुकुल, मुक्तीसोपान, अटल या विभागांच्या भेटींचे नियोजन करण्यात आले होते. या माध्यमातून निगडी केंद्रातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रारूप सर्व सहभागी सदस्यांपर्यंत पोहचविता आले.

## मा. शेखर सिंह यांची भेट

ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयाने Directorate of Education, GNCTD DIET/SCERT यांच्या माध्यमातून दिली पब्लिक स्कूलच्या शारीरिक शिक्षकांसाठी १९ जून ते २३ जून या कालावधीत 'Capacity Building Program for Physical Education Teacher' चे आयोजन केले होते.

या प्रशिक्षणाचे उद्घाटन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त श्री शेखर सिंह (IAS) यांचे हस्ते आणि ज्ञान प्रबोधिनीचे शिक्षण समिती अध्यक्ष, निवृत्त आयकर आयुक्त डॉ. राजीव रानडे यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी दिल्ली SCERT अधिकारी श्री. राकेश कोठारी, श्रीमती सरला देवी, निवृत्त शिक्षण उपसंचालिका श्रीमती निरुपमा अभ्यंकर या उद्‌घाटनाला उपस्थित होत्या.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त श्री. शेखर सिंह यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात शिक्षकांना स्पर्धात्मक खेळाचे महत्त्व सांगितले. पिं. चिं. मनपा राबवीत असलेल्या योजनांची माहिती सांगून विकसित शहरासाठी क्रीडा प्रकल्प व योजनांचे महत्त्व सांगितले. ''ज्ञान प्रबोधिनी संस्था मुलांचा सर्वांगीण विकास करणारी संस्था म्हणून प्रसिध्द आहे, खेळातील प्रशिक्षणासाठी त्यांनी शास्त्रशुध्द योजना क्रीडाकुल ही गेली २५ वर्षे शहरात राबविलेली योजना आहे. येथे तुमचे प्रशिक्षण होते आहे हे तुमचे भाग्य आहे'', असे सांगितले.

माजी आयकर आयुक्त डॉ. राजीव रानडे यांनी त्यांच्या भाषणात प्रशिक्षकांना त्यांच्या कर्तव्य आणि जबाबदारीची जाणीव करून देऊन विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षणात शिकलेल्या कौशल्याचा उपयोग नक्की करून द्यावा असे सांगितले. तसेच Traditional Science आणि Modern Science याचे collaboration खेळात कसे करता येईल याबद्दलचा विचार मांडला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञान प्रबोधिनीचे शिक्षक प्रशिक्षण विभाग प्रमुख श्री. प्रशांत दिवेकर यांनी केले. त्यामध्ये ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण कार्याचा उद्देश आणि विस्तार त्यांनी मांडला. सौ. निरुपमा अभ्यंकर यांनी प्रशिक्षणाविषयीची मांडणी केली. आगाशे कॉलेजचे प्राध्यापक डॉ. महेश देशपांडे यांची देखील उपस्थिती या कार्यक्रमास होती.

कार्यक्रमाचा समारोप ज्ञान प्रबोधिनी विद्यालयाचे केंद्रप्रमुख आणि प्राचार्य श्री. मनोज देवळेकर यांनी केला. त्यांनी क्रीडा क्षेत्रातील शिक्षकांनी आपल्या कामासाठी मार्गदर्शक विचार जोपासला पाहिजे. खेळ हे सर्वांनाच जीवनासाठी आवश्यक तत्त्वे, विचार शिकवितात असे सांगितले. हार-जीत पचविणे, पराक्रम करणे, संघभावना हे सर्व खेळातूनच उत्तमपणे शिकविता येते असे सांगितले.

## शंभरावे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन

यंदा शंभरावे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन पिंपरी चिंचवडमध्ये संपन्न झाले. यामध्ये मुक्तीसोपान विभागातील मयुरीताई जेजुरीकर यांनी बालनगरी मंडप समिती सदस्य म्हणून काम पाहिले. त्यांच्यामार्फत विद्यालयातील माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांना नाट्य संमेलनातील एका मंडपात आपली कला सादर करण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांनी त्या संधीचे सोने करत ‘विठ्ठल तो आला आला’ हे नाटक सादर केले. त्याचबरोबरीने अनेक दर्जेदार बालनाट्ये विद्यार्थ्यांना पाहायला मिळाली. अनेक विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून काम करण्याचा अनुभव घेतला. अध्यापकांच्या या योगदानाबद्दल व विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलेबद्दल विद्यालयास स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

## कौशल्य सादरीकरण - एक अनोखा अनुभव

भवितव्य लेखात इ. ३ री ते ६ वी साठी संगणकीय कौशल्यानुसार नोंदी ठेऊन त्यानुसार मूल्यमापन पद्धत रूढ करणे असे एक उद्दिष्ट मांडले आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी संगणकीय कौशल्यांच्या याद्या करणे, त्या तज्ज्ञांकडून तपासणे, त्यावर पुन्हा आमच्या अनुभवातून भर घालणे व कौशल्यानुसार विद्यार्थ्यांकडून सराव करवून घेणे हे अतिशय आव्हानात्मक काम सुनियोजित पद्धतीने करण्यात आले. जवळजवळ १२०० विद्यार्थ्यांच्या प्रत्येक तासाच्या कौशल्यानुसार नोंदी ठेवण्यात आल्या.

नोंदी केल्यानंतर त्या केवळ कागदावर न राहता, विद्यार्थ्यांनी खरंच किती व कशी कौशल्ये संपादन केली आहेत हे बघण्यासाठी पालक व शिक्षकांसमोर ‘कौशल्य सादरीकरणाचा’ प्रयोग करण्यात आला. यामध्ये सादरीकरणाचे वेगवेगळे प्रकार ठरविले गेले. ज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा, कौशल्यांवर आधारित सरावपत्रिका, ज्यात प्रत्येक कौशल्याचे कल्पकता वापरून कमीतकमी १० सराव साहित्य होते. याबरोबरच पालक जी चिट्ठी निवडतील, त्यात नमूद केलेली गोष्ट ते पालकांना करून दाखविणे असे अनेक प्रकार होते. ‘मी गुरु, तू शिष्य’ या प्रकारांतर्गत तर विद्यार्थी पालकांचे गुरु बनले होते आणि त्यांनी पालकांना विविध संगणकीय

कौशल्ये शिकविली.

**१९ फेब्रुवारी ते २१ मार्च २०२४** या कालावधीत इयत्ता तिसरी ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांचे कौशल्य सादरीकरण वर्गानुसार साजरे करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादरीकरणाच्या दिवशी पालकांसमोर डिझायनिंग कौशल्य, प्रोग्रामिंग कौशल्य, माउस हाताळण्याचे कौशल्य, की-बोर्ड हाताळण्याचे कौशल्य पालकांसमोर सादर केले.

**संगणकाधारित विकसन प्रकल्पातील इ. पाचवी ते सातवीचे प्रकल्प तर लर्न-क्रिएट-ॲप्लाय म्हणजेच शिका-तयार करा व वापरा या संकल्पनेवर आधारित होते.** उदा इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी ५ वी स्कॉलरशिपचे - इंग्रजी आणि बुद्धिमत्ता या विषयातील संकल्पना समजण्यासाठी आकर्षक प्रेझेन्टेशनची साधने तयार केली होती. इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी प्रोग्रमिंगचा वापर करून ऑटोमेटेड डॉक्युमेंट-फ्लायर-शेड्यूल क्रिएशन आणि पॉवरपॉइंटसाठी वापरण्यात येणाऱ्या डिझाईन थीम्स तयार केल्या होत्या. इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक विषयांवर आधारित ॲनिमेटेड प्रकल्प आणि त्यावर आधारित प्रेझेन्टेशन क्रिएशन टूल तयार केले होते.

विभागाला २५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे यावर्षी वातावरण निर्मिती हे महत्वाचे आकर्षण होते. **अतिशय बोलके असे चार्टस्, पोस्टर्स्, साहित्याची केलेली मांडणी व अभिप्राय घेण्यासाठीची नावीन्यता... हे सगळे वातावरणात उत्साह आणणारे असे होते.** पालकांनी सकारात्मक प्रतिसाद देत कौतुक तर केलेच, पण विद्यार्थी एवढ्या लहान वयात संगणक किती कौशल्याने हाताळत आहेत हे पाहून पालक भारावून गेले होते. विद्यार्थ्यांनी व पालकांनी यावर्षी कौशल्य सादरीकरणाचा मनमुराद आनंद घेतला.

## संकल्पपूर्ती

सन २०२२ च्या वर्षारंभ उपासनेत प्राथमिक गट २ या विभागाने संकल्प केला होता. तो म्हणजे कै. भाऊंविषयी गोष्टी लिहिण्याचा. येणाऱ्या पिढीला, प्राथमिकच्या विद्यार्थ्यांना कै. वा. ना. अभ्यंकर अर्थात भाऊंची ओळख या गोष्टींच्या रूपातून व्हावी, त्यांच्या कार्याची, त्यांच्या सद्‌गुणांची ओळख मुलांना करून द्यावी, त्यांच्यातील संस्कारांचे बाळकडू मुलांना द्यावे या हेतूने विभागातील अध्यापकांनी भाऊंच्या गोष्टी लिहिण्याचा प्रपंच मांडला. त्यासाठी भाऊंच्या संपर्कातील अनेक कार्यकर्ते, मित्र, आप्तेष्ट यांचे अनुभव कथन अध्यापकांनी ऐकले. त्यातून गोष्टी लिहिण्याचा प्रयत्न केला. त्या गोष्टींना शास्त्रशुद्ध कथेचे रूप देण्यासाठी कथालेखनाचे प्रशिक्षण श्री. प्रभाकर पवार यांच्याकडून घेतले. त्यातून एकूण १४ गोष्टी तयार झाल्या. त्या गोष्टी विद्यालयाच्या माजी अध्यापिका सौ. सुलभा पाचभाई यांच्याकडून तपासून घेतल्या. केंद्र प्रशासक श्री.शिवराज पिंपुडे यांच्या अनुमतीने पुस्तकाच्या पाच प्रती छापून घेतल्या. विद्यालयातील माजी अध्यापिका सौ. सुनंदाताई पुणतांबेकर, सुहासिनीताई पानसे, माजी पालक श्री. अजय लोखंडे व केंद्र व्यवस्थापक श्री. आदित्य शिंदे यांनी

पुस्तकाच्या परीक्षणाचे काम केले. परीक्षणातून आलेल्या अभिप्रायानुसार अध्यापकांनी त्यावर काम केले. काही बदल करून १ मे २०२४ रोजी पुस्तकाचे प्रकाशन झाले.

## डॉ. विजय केळकर यांची पूर्व प्राथमिक विभागाला भेट

गुरुवार दिनांक २८ मार्च २०२४ रोजी अर्थतज्ज्ञ पद्मविभूषण डॉ. विजय केळकर व सौ. लताताई केळकर यांनी निगडी केंद्रातील पूर्व प्राथमिक विभागाला भेट दिली. सोबत उमाताई बापट याही उपस्थित होत्या. विभागातील कृतियुक्त शिक्षण पद्धती त्यांनी समजून घेतली. विभागप्रमुख वैशालीताई तळेगावकर यांनी पीपीटी द्वारे विभागाची संपूर्ण माहिती दिली. कृतीशिक्षणाचा अनुभव हा पाच क्षेत्रांमध्ये अभ्यासक्रमाची रचना करून केलेला आहे. त्याप्रमाणे जीवन व्यवहार, शारीरिक व कारक कौशल्य, वाचन गणन लेखन, कलानुभव, परिसर व विज्ञान या क्षेत्रांची मांडणी केलेली होती आणि बालवर्गाची मुले त्यावर स्वतः अनुभव घेत होती. विशेष म्हणजे जीवन व्यवहारातील अनेक गोष्टी म्हणजे सोलणे, कुटणे, निवडणे असे कृती उपक्रम पाहून पाहुण्यांना फार कौतुक वाटले. केंद्रीय सदस्यांशी मनमोकळ्या गप्पा मारत त्यांनी एका नव्या योजनेची चर्चा केली.



पंचकोश विकसन चिंतन परिषद

# गुरुकुल विभाग

प्रभाव

कै. वा. ना. अभ्यंकर तथा भाऊ यांच्या तृतीय पुण्यतिथीनिमित्त ज्ञान प्रबोधिनी निगडी, गुरुकुल आयोजित राज्यस्तरीय पंचकोश शिक्षण चिंतन परिषद सौर माघ २६ व २७ शके १९४५ म्हणजेच १५, १६ फेब्रुवारीला संपन्न झाली. कै. भाऊंनी सुरू केलेल्या गुरुकुल प्रयोगाचे सार्वत्रीकरण करणे, नवीन शैक्षणिक धोरणात मांडलेले पंचकोश शिक्षण प्रणालीचे तत्त्व समजून घेणे, प्रबोधिनीचा महाराष्ट्रभरातील संपर्क दृढ करणे अशा विविध उद्दिष्टांसाठी ही परिषद आयोजित करण्यात आली होती. या दोन दिवसांच्या परिषदेमध्ये सहभागी सदस्यांसाठी खालीलप्रमाणे विविध सत्रांचे आयोजन केले होते.

- बीजभाषण – 'शिक्षणातील भारतीय तत्त्वविचार' : वाच. गिरीशराव बापट
- व्यक्तिमत्त्व विकसनाची आजची गरज : प्रा. रेणू दांडेकर, अध्यक्ष : प्रा. महेंद्र सेठिया
- शैक्षणिक संस्कार: शिक्षण संकल्प ते आचार्यव्रत प्रा. शिवराज पिंपुडे, श्री. श्रीराम इनामदार, सौ. श्रुती फाटक, वाच. अनघा लवळेकर
- नवीन शैक्षणिक धोरणातील भारतीयत्व : वाच. मनोज देवळेकर, वाच. प्राची साठे, अध्यक्ष प्रा. गजानन लोंढे.
- चिंतनिका : हनुमंताचे पंचकोशात्मक चरित्र : ह. भ. प. चारुदत्तबुवा आफळे
- गुरुकुल कार्यप्रात्याक्षिके व पंचकोशांचे क्रीयान्वयन : गुरुकुलाचे अध्यापक, विद्यार्थी
- ज्ञान प्रबोधिनीची पंचकोशात्मक शिक्षण प्रणाली : प्रा. प्रशांत दिवेकर, श्री. आदित्य शिंदे, अध्यक्ष वाच. सविता कुलकर्णी
- कै. भाऊंनी लिहिलेल्या 'पंचकोश विकसनातून शिक्षण' या पाचव्या आवृत्तीचे प्रकाशन वाच. इरेश स्वामी, अध्यक्ष प्रा. सुभाषराव देशपांडे यांच्या हस्ते झाले.

या नवीन आवृत्तीमध्ये आधीच्या लेखांची पुनर्मांडणी करण्यात आली आहे, तसेच गुरुकुलात सध्या चालू असणाऱ्या उपक्रमांचा, प्रक्रियांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. प्रबोधिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी पुस्तकात कालसुसंगत नवीन लेखांची भर घातली आहे.

या दोन दिवसांच्या परिषदेसाठी महाराष्ट्रातील १९ जिल्ह्यातील, ७० विविध शाळांतील २२० प्रतिनिधी

पूर्णवेळ उपस्थित होते.

पंचकोशांचे तत्त्वज्ञान, गुरुकुलात त्यानुसार होणारे उपक्रम यांचे प्रदर्शन यावेळी मांडण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांचे प्रकल्प, मौनाभ्यास, मौनसंवाद, स्वरचित कविता, कथा यांची मांडणी देखील करण्यात आली होती. या प्रदर्शनासोबत महाराष्ट्रात सध्या चालू असलेल्या १० पंचकोशाधारित गुरुकुलांपैकी ५ गुरुकुलांच्या कार्यपरिचयाचे तक्ते यावेळी मांडण्यात आले होते.

https://www. youtube. com/JPNVNigdi परिषदेची सर्व सत्रे आपल्याला या दुव्यावर बघता येतील. तसेच दृकश्राव्य वृत्त सोबत दिलेल्या QR code वर बघता येईल.

## Thank You!

During 2023-24

Donation received at Jnana Prabodhini central office from Shri Saigaonkar Foundation for payment of educational fees of economically backward students Rs 6,00,000

Donation received at Jnana Prabodhini central office from JP Foundation for payment of educational fees of economically backward students Rs 25,00,000

# देणगीदार यादी

| Donor's Name | Amount |
| --- | --- |
| Bharat Vikas Parishad Pcmc | 5,000.00 |
| Chinmaya Mission | 5,000.00 |
| Dr Bageshree Deokar | 5,000.00 |
| Mr.mukesh Dilip Ahire | 5,000.00 |
| Natya Sanskar Kala Academy | 5,000.00 |
| Rss Bharat Mata Shakha | 5,000.00 |
| Shri Deepak Vivhwanath Sangewar | 5,000.00 |
| Shri Gopal Bapurao Kokate | 5,000.00 |
| Shri Narayan Babanrao Jagtap | 5,000.00 |
| Shri Rohan Namdeo Rokade | 5,000.00 |
| Shri Sachin Rangrao Raut | 5,000.00 |
| Smt Anjali Anand Paulkar | 5,000.00 |
| Smt Arti Bhalchandra Prabhune | 5,000.00 |
| Manashakti Health New Way | 5,500.00 |
| Shri Mangesh Vishwanath Yelgaonkar | 5,500.00 |
| Shri Manoj Mohan Solanki | 5,500.00 |
| Smt Pradnya Ranade | 5,500.00 |
| Natya Sanskar Kala Academy | 6,000.00 |
| Shri Dnyandeo Dattatray Borude | 12,500.00 |
| Shri Milind Vidyadhar Bhurke | 7,000.00 |
| Kundan Cars Pvt Ltd | 7,500.00 |
| Satish Krishnarao Sagdeo | 8,000.00 |
| Shri Atharv Kanetkar | 8,000.00 |
| Nritya Kala Mandir | 9,000.00 |
| Shri Sachin Ganpati Shintre | 9,000.00 |
| Shri Dattatray Akhare | 9875.00 |
| C S S S Vijaymala Vidya Mandir | 10,000.00 |
| Chinchwad Malayalee Samajam | 10,000.00 |

| Donor's Name | Amount |
| --- | --- |
| Jnana Prabodhini Sevak Sahakari Patsanstha | 10,000.00 |
| Pasaydan Enterprises | 10,000.00 |
| Pradhikaran Jyeshtha Nagarik Sangh | 10,000.00 |
| Shri Abhijit Sharad Deshpande | 10,000.00 |
| Shri Anant Vishwanath Joshi | 10,000.00 |
| Shri Dilip Gadhave | 16,000.00 |
| Shri Kapil Sadashiv Damale | 10,000.00 |
| Shri Kishor Dattatray Deshmukh | 10,000.00 |
| Shri Milind Anant Dharwadkar | 10,000.00 |
| Shri Pramod Ashok Sadul | 10000.00 |
| Shri Prasad Madhav Joshi | 10,000.00 |
| Shri Sachin Rajaram Dighe | 10,000.00 |
| Shri Saurabh Rajendra Patil | 10,000.00 |
| Smt Jyoti Deepak Kanetkar | 10,000.00 |
| Smt Nirupama Abhyankar | 29,100.00 |
| Smt Pradnya Shivprasad Narote | 10,000.00 |
| Smt Sheetal Pankaj Digholkar | 10,000.00 |
| Shri Narendra Shamkant Kulkarni | 10,001.00 |
| Shri Shirish Dnyandeo Chaudhari | 10,001.00 |
| Shri Jayant Arunrao Muley | 11,000.00 |
| Shri Santosh Shivgonda Patil | 11,000.00 |
| Shri Shailesh Uttamrao Dumbre | 11,000.00 |
| Shri Vivekanand Vinayak Kapshikar | 11,000.00 |
| Smt Meena Satish Dixit | 11,000.00 |
| Smt Vaishali Prashant Aher | 11,000.00 |
| Shri Bhoushan Ganpat Nalage | 11,250.00 |
| Jyeshtha Nagarik Mahasangh | 13,000.00 |
| Shri Dattatray Akhare | 14900.00 |

| Donor's Name | Amount |
|---|---|
| Shri Varun Shamrao Bilurkar | 15,000.00 |
| Smt Vidya Devendra Udas | 15,500.00 |
| Rutuparn Narayan Naik Huf | 17,000.00 |
| Shri Jayant Sairam Mahajan | 17,000.00 |
| Shri Shridhar Hari Desai | 17,000.00 |
| Rss Bharat Mata Shakha | 17,500.00 |
| Pimpri Chinchwad District Gymnastic Association | 20,000.00 |
| Sharp Engineering | 20,000.00 |
| Shri Manoj Vasant Deolekar | 20,000.00 |
| Smt Anagha Tushar Deshpande | 20,000.00 |
| Smt Shweta Sachin Gupta | 20,000.00 |
| Rajshree Rahul Ozarde | 21,000.00 |
| Dassault Systems Foundation | 21,500.00 |
| Shri Gopichand Jaywant Borkar | 25,000.00 |
| Shri Parag Kulkarni | 25,000.00 |
| Shri Parshuram Hanmanth Kamble | 25,000.00 |
| Smt Sujata Sachin Sankpal | 25,000.00 |
| Smt Vinaya Shankar Vaze | 25,000.00 |
| Smt Archana Parimal Wadekar | 30,000.00 |
| Smt Kanchan Milind Padhye | 35,000.00 |
| Smt Komal Mangesh Pisal | 35,000.00 |
| Smt Dhanashri Amardeep Savagave | 36,500.00 |
| Ms Aarya Bhagwan Wankhede | 40,000.00 |
| Shri Kishor Dattatray Deshmukh | 40,000.00 |
| Smt Vinayak Kakade | 43,711.00 |
| Shri Anil Tanaji Rajput | 44,000.00 |
| Shri Himanshu Gapchup | 45,000.00 |

| Donor's Name | Amount |
|---|---|
| Shri Hrishikesh Deepak Barpande | 45,000.00 |
| Cotmac Electronics Private Limited | 50,000.00 |
| Jagajeet Jayant Kulkarni | 50,000.00 |
| Mayur Ratnakar Walunjkar | 50,000.00 |
| Shri Amar Suhaschandra Kulkarni | 50,000.00 |
| Shri Mukesh Dilip Ahire | 50,000.00 |
| Shri Onkar Krishnarao Joshi | 50,000.00 |
| Shri Samadhan Motheba Susar | 50000.00 |
| Shri Santosh Vasant Yelwande | 70,000.00 |
| Shri Suket Pravin Shah | 50,000.00 |
| Shri Vilas Limbaji Khandekar | 50,000.00 |
| Smt Smita Pravin Mane | 50000.00 |
| Shree Samarth Seva Mandal | 51,000.00 |
| Shri Shivraj Anant Pimpude | 110000.00 |
| Durga Devi Charitable Trust | 70,000.00 |
| Foundation For Communities Of Learning | 70000.00 |
| Pradeept Bharat Foundation | 74,000.00 |
| Smt Sampada Sandeep Patwardhan | 75,000.00 |
| Dr. Hemant Madhukar Naik | 150,000.00 |
| Smt Vimal Shankar Shinde | 160,000.00 |
| Shri Nitin Ratilal Karia | 200,000.00 |
| Smt Roshani Yuvraj Kalate | 200,000.00 |
| Smt Nalini Mohan Gujrathi | 500000.00 |
| Sir Dorabaji Tata Trust | 1,000,000.00 |
| Matrumandir Vishwast Sanstha | 4,520,000.00 |
| Prabodh Arth Sanchay Pvt Ltd | 1,600,000.00 |
| Ratilal Bhagwandas Construction Co. | 2,000,000.00 |
| Persistent Foundation | 275000.00 |
| **Total** | **12,889,838.00** |

# Thank You!